Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव-पुष्पकरंडक

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.
गिरगांव, मुंबई

१९२८

किंमत ०-१२-०

63म
20

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म ❀

पुस्तक-संख्या 63 म/20

पंजिका-संख्या 20986

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला

पुस्तक ७८ वें

CHECKED 197
Initial

नव-पुष्पकरंडक

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

लेखक

श्रीयुत **वामन मल्हार जोशी**, एम्. ए.

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

[तृतीयावृत्ति]

B.J

६३५
20

प्रकाशक

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव, मुंबई.

20986
5.1.2001

किंमत रु० ०-१२-० हक्क ग्रंथकर्त्याच्या स्वाधीन. [जून १९३१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Printed and Published by Damodar Raghunath Mitra,
at the Manoranjan Press, 3 Sandhurst Road, Bombay.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशकांचे दोन शब्द

श्रीयुत वामन मल्हार जोशी, एम्. ए. यांची रागिणी कादंबरी ज्यांनीं वाचिली आहे, त्यांना त्यांचें हें पुस्तकहि तसेंच प्रिय होईल, अशी आशा आहे. वामनरावजींनीं मनोरंजन, नवयुग, चित्रमयजगत्, केरळकोकीळ प्रभृति मासिक पुस्तकांमधून वेळोवेळीं जे मनोरंजक लेख किंवा ज्या छोट्या गोष्टी लिहिल्या होत्या, त्यांतील बऱ्याचशा गोष्टींचा संग्रह या पुस्तकांत केला आहे.

या पुस्तकाला पुष्पकरंडक असें नांव देण्याचें पहिल्यानें ठरलें होतें; परंतु प. वा. मिस् मेरी भोर यांनीं प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकाचें नांव 'पुष्पकरंडक' असें असल्याचें मागाहून स्मरणांत आल्यामुळें, पूर्वीचें नांव बदलून या पुस्तकाला 'नव–पुष्पकरंडक' असें नवीन नांव दिलें आहे.

श्रीयुत वामनरावजी जोशी यांचें ललितवाङ्मयाच्या सेवेकडे अधिकाधिक लक्ष्य वेधणें हें सर्वस्वी वाचकांच्या कळकळीच्या इच्छेवर अवलंबून आहे. रागिणीप्रमाणेंच आणखी एकदोन उच्च दर्जाच्या कादंबऱ्या लिहिण्याचें वामनरावजींकडून आम्हीं आश्वासन मिळविलेलें असून त्या सुबक रीतीनें छापून अति स्वल्प किंमतींत प्रसिद्ध करण्याचा आम्ही मनःपूर्वक प्रयत्न करूं. वाचकांनीं आपलें कर्तव्य बजावून महाराष्ट्रवाङ्मयांत श्रेष्ठ दर्जाचें ललितवाङ्मय निर्माण करण्याचें श्रेय संपादावें, अशी विनंति आहे.

मनोरंजन ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगांव–मुंबई.
ता. १५ जुलै, १९१६.

का. र. मित्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

या आवृत्तींत '**दोन स्वदेशींचा लढा**' या एका गोष्टीची भर घातली आहे.

हिंगणें,
६-५-३१

वा. म. जोशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव-पुष्पकरंडक

बायकांना उजव्या डोळ्यानें दिसत नाहीं !

विश्वनाथपंतांच्या व माझ्या स्नेहाला आज जवळजवळ वीस वर्षें तरी झालीं असतील. इतक्या दिवसांमध्यें त्यांचें व माझें कधीं भांडण झालें नाहीं व कधीं एकमेकांमध्यें हेवा किंवा द्वेष उत्पन्न झाला नाहीं. बरोबरच आहे, पैशासंबंधानें दोघांची अजूनपर्यंत तरी बरी स्थिति आहे. दोघांच्या शिलकीमध्यें व पगारामध्येंहि फारसें अंतर नाहीं. बरें, दोघांची नोकरीहि निरनिराळ्या खात्यांत. स्त्रीविषयीं ह्मणाल तर दोघांची एकमेकांविषयीं अत्यंत खात्री. याचें कारण दोघांवरती एकेच काळीं व एकेच स्थळीं पडलेला प्रसंग व त्या प्रसंगीं आलेला अनुभव. ह्या कारणांमुळें दोघांमध्यें असलेला स्नेह अव्याहत चालला होता; इतकेंच नाहीं, तर प्रतिदिवशीं तो वृद्धिंगत होत होता. त्यांचा माझा नेहमीं सर्व तऱ्हेच्या विषयांवर कडाक्याचा वादविवाद होत असे; परंतु कधीं कोणी कोणावर रागावलेला मला आठवत नाहीं. कधीं कधीं आमचा विनोदपर वादविवाद व्हावयाचा, त्याची मजा सांगतां येत नाहीं ! एकदां आम्ही संध्याकाळचे फिरावयास गेलों असत विश्वनाथपंत एकदम गंभीर स्वरानें ह्मणाले "Did you ever believe I would make a scientific discovery? My discovery is sure to make a name for me, I wonder, how such a simple fact was unobserved so long—मी एखादा शास्त्रीय शोध लावूं शकेन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें तुला केव्हां तरी वाटलें होतें काय ? ह्या माझ्या शोधानें माझें नांव विख्यात होणार खचित ! अशी साधी गोष्ट इतका वेळ कोणाच्याहि लक्ष्यांत येऊं नये ह्याचें मला आश्चर्य वाटतें !"

मला हें खरेंच वाटल्यामुळें "कोणची ! कोणची ! सांगा तर पाहूं !" असा मीं उत्सुकतेनें प्रश्न केला तेव्हा विश्वनाथपंत ह्मणाले, "That, women cannot see well by their right eye—बायकांना उजव्या डोळ्यानें चांगलेंसें दिसत नाहीं."

त्यांच्या बोलण्याचा रंग ध्यानांत आला तेव्हां मला थोडें हंसूं आलें. पण एकदम त्यांच्याप्रमाणेंच गंभीर मुद्रा धारण करून मी ह्मणालों, "तुम्हाला हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे."

"अगदीं experiment (प्रयोग) करून सिद्ध करून देईन" विश्वनाथपंत ह्मणाले. "पण पहिल्यानें असा विचार करून पहा, कीं उत्क्रांतीच्या तत्त्वाप्रमाणें प्राणी जों जों वरती वरती चढूं लागतो, तों तों प्रत्येक निरनिराळ्या कार्याला त्याला निरनिराळें इंद्रिय दिलेलें असतें, आणि 'गुण पाहणें' व दोष पहाणें' ह्या दोन कार्यांमध्यें जर जमीनअस्मानाचें अंतर आहे तर ह्या दोन निरनिराळ्या कार्यांकरितां प्राण्याला दोन स्वतंत्र इंद्रियें पाहिजेत. ह्मणजे, दोन निराळ्या प्रकारचे डोळे पाहिजेत. चांगलें जेवढें आहे तेवढें पाहण्याकरितां आपल्याला उजवा डोळा दिला आहे—"

"कशावरून ?" मीं मध्येंच विचारलें.

"अरे, ह्याला पुष्कळ प्रकारचीं प्रमाणें आहेत; पण सध्यां एक प्रकारचेंच प्रमाण पुरे आहे. इंग्रजींत उजव्या डोळ्याला right eye (राइट आय) ह्मणतात. ज्या डोळ्यानें आपण right (राइट)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्मणजे चांगलें—खरें पाहतों तो right eye (राइट् आय्) होय. उजवा डोळा ह्मणजे जो डोळा उजू—संस्कृत ' ऋजु, ' ह्मणजे सरळ—चांगलें पाहतो तो ! संस्कृतमध्येंहि उजव्या डोळ्याला ' दक्षिणाक्षि ' ह्मणतात. संस्कृतांत ' दक्षिण ' ह्मणजे उदार. उदार बुद्धीनें जो डोळा पाहतो त्याला ' दक्षिणाक्षि ' असें नांव देण्यांत आलें आहे. ह्या तीनहि भाषांचा माझ्या ह्मणण्याला आधार आहे, हें स्पष्ट नाहीं का ?"

" कबूल ! ह्या विचारसरणीवर कोणालाहि एक ब्रसुद्धां उच्चारतां येणार नाहीं !" मीं उत्तरादाखल ह्मटलें.

" हें जर कबूल आहे, तर मुख्य सिद्धांत मान्य होण्यास फार अडचण नाहीं. बायकांना लोकांमध्यें गुण फार दिसत नाहींत हें सर्वश्रुतच आहे. ' दोषैकदृक् ' हें विशेषण बायकांना जसें शोभतें तसें अभिप्रायार्थ पाठविलेल्या पुस्तकांवर टीका करणाऱ्या टीकाकारांनाहि शोभत नाहीं. बायकांना गुण दिसत नाहींत याचें कारण हेंच असलें पाहिजे कीं ज्या डोळ्यानें आपण गुण पाहतों त्या डोळ्यानें त्यांना दिसत नाहीं,—ह्मणजे उजव्या डोळ्यानें त्यांना दिसत नाहीं."

" पण बायकांना आपल्या मुलांमधले गुण दिसतात, तेव्हां त्यांना उजव्या डोळ्यानें दिसत असलेंच पाहिजे !" मीं आक्षेप घेतला.

" ह्मणूनच मीं पहिल्याप्रथम ह्मटलें होतें कीं, 'Women cannot see *well* by their right eye—बायकांना उजव्या डोळ्यानें 'नीट' दिसत नाहीं. पण त्यांतल्या त्यांत हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, जगांतील सर्व माणसें आणि त्यांच्या वस्तु यांच्या मानानें एका बायकोच्या स्वतःच्या वस्तु व मुलें यांची संख्या कांहींच नाहीं. शिवाय, 'Exceptions prove the rule'-'अपवादांच्या योगेंच मूळ नियम सिद्ध होतो ' हें सूत्र येथेंहि लागू पडतेंच ! "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" पण ज्या अर्थी ईश्वरानें बायकांना उजवा डोळा दिला आहे, त्या अर्थी त्या डोळ्याचा त्यांना कांहीं तरी उपयोग हा असलाच पाहिजे. निरुपयोगी इंद्रिय ईश्वर कधींहि देणार नाहीं आणि आपल्या विकासवादाच्या तत्त्वाप्रमाणें तर निरुपयोगी इंद्रिय हळुहळू नाहींसें होत गेलें पाहिजे !" मीं दुसरा आक्षेप घेतला.

" उजव्या डोळ्याचा बायकांना कांहींच उपयोग नाहीं, असें मीं कधींच ह्मटलें नाहीं ! उजवा डोळा नसल्यास बायकांचें सौंदर्य राहील काय ? शिवाय नखें, केस यांचा आतां माणसाला तादृश काय उपयोग आहे ? तरी पण अजून माणसाला नखें आणि केस येत आहेत ना ? तीच स्थिति बायकांच्या उजव्या डोळ्याची ! तुझ्या दुसऱ्या आक्षेपावर हेंच उत्तर आहे; आणि दुसरें असें कीं, उजवा डोळा अझून सपशेल निष्कार्य झाला नाहीं. तूं ह्मटल्याप्रमाणें स्वतःच्या मुलांना बायका त्या डोळ्यानें पाहतात; परंतु तो हळुहळू अगदीं निष्कार्य होत चालला हें उघड दिसत आहे. मुलगे मोठे झाले ह्मणजे त्यांच्याकडे आई डाव्याच डोळ्यानें पाहूं लागते. तसेंच मुली मोठाल्या झाल्यावर त्यांच्याकडे देखील आई उजव्या डोळ्यानें नेहमीं पहात नाहीं. यावरून हें स्पष्ट होत आहे कीं, दिवसेंदिवस बायकांना उजव्या डोळ्याचा फारच-फारच थोडा उपयोग करावा लागतो; आणि हीच स्थिति कांहीं शतकें चालू राहील तर बायकांचा उजवा डोळा पूर्ण आंधळा होईल अशी माझी खात्री आहे."

" पण ईश्वर जर सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ आहे तर दोन डोळे देऊन एकाच डोळ्याकडून काम करून घेतो हें जरा चमत्कारिक आहे!" मीं किंचित् मोठ्यानें परंतु जणूं काय मनाशींच बोलत असल्याप्रमाणें ह्मटलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"चमत्कारिक तर खरेंच ! पण जगांत अशा कितीतरी चमत्कारिक गोष्टी आहेत. माणसांचे कान लहान असतां ते लांबकान्याप्रमाणें कां वागतात ? किंवा या बायकांचीच गोष्ट घे ना ? बायकांना एक तोंड दिलें असतां त्या दुतोंडेपणा कां करतात हें जसें आपल्याला सांगतां येणार नाहीं, तसेंच दोन दोळे असतां त्यांना एकाच डोळ्याचा उपयोग कां करितां यावा, हें ठरविणें अशक्य आहे !"

"बरोबर आहे !" मीं स्मितपूर्वक संमति दर्शविली.

पंत पुढें ह्मणाले "माझ्या सिद्धान्ताच्या पुष्टीकरणार्थ दुसरे लहान-लहान पुरावे बरेच आहेत. बायकांना 'वामलोचना' म्हणतात हें प्रसिद्धच आहे वाम म्हणजे डावा, जसें वामहस्तः—डावा हात. वामलोचना ह्मणजे ज्यांना डावा डोळा आहे त्या. आतां हें उघडच आहे कीं, बायकांना उजव्या डोळ्यानें चांगलें दिसत नाहीं ह्मणूनच त्यांना वामलोचना ह्मणतात. डाव्या डोळ्यानेंच त्यांनां दिसतें ह्मणून त्यांना 'वामलोचना' म्हणतात हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं काय ? बायको ह्या अर्थाचा कोणताहि शब्द घ्या, त्यावरून हेंच निष्पन्न होतें. बायका 'आयताक्षि' किंवा 'पृथुनयना' असणें साहजिक आहे. दोन डोळ्यांचें काम जर एकच डोळा करणार, तर तो मोठा असलाच पाहिजे ! बायकांना 'कुटिलनयना' ह्मणतात व त्यांची वक्रदृष्टि प्रसिद्धच आहे ! उजव्या डोळ्यानें दिसत नसल्याकारणानें उजवीकडील वस्तु पाहण्याकरितां डावा डोळा कुटिल किंवा वक्र होतो, यांत नवल तें काय आहे ? 'अर्धांगी' या शब्दानेंहि हेंच सिद्ध होतें. या एवढ्या विवरणावरून शब्दव्युत्पत्तिशास्त्राच्या योगानें किती बोध होतो व किती नवीन शोध लागतात, हें तुला चांगलें कळून येण्यासारखें आहे !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"ऐकलेलें सर्व जरी सयुक्तिक दिसतें तरीसुद्धां मनाची कांहीं खात्री होत नाहीं, हें मला कबूल केलें पाहिजे!" मी मुद्दाम संथपणानें ह्मणालों.

"ज्याप्रमाणें शरीराची ठेवण व मुखचर्या यांवरून मनुष्याचा स्वभाव थोडाबहुत कळतो, त्याप्रमाणेंच कित्येक वेळां मनुष्याचा स्वभाव व मनाची प्रवृत्ति कळल्यास शरीरविषयक पुष्कळ अनुमानें आपल्याला काढतां येतात, असें तूं परवांच माझ्याशीं बोलत होतास. आतां स्त्रियांचा स्वभाव एककल्ली असतो हें कोणीहि कबूल करील. एककल्ली स्वभाव असण्याचें कारण हेंच कीं, त्यांना नेहमीं एकच बाजू दिसते! आणि एकच बाजू दिसते याचा अर्थ असा कीं, त्यांना एकाच डोळ्यानें पहातां येतें. या अनुमानांत वावगें कांहीं तरी आहे काय?"

"कांहीं नाहीं!" मीं हंसतहंसत ह्मटलें.

"नवराबायकोमधील किंवा मायलेकींमधील हलक्या स्वरांत चाललेलें गुप्त संभाषण दाराच्या आड लपल्याखेरीज बायकांना कसें ऐकूं येतें हें पुष्कळ शास्त्रज्ञांनां गूढ वाटतें. आंधळ्या माणसाला ऐकूं जास्त चांगलें येतें ही गोष्ट ध्यानांत आणली, ह्मणजे एका डोळ्यानें अंध असलेल्या स्त्रियांनां दोन डोळ्यांच्या पुरुषांपेक्षां पुष्कळ चांगलें ऐकूं येतें यांत गूढ तें काय आहे?"

"Oh, your discovery is a boon to the scientific world! It can explain so many of its problems! —अरे वाः! तुझा हा शोध ह्मणजे जगांतील शास्त्रीय शोधांत गुंतलेल्या मंडळीला एक अपूर्व लाभच ह्मणावयाचा!" मीं एकदम उद्गार काढले.

"बायकांच्या प्रसिद्ध असलेल्या चंचल स्वभावावरूनहि हेंच कसें सिद्ध होतें हें आतां मी सांगत बसत नाहीं. तुला आश्चर्य वाटेल,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण ज्योतिषशास्त्रावरूनहि माझा सिद्धान्त खरा ठरतो हें तुला मी आतां दाखवूं शकेन. बायकांचा उजवा डोळा लवला ह्मणजे आपण अपशकुन समजतों. आतां ज्या गोष्टी नेहमीं घडतात अथवा साहजिक असतात त्या गोष्टींवरून शकुन किंवा अपशकुन समजावयाचा नाहीं, हें उघड आहे. ज्या गोष्टी स्वाभाविक नसतात, अथवा एखादे वेळेलाच घडून येणाऱ्या असतात, त्या गोष्टींवरून शकुन किंवा अपशकुन समजतो. हें जर खरें आहे, तर बायकांचा उजवा डोळा लवणें ही गोष्ट अस्वाभाविक आहे व मधूनमधूनच घडून येणारी आहे हें कोणालाहि कबूल केलेंच पाहिजे; आणि माझें ह्मणणें हेंच कीं, पुतळ्यांतल्या किंवा चित्रांतल्या डोळ्यांप्रमाणें बायकांचा उजवा डोळा निश्चल आणि केवळ शोभादायक असतो व त्या डोळ्यानें त्यांना दिसत नाहीं; आणि असा डोळा अस्वाभाविक रीतीनें लवूं लागला ह्मणजे बायकांनीं घाबरून जावें हें साहजिकच आहे!"

"कबूल!" एवढेंच ह्मणून मी स्वस्थ राहिलों. करणार काय? आक्षेप घ्यावयास त्या वेळेस मला कांहीं जागाच सांपडेना!

पंतांनीं पुढें ह्मटलें. "माझ्या ह्मणण्याच्या पुष्टीकरणार्थ प्रत्यक्ष प्रमाणहि आहे. मीं जो एक experiment (प्रयोग करून) पाहिला त्याची हकीगत ऐकल्यास कोणाचीहि बालंबाल खात्री होईल. एके दिवशीं 'जिची दृष्टी उत्तम ठरेल तिला बक्षीस मिळेल' अशी लालूच दाखवून तीन बायकांना मीं रांगेनें उभें केलें, व त्यांना सांगितलें कीं, मी लोकांचीं जीं मुलें दाखवीन त्यांचें प्रत्येकीनें आपापल्यापरीनें वर्णन करावें. मीं मुलें आणावयाला निघालेला पाहतांच तिघीनीं चोरून डोळ्यांत तेल घातलें. मी हें पाहिलें पण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिकडे दुर्लक्ष करून जवळच्या खोलींतून मीं एका शेजारच्या बाईचीं सुंदर गोरींगोमटीं मुलें आणून त्यांच्यापुढें उभीं केली, त्या मुलांकडे व त्यांच्या आनंदपूर्ण सुरेख चेहऱ्यांकडे, डावीकडून पहिल्या बाईला तर पहावेचना! तिनें एकदम डोळे मिटले व 'बिब्बा पाहिजे, बिब्बा पाहिजे!' असें ती ओरडत सुटली. त्या मुलांच्या पाठीवर बिब्ब्याच्या फुल्या घालण्याकरितां तिनें बिब्बा मागितला असावा असा माझा तर्क आहे. त्या मुलांना पाहिल्याबरोबर दुसरीची अशी मजा झाली कीं तीं एकदम बरळूं लागली कीं, 'काय तरी हा मुलगा दांडगेश्वर वाढला आहे! आणि या मुलींना एवढं शिकून काय करायचं आहे? लहान मुलींना एवढा नट्टापट्टा काय करायचा!" इत्यादि इत्यादि. तिसरी जणूं कांहीं छिद्रें पहात आहे अशा विशिष्ट दृष्टीनें मुलांकडे न्याहाळून पाहूं लागली व शेवटीं म्हणाली 'काय ह्याचं नाक! हिच्या तर केंसांचं भूत झालं आहे! ह्या मुलीच्या अंगावर तर सोन्याचा एक तुकडादिखील नाहीं!' एकीला तर दुसऱ्याची चांगलीं मुलें पहावलीं नाहींत; बाकी राहिलेल्या दोघींमध्यें पहिला नंबर कोणाचा लागतो याचा निकाल मला लवकर करतां न आल्यामुळें दोघींनाहि बक्षीस देऊन मीं त्यांचा निरोप घेतला.

आतां या प्रयोगापासून काय सिद्ध होतें तें पहा! एकीला कांहींच पहावेना त्या अर्थी उजव्या डोळ्यानें तिला कांहींच दिसलें नाहीं हें स्पष्टच आहे. दुसरीला दिसलें पण सर्व उलटें दिसलें, ह्मणजे लोकांचे गुण दोषांसारखे दिसले आणि आपले दोष गुणांसारखे दिसले! अशा दिसण्यास 'दिसणें' ह्मणणें ह्मणजे शब्दच्छलच आहे यांत कांहीं शंका नाहीं. तिसरीलां सूक्ष्म दोष दिसले, पण मोठे गुण देखील दिसले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावरून बायकांची दृष्टि सत्याचें अर्धें अंग पहाणारी व अर्धें अंग न पाहणारी अशी 'अर्धांगी' आहे असें अनुमान निघतें तात्पर्य काय तर या प्रयोगावरून माझ्या सिद्धांताविषयीं माझी पक्की खात्री झाली. अशा प्रकारचे आणखी पुष्कळ लोकांच्या देखत मीं दोनचार प्रयोग करून पहिले, व सगळ्यांतून निष्पन्न एकच झालें कीं, 'बायकांना उजव्या डोळ्यानें चांगलें दिसत नाहीं.' जे लोक हिंदु लोकांना कांहीं original (नवीन) शोध लावतां येत नाहीं असें ह्मणतात त्या लोकांचीं तोंडें लवकरच बंद होतील यांत शंका नाहीं !" असें ह्मणून मीं यावर कांहींतरी बोलावें अशी इच्छा विश्वनाथपंतांनीं आपल्या मुद्रेनें व डोळ्यानें दर्शविली.

"असल्या गोष्टींचा प्रयोग ह्मटला ह्मणजे प्रत्येकानें स्वतः करून पाहिला पाहिजे. करितां स्वतःचा माझा प्रयोग झाल्याशिवाय या विषयासंबंधानें मला कांहींच बोलतां येणार नाहीं !" असें मीं ह्मटलें, व "तुमचा उजवा डोळा मला नेत्र वैद्याकडू आधीं तपासून घेतला पाहिजे, कारण तुह्मांलाच उजव्या डोळ्यानें दिसत नसावें अशी मला शंका येऊं लागली आहे" अशी या बोलण्याला हंसत पुस्ती जोडली. विश्वनाथपंतांनीं माझ्या बोलण्यांतली खोंच ओळखली व पुढें ते उत्तर देणार इतक्यांत त्यांचें घर आलें व आमच्या उभयतांच्या प्रिय अर्धांगी आमच्या नजरेस पडल्या आणि अर्थातच आमची चर्चा तेथेंच अर्धवट सोडून द्यावी लागली !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरा एक शोध

हल्लींचे दिवस शोधाचे व सुधारणेचे आहेत. प्रत्येक शास्त्रामध्यें नवीन नवीन शोध लागत आहेत, व त्या शोधांचा उपयोग मनुष्याला सुख देणाऱ्या वस्तु निर्माण करण्याकडे होत आहे. डोळे अधू असल्यास चष्मे लावून पहातां येतें. कानांनीं चांगलें ऐकूं येत नसल्यास एक प्रकारच्या नळ्या घालून कर्णेंद्रिय सुधारतां येतें. लढाईंत पाय मोडला असल्यास कृत्रिम पाय लावतां येतात; पांढऱ्या केसांचें काळे केस करतां येतात; पडलेले दांत बसवितां येतात. उंची कमी असल्यास उंच होण्याचीं यंत्रें युरोपमध्यें निघालीं आहेत व त्याप्रमाणें पूर्वीं तरुणींनीं झिडकारिलेले पुष्कळ ठेंगू युरोपिअन लोक हल्लीं उंच होऊन युवतींना मोह पाडीत आहेत !

अशा प्रकारचे सर्व शास्त्रांमध्यें शोध चालले असतां मानसशास्त्र तेवढें शोधांच्या बाबतींत मागें पडेल हें संभवनीय नाहीं ! शारीरिक उंची जर वाढवितां येते, शारीरिक पुष्टता जर आणतां येते, तर मानसिक मोठेपणा मिळविण्याविषयीं शोध लावण्याचे प्रयत्न होणें साहजिक आहे. आपण 'मोठे' कसे होऊं ? आपलें 'महत्त्व' कसें वाढेल ? आपल्याला लोक 'बडे' केव्हां ह्मणतील ? अशा प्रकारचे प्रश्न प्रत्येक मनुष्य स्वतःला रोज विचारीत असतो. ज्याप्रमाणें मनुष्याला शरीर सुदृढ असावेंसें वाटतें, त्याप्रमाणेंच, किंबहुना त्यापेक्षांहि जास्त, आपली बुद्धि मोठी असावी, निदान आपला मान तरी मोठा असावा, अशी त्याची इच्छा असते. लोकांनीं आपणांस मान द्यावा, आपल्याला वचकून असावें, दुसऱ्यानें लवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अदबीनें आपल्याशीं वागावें, अशी प्रत्येकाची इच्छा असते; पण ही इच्छा सफल कशी व्हावी, हा प्रश्न शास्त्रज्ञांपुढें येऊन पडला. पुष्कळ लोकांनीं पुष्कळ प्रकारचीं उत्तरें दिलीं. कोणी शास्त्रज्ञ ह्मणाले "जर तुह्मांला मान पाहिजे, तुमचें महत्त्व वाढावें अशी जर तुमची इच्छा असेल, तर 'मन मोठें करा' ह्मणजे झालें. तुमचें मन मोठें असलें ह्मणजे लोक तुम्हांला महत्त्व खात्रीनें देतील."

पण हें उत्तर अगदींच साधें—ह्मणूनच बावळटपणाचें आहे. मन मोठें केलें ह्मणजे लोक मान देतील हें सांगण्याला आह्मांला मोठे शास्त्रज्ञ नको आहेत! परंतु प्रश्न असा आहे कीं, मन मोठें नसल्यास मान कसा मिळवावा? बुद्धि फार नसतांना बुद्धिमान् कसें गणलें जावें?

दुसरे कित्येक विद्वान् वेदान्ती ह्मणाले "मानाची अपेक्षा करूं नका, ह्मणजे तुह्मांला मान मिळेल. लोकांनीं मान द्यावा, आपलें महत्त्व वाढावें, आपली वाहवा व्हावी, अशी इच्छा न धरतां मोठीं, औदार्याचीं, लोकोपयोगी कामें करावी, ह्मणजे आपोआप महत्त्व वाढतें."

हें उत्तर थोडेसें चमत्कारिक व विलक्षण आहे. काय ह्मणे, मान पाहिजे असल्यास मानाची अपेक्षा करूं नका! आंबे पाहिजे असल्यास बाजारांत आंबे आणावयास जाऊं नका, ह्मणजे तुमच्या घरांत आंबे येऊन पडतील, अशाच प्रकारचा हा उपदेश आहे! मग मनुष्याला बुद्धि तरी कशाला दिली आहे? कोणत्याहि गोष्टीबद्दल प्रयत्न तरी करण्याचें कारण काय? तुह्मांला स्वराज्य पाहिजे काय? मग निष्कामबुद्धीनें, निरपेक्षपणानें काम करा ह्मणजे तुह्मांला स्वराज्य मिळेल! स्वार्थ सोडा, स्वपक्षाभिमान सोडा, स्वजात्यभिमान सोडा, ह्मणजे स्वराज्य मिळेल! वाहवा! खासा उपाय! मानाची इच्छा धरूं नका ह्मणजे मान मिळेल,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वार्थाकडे पाहूं नका ह्मणजे स्वहेतु सिद्धीस जातील, हें विचारी माणसाचें बोलणें का? असला हा वेदान्ती शहाणपणा आह्मांला तरी नको आहे! मानाची अपेक्षा न धरतां मान मिळेल असें ह्मणणें ह्मणजे कारणाशिवाय कार्य होतें असें ह्मणण्यासारखें आहे.

तर मग ज्ञान मिळविण्यास एखादा 'रामबाण' उपाय आहे किंवा नाहीं? जेथें वेदान्त्यांनीं हात टेंकले, तेथें उत्तर देणें महा कठीण काम, हें तर खरेंच. पण आमच्या एका पुण्यपत्तनस्थ मित्रानें मानसशास्त्राचा अलीकडे बराच अभ्यास चालविला आहे व त्यामध्यें त्याची बरीच प्रगति झाली आहे. त्यानें आपला पहिलाच शोध सर्वांआधीं मला पत्रद्वारें कळवून जगजाहीर करण्यास योग्य आहे किंवा नाहीं हें विचारलें आहे. त्या पत्रांत सदरहू प्रश्नाचें उत्तर बरेंच समर्पक दिलेलें आहे असें वाटल्यावरून तें खालीं देतों:—

पुणें, फाजील अकलेची पेठ,
मानलोभ्यांचा वाडा, भांग्या सैतानाच्या बोळासमोर.
ता. १५ मे, १९०७

सा. न. वि. वि.—

प्रिय मित्रा! मानसशास्त्राचा मी स्वतःच्या अनुभवानें अभ्यास करूं लागल्यापासून एकदोन नवीन तत्त्वें मला सांपडलीं आहेत. तीं आधीं तुला कळवून मग जगापुढें मांडावीं, असा विचार करून त्याप्रमाणें आज हें पत्र लिहीत आहें.

जगांत मोठें कसें होतां येईल अशी एक दिवस माझ्या मनांत इच्छा झाली. (तुजजवळ खरें सांगण्यास हरकत नाहीं—दुसऱ्याजवळ हें मी कधीं कबूल करणार नाहीं. कारण, मी मोठा देशाभिमानी व स्वार्थत्यागी आहें अशी जी माझी प्रसिद्धि आहे तिची मग वाट काय?) शास्त्रीय रीत्या या प्रश्नाचें उत्तर शोधण्याच्या खटपटीस मी लागलों. स्वतः मोठें होण्याची इच्छा व शास्त्रीयशोधप्रियता हीं दोन कारणें एकत्र मिळाल्यामुळें माझें काम मोठ्या उत्साहानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालू झालें. हल्लीं मोठे गणलेले सर्व प्रकारचे लोक, त्यांचीं चरित्रें व त्यांची वागण्याची तऱ्हा, यांचें निरीक्षण केलें असतां माझ्या प्रश्नाचा उलगडा लवकर होईल, ह्मणून मीं गांवोगांव फिरून मोठमोठ्या माणसांविषयीं टिपणें करून ठेविलीं. ह्या टिपणावरून मीं जे तात्पुरते चालचलाऊ सिद्धांत काढले ते खालीं नमूद करितों:—

१. मोठें व्हावयाचें असल्यास लठ्ठ शरीर अवश्य पाहिजे. शरीरांत वात असल्यास मोठेपणा लवकर मिळतो. वाताचा व मोठेपणाचा संबंध काय आहे हें मी बारकाईनें शोधूं लागलों तेव्हां त्याचें खरें कारण समजून येऊन दुसराहि एक शोध लागला. तो असा:—

२. मनुष्यानें बोलतांना किंवा लिहितांना 'वात' झालेल्या मनुष्याप्रमाणें वागल्यास मोठेपणा लवकर प्राप्त होतो. वक्त्यानें बोलतांना वाताकुल माणसाचा आवेश आणणें अवश्य आहे. जवळ कोण आहे, आपण काय बोलतों, असंबद्ध बोलतों किंवा कसें, दुसऱ्यावर खोटे आक्षेप घेतों कीं काय, ह्याचा विचार केल्यास त्या वक्त्यास मान मिळणें कठीण. एकदम बेलाशक विधानें ठोकून द्यावयाचीं, सत्यासत्यतेकडे पहावयाचें नाहीं, असा क्रम पाहिजे. लिहितांना देखील असेंच केलें असतां महत्त्व मिळणें सोपें जातें. अमुक एक बोललें किंवा लिहिलें म्हणजे एखाद्याचें मन दुखावेल, भांडणें जास्त वाढतील, द्वेष वाढेल, देशाचें नुकसान होईल, असा दूरवर विचार केल्यास मान किंवा महत्त्व स्वर्गांत गेल्यावर कदाचित् मिळेल, पण सध्यां येथल्या येथें कांहीं मिळणें शक्य नाहीं! टीका करतांना खोल विचार करणारा वर कधीं येणार नाहीं, त्याचा पाय नेहमीं खोलांतच! 'वर' यावयाचें असल्यास 'वरवर' पहावें, वरकान्तीं वागावें, हें माझें मानसशास्त्रांतील तत्त्व तर्कशास्त्रानें किंवा भाषाशास्त्रानें स्पष्टपणें सिद्ध होत आहे. जास्त जास्त खोल गेल्यास जगांत वर येणें, जास्त जास्त कठीण होतें यांत नवल काय? सुधारकांवर टीका करतांना त्यांचा पोषाख, त्यांचे डोकीवरचे केश (केश हे शरीराच्या अगदीं वर असल्यामुळें टीका करतांना त्यांचें नांव प्रत्येक पानांत निदान दहादां तरी आलें पाहिजे, असा आनुषंगिक नियम मीं काढिला आहे), त्यांचे वरचे-स्वर्गांतले वाडवडील, इत्यादि 'वरच्या' गोष्टींचा निर्देश करून टीका करावी, ह्मणजे खचित मान वाढेल! त्यांचे वास्तविक हेतु, त्यांचा खरा उद्देश, त्यांचे खोल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचार इत्यादि गोष्टींच्या खोल पाण्यांत शिरल्यास टीकाकाराला किंवा वक्त्याला जगांत वर येणें दुरापास्त होय. राजकीय पक्षाविरुद्ध टीका करतांनासुद्धां खोल विचार केल्यास भाषेला धार येत नाहीं! ज्याप्रमाणें लेखणी दौतींत फार खोल बुडविल्यास लेखणी गुळगुळीत होंते व आपल्याच हाताला डाग लागतात, त्याचप्रमाणें सदसद्विवेकबुद्धींत खोल प्रवेश करून टीका करूं लागल्यावर टीकास्त्र बुळबुळीत होतें, व इतरत्र डाग जरी नसले तरी आपलें मनहि डागानें परिपूर्ण आहे असें दिसून येतें! ह्मणून टीका करतांना सदसद्विवेकबुद्धीचा खोल विचार टाकून द्यावा व मग टीका करण्यास आरंभ करावा ह्मणजे लेखणी जलद चालते, व तिला थोडासा तिखटपणा येतो, आणि लोकांत लवकर मानमान्यता होते! मित्रा, हा सिद्धांत तुला खरा वाटतो का?

असो. प्रिय मित्रा! मोठें होण्याचे आणखी एकदोन मार्ग मला ठाऊक आहेत; पण ते सध्या गुलदस्तांतच राहूं देणें बरें. सुचविलेल्या युक्तीसंबंधानें तुझें मत काय आहे. तें लवकर कळीव. बाकी, माझी त्यासंबंधानें खात्री झालेली आहे. परंतु कालिदास म्हणतो त्याप्रमाणें

बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः।

कळावें, लोभ असावा, हे विनंति,

तुझा प्रिय मित्र,
सज्जनराव लुक्के."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चारित्र्यक्रान्ति

(हिंदुस्थानांतील एका युरोपिअन कुटुंबांतील गोष्ट)

साहेबांच्या बंगल्यामध्यें बटलरासारखा दुसरा उपयुक्त नोकर नाहीं ! तो भटारखान्याचेंच काम करितो असें नाहीं, तर तो त्यांचा बाजारहाटहि करितो व बागवान, परीट, वगैरे नोकरांवर देखरेखहि करीत असतो. 'साहेब' प्रवास करीत असतां त्यांच्याबरोबर जाऊन त्यांचीं हरतऱ्हेचीं कामें तो पार पाडतो. एखादा 'नेटिव्ह' मनुष्य कसा आहे, त्याची लोकांत कीर्ति किंवा मानमान्यता किती आहे, इत्यादि गोष्टींची साहेबांची माहिती बटलरांशीं केलेल्या संभाषणावरूनच कांहीं अंशानें मिळविलेली असते. या अशाच प्रकारच्या कारणांमुळें साहेबांच्या घरीं इतर नोकरांच्या मानानें बटलरला बराच मान असतो व तो सुस्वभावी, चलाख, बोलका व प्रामाणिक असल्यास साहेबांना नाहीं तरी निदान 'मेमसाहेबांनां' बराच प्रिय होतो. तो प्रामाणिक असला पाहिजे असें ह्मटलें, पण त्याचा अर्थ एवढाच कीं, साहेबांच्या किंवा मेमसाहेबांच्या नजरेस येईल अशी लुच्चेगिरी, चोरी वगैरे त्यानें करतां कामा नये. बाकी सिगारेट्स, चिरूट, साबू वगैरे वस्तु बेताबेतानें चोरल्यास, किंवा बाजारांतून धान्य, मांस, अंडीं वगैरे सामानसुमान आणतांना त्यानें थोडेबहुत पैसे चलाखीनें गट्ट केल्यास त्याच्या प्रामाणिकपणास विशेष बाधा येते, अशांतली कांहीं गोष्ट नाहीं. 'चलाखी' मात्र चांगलीच पाहिजे; नाहीं तर तो साहेबांकडे दोन घटका टिकावयाचा नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ॲण्डरसन साहेबांच्या नासरखान नांवाच्या बटलरामध्यें यांपैकी बरेच 'गुण' होते; पण हे गुण होते, ह्मणूनच तो मेमसाहेबांनां प्रिय झाला होता, असें मात्र नाहीं. या गोष्टीचीं दुसरींहि कांहीं कारणें होतीं. एक तर 'मेमसाहेब' विलायतेंतील चांगल्या कुळांतल्या असून जात्याच फार दयाळु होत्या, व नुकत्याच विलायतेहून आल्या असल्यामुळें हिंदी लोकांबद्दल अनादर व त्यांच्याशीं वागण्यांत उद्धटपणा हे गुण त्यांना अद्यापि लागलेले नव्हते. नासरखानाची नम्रता, त्याची सौम्यता, वगैरे पाहून त्या त्याच्यावर खूष होत्या. दुसरें कारण असें कीं, नासरखान ही व्यक्तिच अशी होती कीं, ती अण्डरसनसारख्या वाचनरत, उग्र, कुढ्या, एकलकोंड्या स्वभावाच्या साहेबालासुद्धां अनेक वेळां रंगेल माणसाप्रमाणें हंसवीत असे. त्याचें तें काळेंकुट्ट शरीर, त्यावर धारण केलेल्या स्वच्छ पांढऱ्या पोषाखाची (साहेबाच्या धोब्याकडून फुकट धुऊन घेतलेल्या पोषाखाची) पोकळ ऐट; त्याचें तें ठेंगू शरीर व त्याची ती सव्वा हात लांब दाढी; त्याचे ते खोल गेलेले गाल आणि त्यांवरील त्याचे ते मोठे झुबकेबाज कल्ले; त्याचे ते जात्या रांठ असलेले केंस व तेलसाबू व (चोरलेलें) 'पोमॅटम' लावून त्या केंसांना त्यानें आणलेला तुळतुळीतपणा; त्याच्या बोलण्याच्या पद्धतीचा भारदस्तपणा व अर्थाचा क्षुद्रपणा; त्याच्या 'बटलरी' इंग्रजी भाषेचा अस्खलित प्रवाह व या प्रवाहांत इंग्रजी व्याकरणास व इंग्रजी भाषेस खेंचून पाहिजे तिकडे नेण्याची त्याची विलक्षण शक्ति; इतर नोकरांशीं बोलतांचालतांना दिसून येणारी त्याची ऐट व मग्रुरी, आणि मेमसाहेबांशीं किंवा ॲण्डरसनसाहेबांशीं बोलतांना दिसून येणारी त्याची फाजील नम्रता व कार्यतत्परता; साहेबांना खूष करण्याची त्याची प्रबल इच्छा आणि ही इच्छा असूनहि बेअकलीपणामुळें त्यानें केलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

63 अ/२० २-१-८६
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हास्यास्पद चुका,—इत्यादि मौजेच्या अनेक गोष्टी कठोर व उग्र स्वभावाच्या ॲण्डरसनसाहेबांचेंहि मन रंजवीत असत, मग नवीनच विलायतेहून आलेल्या मधुरस्वभाव मेमसाहेबांना नासरखानाचें कौतुक वाटल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. त्याची ती विलक्षण मूर्ति पाहिली व त्याची अस्खलित अशुद्ध इंग्रजी भाषा ऐकली ह्मणजे त्यांना हंसूं यावयाचें; पण त्या सुशील, उच्चकुलीन व उच्च मनोवृत्तीच्या असल्यामुळें आलें हंसें त्या दाबीत असत, अथवा दाबण्याचा प्रयत्न करीत असत असें म्हटलेलेंच बरें. कारण, त्यांनीं किती प्रयत्न केला तरी त्यांच्या चर्येवर हास्याची छटा दिसल्याशिवाय राहात नसे.

ॲण्डरसनसाहेब असिस्टंट कलेक्टर ह्मणून............येथें आल्याबरोबरच त्यांनां नासरखान हें रत्न मिळालें. एकदोन दिवसांतच त्यांनीं या दिव्य रत्नाची पारख केली व अकलेचें असलें हें रत्न जवळ ठेवणें चांगलें नाहीं असें त्यांनां वाटूं लागलें. परंतु दयार्द्रतेनें कांहीं अंशीं, व कांहीं अंशीं स्वाभाविक सुस्तीमुळें त्यांनीं त्याला बदललें नाहीं. आपला सैंपाक बरा करतो आहे, व आपलीं सर्व बारीकसारीक कामेंहि करतो आहे साधारणपणें, कशाला विचाऱ्याला काढा ? दुसरा बटलर शोधण्याचा कोण त्रास करतो ? आणि दुसरा याच्यासारखाच निघणार नाहीं कशावरून ? अशा प्रकारचा विचार करून ॲण्डरसनसाहेबांनीं नासरखानला काढून टाकलें नव्हतें. साहेबांचा पगार वाढत गेल्यावर बागवान, गाडीवान, साइस, धोबी वगैरे अनेक नोकर त्यांनीं ठेवले; परंतु नासरखान हा सर्वांच्या आधींचा असल्यामुळें व त्यालाच मोडकें तोडकें कां होईना पण इंग्रजी येत असल्यामुळें, तोच साहेबांचा मुख्य नोकर–त्यांचा उजवा हातच झाला. नासरखान मोठा चलाख नसला तरी इतर नोकरांवर वजन व वर्चस्व ठेवण्याची कला त्याला थोडीशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
LIBRARY, GURUKULA KANGRI.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवगत होती. नासरखान हा फार प्रामाणिक व साधाभोळा आहे असें मिसेस ॲण्डरसन यांना जरी वाटत असलें तरी 'साहेब माझ्यावर फार खूष आहेत, साहेब माझ्याशीं असें असें बोलत होते' इत्यादि खऱ्याखोट्या गोष्टी सांगून भोळ्या नोकरांवर वजन ठेवण्याची लुच्चेगिरी त्याच्यामध्यें नव्हती असें नाहीं. साहेब व त्यांची मडम खाना खात असतांना जें कांहीं संभाषण करीत असत, तें ऐकण्याचा नासरखान बटलराला हक्क होता. या बोलण्यावरून साहेबांच्या सामान्य दैनिक कार्यक्रमाचें त्याला ज्ञान होत असे आणि या अमोलिक माहितीचा तो चांगलाच उपयोग करून घेत असे. 'उद्यां मी अमक्या ठिकाणीं अमक्या कामाकरितां जाणार आहें' असें साहेब माझ्याशीं बोलले असें तो इतर नोकरांना दडपून सांगत असे व साहेब त्याप्रमाणें जावयाचेहि ! अशा प्रकारचे ठोकताळे अनेकदां आल्यामुळें नासरखानाला साहेबांचे बेत कळतात, त्याच्यावर साहेबाची मर्जी आहे, अशी त्या भोळ्या नोकरांची भावना झाल्यास नवल काय ? ॲंड्रयू पिटमन नांवाच्या असिस्टंट बटलराचा मात्र या गोष्टीवर विश्वास नव्हता. तो असिस्टंटाच्या जागेवर होता खरा, पण तो नासरखानापेक्षां हुषार होता व त्याचें इंग्रजीहि अधिक शुद्ध होतें. त्यानें नासरखानाला एक-दोन महिन्यांतच पदच्युत केलें असतें; परंतु नासरखानानें त्याच्यावर लवकरच कुभांड रचून आपला साळसूदपणा व इमानीपणा शाबीत केला होता, व त्याला घरांतून घालवून दिलें होतें. नासरखान हा Idiot (खुळचट) आहे, हें ॲण्डरसन साहेब मनांत ओळखून होते; पण तो लुच्चा असेल अशी त्यांना कल्पना नव्हती. खुळचट असला तरी तो इमानी असल्यामुळें त्यांनीं उदार अंत:करण करून त्याला कामावरून काढून टाकिलें नव्हतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि काढून टाकलें नाहीं ही गोष्ट मिसेस् ॲण्डरसन यांच्या पथ्यावरच पडली. विलायतेंतील आपलें गजबजलेलें घर व आपल्या प्रिय मैत्रिणींचा शेजार सोडून त्या नुकत्याच हिंदुस्थानांत आल्या असल्यामुळें इकडील शहराबाहेरील निर्जनप्राय एकाकी बंगला त्यांना कंटाळवाणा व भयजनकहि वाटावयाचा. बरें, दुसऱ्या युरोपिअन लोकांकडे जाऊन करमणूक करून घ्यावी असें ह्मटलें, तर तेंहि मिसेस् ॲण्डरसन यांना शक्य नव्हतें. एक तर, युरोपिअन पुरुष व बायकाहि इकडील लोकांप्रमाणें दुसऱ्याकडे रिकामटेकड्या उगाच जात-येत नाहींत. शिवाय दुसरें असें कीं मि. ॲण्डरसन हे वाचनप्रिय व एकलकोंडे असल्यामुळें त्यांना तर लोकांकडे मुळींच जावेंसें वाटत नसे व त्यांचा स्वभाव लोकांना ठाऊक झाला असल्यामुळें डॉक्टर बेनेट या जिवलग मित्राशिवाय दुसरें कोणीहि त्यांच्याकडे फारसें येत नसे. मग मिसेस् ॲण्डरसन यांची दुसऱ्यांशीं दाट ओळख कशी व्हावयाची ? जिमखान्यांत सगळ्यांशीं त्यांची जानपछान झालेली होती; पण ती अद्यापि दाट झालेली नव्हती. कशी होणार ? मि.ॲण्डरसन हे एकलकोंडे व कृपण असल्यामुळें ते लोकांना मेजवानीस—At home party स—किंवा चहापार्टीसहि फारसे बोलावीत नसत. त्यांना या औपचारिक गोष्टी आवडतच नसत. ॲट-होम पार्टीचें नांव काढलें कीं ॲण्डरसन साहेबांचें डोकें उठत असे. या गोष्टींत वेळ घालविणें ह्मणजे वेळेचा अपव्यय करणें होय असें ते म्हणत असत. 'तुला पाहिजे तर तूं आपल्या नांवावर लोकांना बोलावणें कर, पण त्या तुमच्या बायकांच्या निरर्थक गप्पा व त्यांचा तो बालिश किलकिलाट ऐकण्याची मला शिक्षा देऊं नकोस' असें मि. ॲण्डरसन आपल्या प्रियपत्नीस ह्मणत; पण मिसेस् अण्डरसन यांना एकट्याच्या नांवावर आमंत्रण पाठविणें शिष्टपद्धतीस सोडून आहे असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटत असे. पति घरांत अथवा बंगल्यांत असतां एकटीनें पाहुण्यांशीं जेवणखाण करणें त्यांनां पसंत नव्हतें. असें करणें ह्मणजे पाहुण्यांचा अपमान करणें होय असें त्या ह्मणत. असो.

मि. ॲण्डरसन लोकांना मेजवानीस वगैरे कधीं बोलावीत नसल्यामुळें लोकांनीं त्यांना व त्यांच्या पत्नीला जरी मेजवानीस वगैरे बोलावलें, तरी त्यांना तें आमंत्रण कोणत्या ना कोणत्या तरी सबबीवर नाकारावें लागे. (दुसऱ्यांनीं दिलेल्या ॲट–होम पार्टीचा अनेकदां उपभोग घेतल्यावर आपणहि मधून मधून ॲट–होम–पार्टी दिली पाहिजे असा शिष्टसंप्रदाय आहे.) अशा स्थितींत मिसेस् ॲण्डरसन यांनीं आपला चोवीस तासांचा दिवस कसा घालवावयाचा ? रोजरोज गाडी घेऊन फिरायला जाणेंसुद्धां कंटाळवाणें होतें. वाचनांत वेळ घालवावा असें ह्मटलें तर या ह्मणण्यांतहि विशेष अर्थ नाहीं. वाचन व अध्यापन हा ज्यांचा आवडता धंदा त्या विद्याव्यासंगी अध्यापकांनासुद्धां रोजरोज ग्रंथ वाचीत बसण्याचा कंटाळा येतो; मग बेतापुरतेंच शिकलेल्या तरुण व उत्साहपूर्ण युरोपिअन स्त्रीला तासच्या तास वाचनांत कसे घालवितां येतील ? मिसेस् ॲण्डरसन यांना वाचनाची आवड नव्हती असें नाहीं; पण दोन एक तास वाचन झाल्यावर त्यांना त्याचा कंटाळा येत असे व वेळ कांहीं केल्या जात नसे.

अशा कंटाळवाण्या वेळीं नासरखान त्यांना फार उपयोगीं पडत असे. त्याच्याशीं बोलत बसण्यांत त्यांचा वेळ तरी निघून जात असे. त्यांचा स्वभाव अगदीं निरभिमान व प्रेमळ होता. त्या नासरखानाशीं-सुद्धां घटकाघटका बोलत बसत. नासरखानाचीं अशुद्ध इंग्रजी वाक्यें ऐकिलीं असतां त्या सौम्यपणें व निरभिमानतेनें 'शुद्ध कसें बोलावें'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें त्याला शिकवीत असत. इंग्रजी भाषा त्यांची जन्मभाषा जरी होती तरी अमुक वाक्य चूक कां, हें व्याकरणदृष्ट्या त्यांना सांगतां येत नव्हतें; तरी पण अनेक उदाहरणें देऊन शुद्ध वाक्यरचना व शुद्ध शब्दप्रयोग कसे असतात हें नासरखानास समजावून देण्याचा त्या प्रयत्न करीत. कधीं कधीं त्याला हरतऱ्हेचा उपदेश करण्यांत त्या आपला वेळ घालवीत असत. बंगल्यांत स्वच्छता ठेवावी, इतर नोकरांशीं उद्धटपणें बोलू नये, कोणाशीं भांडूं नये, असें त्या त्याला वारंवार सांगत. कधीं कधीं इतर नोकरांना बोलावून व नासरखानाला दुभाष्या करून त्या ख्रिस्ती धर्माचा सर्वांना उपदेश करीत. मूर्तिपूजा करूं नये, खुळा धर्मभोळेपणा सोडून द्यावा, क्राइस्टसारखें शुद्ध आचरण ठेवावें, क्राइस्टवर श्रद्धा ठेवली व त्याच्या उपदेशाप्रमाणें वागलें ह्मणजे ईश्वर तुमच्या पापांची तुम्हांला क्षमा करील, इत्यादि इत्यादि उपदेश त्या सर्वांना मोठ्या कळकळीनें करीत असत. पण त्यांचा हेतु कितीहि चांगला असला तरी हा उपदेश नासरखान दुभाष्याच्या मुखांतून नोकरांना ऐकावयास मिळत असल्यामुळें मेमसाहेबांचीं इंग्रजी वाक्यें व नासरखानाचीं हिंदीमराठी वाक्यें दोन्हीहि नोकरांना सारखींच अर्थशून्य व्हावयाचीं ! असो. मिसेस् ॲण्डरसन यांचा सद्धेतुक कळकळीचा उपदेश किती सफळ झाला हें प्रस्तुत सांगावयाचें नसून त्या आपला वेळ कसा घालवीत असत हें मला सांगावयाचें आहे. नासरखानाच्या मुखानें वरील प्रकारचा उपदेश केल्यापासून दुसऱ्या कोणाला फायदा झाला नसला तरी मेमसाहेबांनीं दुभाष्या नेमून त्याचा गौरव केल्यामुळें त्याला मूठभर मांस आलें व त्याच्या मिशा अधिक पीळदार होऊं लागल्या ही गोष्ट खरी आहे. असो. तात्पर्य काय तर मिसेस् ॲण्डरसन या नासरखानाशीं बोलण्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च त्याच्या मध्यस्थीनें सर्व चाकरनोकरांना हरतऱ्हेचा सदुपदेश करण्यांत आपलें मन गुंतवून त्या आपला लांबलचक दिवस कसा तरी शेवटास नेत असत.

ॲण्डरसनसाहेबानांसुद्धां नासरखानाचा कांहीं कांहीं गोष्टींत फार उपयोग होत असे. ते विद्याव्यासंगी, वाचनरत, एकान्तप्रिय, आणि कृपण असल्यामुळें मंडळींना जेवण्याखाण्यास विशेष बोलावीत नसत हें जरी खरें आहे, तथापि चारसहा महिन्यांतून एखादे वेळेस तरी त्यांना शिष्टसंप्रदायाप्रमाणें उद्यान–भोजन, खाना, चहापार्टी वगैरे द्यावी लागत असेच. चार मंडळी घरीं आली ह्मणजे त्यांच्याशीं आनंदानें गप्पागोष्टी सांगून त्यांचें मन रिझविणें हें यजमानाचें कर्तव्य आहे; परंतु हें काम ॲण्डरसनसाहेबांना साधत नसे. ते विद्वान् होते, पण मंडळींत बसून संभाषण करण्यांत कुशल नव्हते. मिसेस् ॲण्डरसन या संभाषणप्रिय होत्या व संभाषण मनोरंजक करण्याची त्यांना थोडीशी हातोटीहि होती; पण त्या नवथरच इकडे आल्या असल्यामुळें कोणाशींहि विशेष सलगीनें बोलणें त्यांना शक्य नव्हतें व हिंदुस्थानांतल्या गोष्टींसंबंधानें त्यांनां विशेष माहिती नसल्यामुळें संभाषणाला त्यांच्याजवळ विषयच नव्हते. अशी स्थिति असल्यामुळें मेजवानीस रंग येणें कठिण पडत असे. निमंत्रित पाहुण्यांपैकीं जर कोणी एखादा चांगला विनोदी व अघळपघळ बोलणारा असला तर कांहीं तरी बरें; नाहीं तर जेवणाच्या वेळचें संभाषण अगदीं फिक्कें व तुटकतुटक होऊन अखेर तें अजीबात बंद पडावयाचें, व सर्वांनां निमूटपणें मुक्यासारखें जेवणखाण करण्याची पाळी यावयाची. अशा अनिष्ट प्रसंगीं नासरखानाची स्वारी मिस्तर व मिसेस् ॲण्डरसन यांना फार उपयोगीं पडावयाची. त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ती ठेंगू व शुभ्र पोषाख केलेली कृष्णमूर्ति मोठ्या अदबीनें किंबहुना भीतभीत व कांपत कांपत मंडळींत आली व त्यानें 'You want this?' असें मोठ्या नम्रतेनें विचारलें कीं, पाहुण्यांना हंसण्यास—बोलण्यास एख विषय मिळावयाचा, व सगळ्यांना त्या वेळीं त्याचे मोठे उपकार वाटावयाचे! मग मिसेस् अण्डरसन त्याच्या इंग्रजी भाषेच्या एक एक नकला सांगवयाच्या व या नकलांवरून कारकुनांच्या, 'बाबू'च्या व हिंदी वर्तमानपत्रकारांच्या भाषेंत दिसून येणाऱ्या हरतऱ्हेच्या इंग्रजी चुकांच्या अनेक नकला निघून मंडळीचा राहिलेला वेळ हास्यप्रचुर संभाषण करण्यांत लवकर निघून जावयाचा!

नासरखान हा idiot (बेअकली) आहे असें कळून चुकलें असतांहि मि. ॲण्डरसन यांनीं त्याला कांहीं अंशीं आळसानें व कांहीं अंशीं दयार्द्रबुद्धीनें ठेवून घेतलें होतें हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या या असत्पात्रीं दाखविलेल्या दयार्द्रतेचा वाईट परिणाम त्यांना अर्थातच भोगावा लागत असे. नासरखानाच्या बेअकलीपणामुळें मि. ॲण्डरसन यांना बऱ्याच पैशांची यापूर्वीं ठोकर लागली असेल; पण या खेपेला त्यानें आपल्या बावळटपणामुळें त्यांचें भयंकर नुकसान केलें, व त्यामुळें त्यांच्या जीविताचा नाश होण्याचीच पाळी आली. पगार आल्याबरोबर ५०० रुपयांच्या नोटा काढून त्यांनीं त्या नासरखानाजवळ दिल्या व चिठ्ठी देऊन बँकेंत घेऊन जाण्यास त्यांनीं त्याला सांगितलें; पण त्यानें त्या नोटा कोठें गहाळ केल्या. पुष्कळ शोध केला, पण नोटा कोठें सांपडल्या नाहींत. मि. ॲण्डरसन हे असिस्टंट कलेक्टर असले ह्मणून काय झालें? ५०० रुपयांची ठोकर ह्मणजे कांहीं थोडीथोडकी नाहीं. त्यांत पुनः ॲण्डरसन साहेबांना कर्ज होतें,—त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सासऱ्याचेंच त्यांना कर्ज होतें. हप्त्याहप्त्यानें ते कर्जाची फेड करीत होते. परंतु कांहीं कारणामुळें तीनचार महिने त्यांना हप्ता पाठवितां आला नाहीं ह्मणून या खेपेला निश्चय करून त्यांनीं पगार आल्याबरोबर ५०० रुपयांच्या नोटा बँकेंत पाठविण्याचा विचार केला होता. हे रुपये बँकेंत पाठवून बँकेच्या तर्फे विलायतेंत पाठविण्याचा त्यांचा बेत. परंतु मनांतला बेत सिद्धीस जातो असें थोडेंच आहे !

मिसेस् ॲण्डरसन यांचे वडील वाईट नसले तरी पैशाच्या कामांत ते विशेष उदार मनाचे नव्हते. त्यांनीं आपल्या मुलीच्या प्रेमामुळें मि. ॲण्डरसन यांना तीन हजार रुपये कर्जाऊ दिले होते. (मि. ॲण्डरसन हे दोन वर्षांपूर्वीं बरेच महिने आजारी पडले असल्यामुळें निम्या पगारावर त्यांना हवा बदलण्याकरितां विलायतेस जावें लागलें होतें, व त्या वेळेस हें कर्ज काढणें अवश्य झालें होतें) दोनतीन हप्ते चुकल्यामुळें त्यांच्या व्यवहारदृष्टि श्वशुरांकडून त्यांना जरासें कडक पत्र आलें होतें व हा अपमान मि. ॲण्डरसन यांना सोसावा लागला होता. आतां हे ५०० रुपये हरवल्यावर श्वशुरांचे हप्ते कसे भरावयाचे ? पैसे कांहीं झाडाला लागत नाहींत !

नासरखानानें पैसे हरवले असें पाहून ते त्याच्यावर संतापले, त्याच्या अंगावर ओरडले, त्याला शिव्या दिल्या; पण येथें नासरखानावर ते तणाणले ह्मणून विलायतेंतील त्यांचें कर्ज फिटेल असें थोडेंच आहे ! शांत झाल्यावर विचार करून त्यांनीं आपल्या मनाशीं अखेर ठरविलें कीं इतके दिवस नासरखानामुळें ज्या ठोकरा बसल्या त्या आतां बस्स झाल्या, यापुढें तरी असली ठोकर लागायला नको. त्यांनीं हा निश्चय लवकरच नासरखानाला कळविला व त्याला आपला गाशा गुंडाळण्यास सांगितलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या स्थितींत नासरखानानें जगन्मान्य पद्धतीचाच स्वीकार केला. मिसेस् ॲण्डरसनकडे जाऊन त्यानें त्यांचे पाय घट्ट धरले व एवढ्या अपराधाची क्षमा करण्याची आणि गरीबाला प्राणदान करण्याची केंविलवाण्या शब्दांनीं त्यांची विनवणी केली. 'तुला पुष्कळदां माफ केलें आहे, आजचा अपराध माफ होणें शक्य नाहीं ' असें त्या ह्मणाल्या; परंतु कांहीं वेळानें ह्यांचें मन द्रवलें. 'द्रवलें' याच्यांत आश्चर्य कसलें ? 'मेमसाब, तुम्ही माझ्या आईप्रमाणें आहांत, तुम्ही पाहिजे तर पाठीवर मारा परंतु पोटावर मारूं नका ' इत्यादि प्रकारच्या दीन विनवण्यांपुढें त्या कोमल स्त्रीचें मन द्रवलें नसतें, तरच आश्चर्य. असो. 'मि. ॲण्डरसन यांना मी सांगून पाहत्यें,' असें आश्वासन देऊन त्या आपल्या पतीच्या खोलीकडे गेल्या.

"Let us excuse Nasarkhan, Robert—रॉबर्ट, नासरखानला आपण एकवार क्षमा करूं या." त्या आपल्या पतीला म्हणाल्या.

"No" मि. ॲण्डरसन ह्मणाले "I can no longer tolerate such idiocy—(नाहीं; याच्या बेअकलीपणाची गय करणें आतां शक्य नाहीं—)"

मि. ॲण्डरसन असें जरी ह्मणाले तरी त्यांच्या पत्नीनें फारच रदबदली केल्यामुळें त्यांनीं अखेर नासरखानाच्या अपराधाची क्षमा केली हें सांगण्याची विशेष जरूर आहे असें नाहीं. आपल्या पत्नीच्या विनवणीस मान देतांना तिच्या फाजील दयार्द्रतेबद्दल त्यांनीं तिला बाहेरून बराच दोष दिला; परंतु त्यांच्या मनामध्यें आपल्या कोमलहृदय उदार पत्नीबद्दल त्यावेळीं अधिकच प्रेम व पूज्यभाव वाटूं लागला होता हें सांगणें अवश्य आहे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिसेस् ॲण्डरसन यांच्या फाजील सौम्यतेचा, उदार बुद्धीचा व सलगीचा नासरखानावर कसा परिणाम झाला हें देखील विचार करण्यासारखें आहे.

मेमसाहेब आपल्याकडे पाहून नेहमीं हंसतात याचें इंगित नासरखानाला अलीकडे असें वाटूं लागलें होतें कीं त्यांचें आपल्यावर प्रेम आहे. प्रेम नसतें तर इंग्रजी शिकविण्याचें त्यांनीं श्रम घेतले असते काय ? आणि एकेक तास माझ्याशीं त्या गप्पागोष्टी सांगत्या का ? प्रेम असल्याशिवाय या गोष्टी व्हावयाच्याच नाहींत. इतके चाकर आहेत, पण मीच त्यांच्यासमोर गेलों ह्मणजे त्यांच्या गालांवर हंसण्याची छटा कां यावी ? आणि त्यांनीं ॲण्डरसनसाहेबांजवळ माझी एकसारखी रदबदली तरी कां करावी ? एकदां, दोनदां, तीनदां दयेमुळें असेल; पण परवां साहेब इतके संतापले असतांनासुद्धां मेमसाहेबांनीं माझ्याकरितां त्यांची मनधरणी केली याच्यांत कांहींतरी इंगित आहे खास.

आधींच वेडसर असलेल्या नासरखानाला हें प्रेमाचें वेड लागल्यावर, मग त्या मर्कटाच्या चेष्टा काय वर्णाव्या ? इतर 'अगाध चेष्टा' गाळून एकच गोष्ट सांगितली तरी ती पुरे होईल. ही गोष्ट अशी कीं पत्र पाठवून किंवा अन्य रीतीनें मेमसाहेबांच्या प्रेमाची परीक्षा पाहण्याचें त्यानें ठरविलें ! हें एवढें सांगितल्यावर आणखीं कांहीं सांगण्याची जरूर आहे काय ?

कांहीं आठवड्यांनीं एका शुक्रवारीं मि. ॲण्डरसनसाहेब आपल्या खोलींत बसून आपली विलायतची डांक वाचून पहात होते. दोनतीन पत्रें वाचून झाल्यावर त्यांनीं नासरखानाला हांक मारली व मेमसाहेबांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलावून आणण्यास सांगितलें. मिसेस ॲण्डरसन तेथें आल्यावर नासरखानाला तेथून निघून जाण्यास व दार ओढून घेण्यास त्यांनीं सांगितलें. तो खोलीबाहेर पडला व त्यानें दार ओढून घेतलें; परंतु तो धूर्त मनुष्य दाराच्या एका फटींतून खोलींत डोकावून पहात दाराबाहेर उभा राहिला. मि. ॲण्डरसन यांनीं आपल्या पत्नीच्या हातांत एक पत्र दिलें व तिच्या तोंडाकडे ते रागीट व चमत्कारिक मुद्रेनें पाहूं लागले. मेमसाहेबांनां आपण डांकेंतून जें पत्र पाठविलें होतें तें 'साहेबांनीं' फोडून वाचून पाहिलें कीं काय, अशी नासरखानाला शंका आली व त्याची घाबरगुंडी उडाली; परंतु आपली भीति निराधार असावी हें त्याच्या लवकरच ध्यानांत आलें. मिसेस ॲण्डरसन यांनीं सबंध पत्र वाचून पाहिलें अशी खात्री झाल्यावर मि. अण्डरसन यांनीं 'And you call this hard-hearted man your loving father!' –आणि या निर्दय वडिलांनां तूं प्रेमळ समजतेस !' असें आपल्या पत्नी-कडे इतक्या रागीट मुद्रेनें पाहून व इतक्या कठोर स्वरानें ह्मटलें कीं नासरखान घाबरून मागेंच सरला. पण लगेच तो सावध झाला व आपल्या पाठविलेल्या पत्राचें बिंग बाहेर फुटलें नाहीं अशी बालंबाल खात्री होऊन त्याला धीर आला वमेमसाहेबांच्या बापाचें काय पत्र आलें आहे हें जाणण्याच्या इच्छेनें तो दाराच्या फटींतून त्या नवराबायकोचें संभाषण कान देऊन ऐकूं लागला. 'संभाषण' असें ह्मणण्यापेक्षां 'भांडण' ह्मटलें असतें तर बरें झालें असतें; कारण मि. ॲण्डरसन हे आपल्या श्वशुराला त्यावेळीं शिव्यांची लाखोलीच वाहत होते व ही गोष्ट त्यांच्या पत्नीस सहन न होऊन त्याहि बऱ्याच गरम झाल्या होत्या आणि मोठमोठ्यानें बोलत होत्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मि. ॲण्डरसन यांना राग येण्यासारखें त्यांच्या श्वशुराच्या पत्रांत विशेष कांहीं होतें असें नाहीं. तीनचार हप्ते न मिळाल्यामुळें मि. ॲण्डरसनसाहेब जुगारीच्या वगैरे वाईट नादाला लागले आहेत कीं काय, असा त्यांच्या श्वशुरांस संशय आला होता व त्यांना परावृत्त करण्याच्या हेतूनें 'वचन दिलेले हप्ते कां येत नाहींत हें समजत नाहीं'– 'अशा प्रकारचें वर्तन आपल्याकडून होईल अशी माझी मुळींच अपेक्षा नव्हती' 'कायदेशीर उपाय योजणें माझ्या जिवावर येतें, व मी ते कदाचित् योजणारहि नाहीं,'–अशा प्रकारचीं ईषत्कठोर वाक्यें त्यांनीं आपल्या पत्रांत लिहिलीं होतीं. आतां, हे श्वशुर पैशाच्या कामांत अगदीं लोभी नसते किंवा ते अधिक सुसंस्कृत व कोमल बुद्धीचे असते, तर त्यांनीं हीं वाक्यें लिहिलीं नसतीं हें जरी कबूल केलें, तरी या वाक्यांवरून मि. अण्डरसन यांनीं त्यांच्यासंबंधानें त्यांच्या मुलीसमोर अपशब्द बोलावे ही गोष्ट कांहीं रास्त नव्हती.

मिसेस ॲण्डरसन यांना ते अपशब्द रुचले नाहींत,–मुळींच खपले नाहींत. पति झाले ह्मणून काय झालें! त्यांनीं आपल्या प्रेमळ वडिलांसंबंधानें असे शब्द वापरलेले ऐकून त्या इंग्लिश स्त्रीला राग आला व 'वडिलांना माझ्यासमोर असले अपशब्द बोलूं नये!' असें त्यांनीं आपल्या पतीला सौम्यपणेंच परंतु गांभीर्यानें व किंचित् रागाच्या स्वरानें बजावून सांगितलें. यावर मि. ॲण्डरसन कांहीं उलट बोलले व दोघांचें चांगलेंच भांडण जुंपून अखेर त्यांचा अबोला झाला! मि. ॲण्डरसनसाहेब त्याच रात्रीं पत्नीच्या रागानें म्हणा किंवा कर्ज फेडण्याच्या व्यवस्थेकरितां ह्मणा, मुंबईस निघून गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मि. ॲण्डरसन रागारागानें घरांतून निघून गेलेले पाहून नासरखानानें विचार केला कीं, मेमसाहेबांशीं सलगी करण्यास ही फार उत्तम संधी आहे. स्त्री आपल्या नवऱ्यावर रागावलेली असतां पतिव्यतिरिक्त प्रेमाचा व क्षुद्र मनोविकारांचा जय होण्याचा बराच संभव असतो, हें नासरखानालासुद्धां समजत होतें. आपल्या मनधरणीस मेमसाहेब वश झाल्या तर ठीकच, नाहीं तर इतर चाकरनोकरांना कांहीं तरी कामाच्या निमित्तानें बंगल्याबाहेर पाठवून द्यावें व आपला मनोरथ बळजबरीनें सिद्धीस न्यावा, असा विचार करण्याइतका तो आतां बेहोष झाला होता.

आणि त्याप्रमाणें त्यानें केलेंहि. असिस्टंट बटलरला बाजारांतून गोष, अंडीं, लोणी वगैरे आणण्यास त्यानें पाठवून दिलें. माळ्याला कांहीं रोपे आणण्यास त्यानें पाठवून दिलें. परटाला, गाडीवानाला व दुसऱ्या किरकोळ नोकरांनाहि अशाच प्रकारच्या कामगिरीवर पाठवून देऊन त्या बंगल्यावर आपला निष्प्रतिकार ताबा बसेल असें त्यानें केलें व नंतर तो कांहीं कामाचें निमित्त करून मेमसाहेब ज्या खोलींत बसल्या होत्या तेथें गेला, आणि डोळे मिचकावून ' You are very very kind, good lady, you are a goddess. —तुम्ही फार दयाळू आहांत, तुह्मी देवी आहांत ' असें मनधरणीच्या प्रस्तावनेदाखल ह्मणूं लागला. भोळ्या बिचाऱ्या मिसेस् ॲण्डरसनला त्याच्या वाक्यांचा हेतु किंवा अर्थ कांहींच कळेना. ' हा वेड्यासारखें असें काय बरळतो आहे ? वांकडीं तोंडें काय करतो आहे ?' असें त्या मनांत ह्मणाल्या व मोठमोठ्यानें हंसूं लागल्या. त्या हंसण्याचा त्या कामान्ध नासरखानानें स्वतःला अनुकूल असा अर्थ केला व तो त्यांच्या अंगाजवळजवळ जाऊं लागला. त्याचा खरा अर्थ मिसेस् ॲण्डरसन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांच्या ध्यानांत आतां एकदम आला, व त्यांनीं किंकाळी फोडली, आणि एकदम खुर्चीवरून उठून त्यांनीं त्याला आपल्या टोंकदार बुटाच्या दोनतीन लाथा मारल्या. बेहोश झालेला नासरखान बुटाच्या लाथांना न जुमानतां तिच्या अंगावर हात टाकणार इतक्यांत त्यानें बंगल्यांत गाडी येत आहे असा आवाज ऐकला, व खोलींतील कांचेच्या खिडक्यांतून त्याला बेनेटसाहेबांची गाडीहि लगेच दिसली.

डॉ. बेनेट तेथें आले व त्यांनीं मि. ॲण्डरसन यांची चौकशी केली. ते मुंबईस गेले आहेत असें कळल्यावर ते परत जाण्यास निघाले. जातां जातां त्यांनीं मिसेस् ॲण्डरसन यांना "तुम्ही आज अशा फिक्कट कां दिसतां, आजारी तर नाहीं ना?" असें प्रेमपूर्वक विचारलें. मिसेस् ॲण्डरसन यांनीं खरें कारण अर्थात् सांगितलें नाहीं व कांहीं तरी सबब सांगून संभाषणाचा विषयच एकदम बदलला.

डॉ. बेनेट बंगल्याबाहेर पडल्याबरोबर नासरखान मिसेस् ॲण्डरसनपुढें गेला व शरण जाऊन व नाक घांसून 'साहेबांना सांगूं नका, तुम्ही मायबाप आहांत' असें ह्मणूं लागला. मिसेस् ॲण्डरसन कांहीं मिनिटें त्याच्याशीं मुळींच बोलल्या नाहींत; पण नंतर त्यांनीं 'तुझ्यावर मी लवकरच फिर्याद करणार आहें!' असें त्याला निश्चयात्मक स्वरानें साफ सांगितलें. नासरखान घाबरला व रडूं, ओरडूं व गडबडा लोळूं लागला. हा प्रकार पाहून त्या साध्वीचें मन पुन: मृदु झालें व त्या 'बरें नासरखान, जा; तुझ्यावर फिर्याद करणार नाहीं' असें ह्मणाल्या. नासरखानाचें या आश्वासनानें समाधान झालें नाहीं. 'मेमसाब, ही गोष्ट कोणाला सांगूं नका; मला जीवदान द्या' अशा अर्थाचीं मोडकीं तोडकीं इंग्रजी वाक्यें केविलवाण्या स्वरांत उच्चारून घडलेली हकीगत गुप्त ठेवण्याविषयीं त्यांची तो दीनपणें विनवणी करूं लागला. मिसेस्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ॲण्डरसन यांनीं बराच वेळ या गोष्टीस रुकार दिला नाहीं; पण अखेर त्या कोमलहृदय स्त्रीचें मन द्रवलें व तिनें ही गोष्टहि कबूल केली.

नासरखान आपल्या ऑफिसांत–भटारखान्यांत–गेल्यावर आपल्या मनाशीं एकंदर गोष्टींचा शांतपणें विचार करूं लागला. आजची हकीगत आज नाहीं उद्यां साहेबांना कळणारच, हें त्यानें ओळखलें. ' मी सांगणार नाहीं ' असें मेमसाहेबांनीं जरी वचन दिलें होतें तरी या वचनांत कांहीं अर्थ नाहीं, असें त्याला वाटलें. साहेबांना जर ही सर्व हकीगत कळली तर ते आपणास नोकरीवरून काढून टाकून स्वस्थ बसावयाचे नाहींत–ते आपणावर फिर्याद करून आपणास तुरुंगांत टाकतील–ही त्याची पक्की खात्री होती. मि. ॲण्डरसनसाहेबांनीं आपल्या चाकरांपैकीं दोघांना मेमसाहेबांचे पैसे व दागिने चोरल्याबद्दल वर्षावर्षाची शिक्षा देवविली होती, याची त्याला आठवण झाली. साध्या चोरीबद्दल जर त्यांनीं वर्षाची शिक्षा देवविली, तर आपण केलेल्या भयंकर गुन्ह्याबद्दल चारपांच वर्षें तरी आपणास मिळणार, अशी त्याला भीति पडली, व तो गांगरून गेला. याला उपाय काय करावा? मेमसाहेबांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून स्वस्थ बसावें काय?

मेमसाहेबांची आठवण झाल्याबरोबर त्यांच्या खोंचदार बुटाच्या लाथांची नासरखानाला आठवण झाली, व त्याच्या हृदयांतील भीति नाहींशी होऊन भीतीऐवजीं त्याचें हृदय रागानें जळफळूं लागलें. साहेबाची मडम झाली म्हणून काय झालें, स्त्रीनें बुटाच्या लाथा माराव्यात हें त्या कडव्या जातीच्या मुसलमानास असह्य व अक्षम्य झालें. "काय! मला–मला नासरखानाला–रोज नेमानें निमाज पडणाऱ्या अस्सल मुसलमानाला–काफर स्त्रीनें बुटाची लाथ मारावी? ती श्रीमंत असली,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर आपल्या घरची श्रीमंतीण ! ती मड्डम असली म्हणून अस्सल मुसलमानानें तिच्या बुटाच्या लाथा निमूटपणें सोसाव्या काय ? छे, ही गोष्ट फारच लांछनास्पद झाली, याबद्दल सूड घेतलाच पाहिजे !"

असा त्यानें विचार केला खरा, पण लगेच त्याला मेमसाहेबांच्या अनेक उपकारांची आठवण झाली, व सुडाचा त्याचा निश्चय डळमळला, आणि मेमसाहेबांचा नाश करण्यापेक्षां आपण तुरुंगांत गेलों तरी पत्करलें असा उच्च विचार त्याच्या मनांत घोळूं लागला; परंतु मिसेस् ॲण्डरसन यांचें दुर्दैवच ओढवलें असल्यामुळें हा विचार त्याच्या मनांत फार वेळ टिकला नाहीं. कांहीं वेळानें बुटांच्या लाथांची त्याला पुनः आठवण झाली व त्या आठवणीमुळें त्याचे सर्व उच्च विचार पांखराप्रमाणें उडून कोठच्या कोठें पळून गेले, व 'सूड—सूड—सूड' हाच विचार अखेर प्रबळ झाला.

लगेच तो सुडाच्या मार्गाला लागला. ॲण्डरसनसाहेब आपल्या बायकोवर संतापले आहेत हें त्याला ठाऊकच होतें. अशा वेळीं त्यांना निनांवी पत्र लिहून त्यांच्या बायकोच्या पातिव्रत्याविषयीं जर त्यांचें मन आपण कलुषित केलें, तर आपला डाव खात्रीनें साधेल असा नासरखानानें विचार केला. बरें, आपला डाव फसला तरी पत्र निनांवीच असल्यामुळें आपलें नुकसान तर खात्रीनेंच होणार नाहीं, असा त्याचा पोक्त विचार होता. आणि त्याच्या विचारांत बराच पोक्तपणा होता असें मलाहि वाटतें. कारण निनांवी पत्रांचा शोध ज्या कल्पक मनुष्यानें काढला त्याला मी आवाज न होणाऱ्या बंदुकीचा शोध लावणाऱ्यापेक्षांहि अधिक मान देतों ! निनांवी पत्रासारखें बिनधोक्याचें, अचूक व घातुक शस्त्र नाहीं ! हिंदी लोकांचीं इतर सर्व शस्त्रें काढून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेतलीं, तरी निनांवी पत्रांचीं शस्त्रें सरकारानें हिरावून घेऊं नयेत, व परवान्याशिवाय हें शस्त्र वापरण्याच्या आमच्या या निसर्गदत्त हक्कावर सरकारानें घाला घालूं नये, अशी माझी ईश्वराजवळ नेहमीं प्रार्थना असते !

नासरखानानें या अमोलिक शस्त्राचा उपयोग करून घेण्याचा बेत केला, असें मीं सांगिलेंच. हा बेत मनांत कायम झाल्यावर त्याला दुसरी एक युक्ति सुचली. तो डॉक्टर बेनेटच्या बंगल्यावर गेला व त्यांच्या बटलरजवळ कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसून अखेर त्यानें मित्राला पत्र लिहिण्याकरितां म्हणून हळूच एकदोन नोटपेपर व लिफापे मागितले. बेनेटसाहेब बंगल्यावर नसल्यामुळें त्यांच्या नोटपेपरच्या डब्यांतून सुंदर नोटपेपर चोरून घेण्याची आतां मुळींच जरूर नव्हती,— त्यांच्या बटलरानें पांचदहा नोटपेपर व लिफापे राजरोसपणें आणि बिनदिक्कत नासरखानाला आणून दिले.

ते नोटपेपर घेऊन तो पैसा घेऊन पत्र लिहिणाऱ्या गांवांतील एका कारकुनाकडे गेला व त्याच्याकडून मि. ॲण्डरसन यांना मुंबईंतील होटेलच्या पत्त्यावर पुढील आशयाचें इंग्रजी पत्र त्यानें पाठविलें.

"ता. १७ जुलै १८९—

प्रियमित्र ॲण्डरसनसाहेब,

मी तुमच्या बंगल्यावर काल दुपारीं ४ वाजण्याच्या सुमारास गेलों होतों. बंगल्यावर चाकरनोकर कोणीहि दिसलें नाहीं. नेहमींच्या सवईप्रमाणें दिवाण-खान्यांत जात असतां तुमची पत्नी व तुमचा एक नोकर एका खोलींत प्रेमाच्या व सलगीच्या गप्पागोष्टी सांगत होतीं, असें मीं पाहिलें. याचा अर्थ काय? डोळे उघडे ठेवून रहा, एवढेंच मी सांगूं शकेन.

आपला

एक मित्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. क.—सही करणार होतों, पण न केलेलीच बरी असें वाटून ती केली नाहीं."

कालक्रमानें योग्य वेळीं हें पत्र मि. ॲण्डरसन यांच्या हातांत पडलेंच. मुंबईस जाऊन कर्जाची वगैरे सोय न झाल्यामुळें वैतागून गेलेल्या व प्रिय भार्येशीं भांडण झाल्यामुळें भ्रमिष्ट झालेल्या ॲण्डरसन साहेबांनीं या पत्रांतील मजकूर वाचल्याबरोबर त्यांना खरोखरीचेंच वेड लागण्याची पाळी आली ! आपली पत्नी—आपली मेरी—अशी असेल, असें त्यांना कांहीं वेळ खरें वाटेना. पण पत्रांतील अक्षरें व त्यांचा अर्थ अगदीं स्पष्ट होता. पत्र लिहिणारा कोण, याविषयींहि शंका घेण्याचें कांहीं कारण नव्हतें. डॉ. बेनेटशिवाय माझ्या घरीं बोलावण्या-शिवाय कोण येणार ? त्यांच्याशिवाय माझा दुसरा कोण मित्र आहे ? आणि हे नोटपेपर्स डॉ. बेनेटचे नाहींत तर कोणाचे ? हें पत्र आपल्या प्रियमित्रानें—डॉ. बेनेटनींच लिहिलेलें आहे. त्यांनीं मुद्दाम अक्षराचें वळण बदललें आहे; पण हें पत्र बेनेटकडून आलेलें आहे, असें हा नोटपेपर व हा वरचा लिफापाच सांगत आहे !

मि. ॲण्डरसन लगेच मेलनें जाण्याकरितां निघाले. स्टेशनावरून आपल्या बंगल्याकडे न जातां ते तडक डॉ. बेनेटकडे गेले, व त्यांनीं त्यांना सहज विचारलें " तुम्ही परवां माझ्या बंगल्याकडे गेलां होतां काय ?"

" होय;" बेनेटसाहेबांनीं उत्तर दिलें. " पण तुम्ही मुंबईस गेलां असें मीं ऐकलें. तुम्ही आजच आला वाटतें ?"

" हो !" असें मि. ॲण्डरसन यांनीं उत्तर दिलें व नंतर कांहीं वेळानें पुनः " तुम्ही माझ्या बंगल्यावर किती वाजतां गेलां होतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व माझ्या बायकोची व तुमची गांठ पडली होती का?" असें त्यांनीं जणूं काय सहजच विचारलें.

"मी चार वाजतां गेलों होतों, व तुमच्या बायकोचीहि गांठ पडली होती" असें उत्तर मिळतांच मि. ॲण्डरसन यांची मनांतल्या प्रश्नाविषयीं खात्रीच झाली. डॉ. बेनेट यांचें उत्तर ऐकल्यावर कांहीं क्षण ते स्तब्ध बसले व नंतर त्यांचा निरोप घेऊन जाऊं लागले. दरवाजापर्यंत त्यांना पोंचविण्याकरितां डॉ. बेनेटहि उठले व चालतां चालतां सहज ह्मणाले "मि. ॲण्डरसन, तुमची बायको अलिकडे आजारी तर नाहींना? परवां तिच्या त्या निस्तेज फिक्कट तोंडाकडे पाहून मला अशी शंका आली कीं ती आजारी असावी."

झालें, हें वाक्य ऐकल्यावर शंका घेण्याचें कारण उरलें नाहीं. तें पत्र डॉ. बेनेटनींच लिहिलें असलें पाहिजे, असें त्याच्या मनानें पक्केंच घेतलें.

बेनेटसाहेबांच्या बंगल्यांतून ते बाहेर पडले व गाडीवानाला आपल्या बंगल्याचा पत्ता सांगून गाडींत सचिंत पडले.

पंधरा मिनिटांत त्यांची गाडी बंगल्याजवळ आली; ती बंगल्यांत शिरूंहि लागली. नासरखानाचें त्या गाडीकडे प्रथम लक्ष गेलें, व त्याची घाबरगुंडी उडाली.

मेमसाहेब त्या वेळीं दिवाणखान्यांतच वाचीत बसल्या होत्या. नासरखान त्यांच्याकडे घाबरत घाबरत घाईघाईनें गेला व 'साहेबांची गाडी आली आहे' असें सांगून 'गुह्य गोष्ट त्यांना कृपा करून सांगू नका' असें त्यांना पुनः विनवूं लागला. मिसेस् ॲण्डरसन यांनीं त्याला पुनः वचन व आश्वासन दिलें. कर्मधर्मसंयोग असा कीं, इतक्यांत ॲण्डरसनसाहेब

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाडींतून उतरून दिवाणखान्याच्या दाराशींच आले व त्यांनीं नासरखानाचे शेवटले शब्द व मिसेस् ॲण्डरसन यांचें आश्वासन ऐकलें !

पतीला पाहिल्याबरोबर मिसेस् ॲण्डरसन पुढें सरल्या व पतीजवळ जाऊन नम्रपणें ह्मणाल्या "Robert, I owe you an apology. I am heartily sorry that I used the words I did two days ago. Won't you forgive me, Robert?–रॉबर्ट, मला प्रथम आपली क्षमा मागितली पाहिजे. दोन दिवसांपूर्वीं मी तुह्मांला जे अपशब्द बोलल्यें, त्याबद्दल मला आतां फार पश्चात्ताप होत आहे. रॉबर्ट, मला क्षमा करायची ना ?"

रॉबर्ट ॲण्डरसन यावर कांहींच बोलले नाहींत, व दुसरीकडे तोंड फिरवून लांबच्या एका खुर्चीवर जाऊन बसले व शून्य दृष्टीनें व शून्य मनानें शीळ घालूं लागले. त्यांची पत्नी त्यांच्या पाठोपाठच गेली व त्यांच्या समोरच्या एका खुर्चीवर बसून कोमल स्वरानें म्हणाली, "Robert dear, you were never so hardhearted as to-day. Can't you excuse your repentant wife?–प्रिय रॉबर्ट, आज एवढे निर्दय कां होतां ? मला कृतापराधाबद्दल पश्चात्ताप होत आहे. रॉबर्ट, आपल्या प्रियपत्नीला क्षमा करणें एवढें अवघड जावें काय ?"

"Mary" मि. ॲण्डरसन ह्मणाले, "I am *not* dear to you! You are *not* repentant and you are *not* my wife. –मेरी, मला तूं 'प्रिय' ह्मणतेस, पण मी तुला प्रिय नाहीं; तुला पश्चात्ताप झालेला नाहीं व तूं माझी बायकोहि नाहींस !"

"How do you mean?" मेरीनें अश्रु पुशीत पुशीत विचारलें "या ह्मणण्याचा अर्थ काय ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"I mean what I say—मीं जें ह्मटलें, तोच त्याचा अर्थ !" मि. ॲण्डरसन निश्चयानें व कठोरपणें ह्मणाले.

मेरी रडूं लागली. बिचारी दुसरें काय करणार ? कांहीं क्षणांनीं मि. ॲण्डरसन यांनींच पुनः प्रश्न काढिला "आपलें गुह्य साहेबांना सांगू नका !" या नासरखानाच्या वाक्याचा अर्थ काय ?" असें आपल्या पत्नीला त्यांनीं आतां स्पष्टपणें विचारलें.

"गुह्य आहे हें खरें, पण 'तें मी सांगणार नाहीं' असें त्याला वचन दिलें असल्यामुळें आपण तें मला विचारूं नये." मेरीनें नम्रपणें व सौम्यपणें सुचवलें.

"मलासुद्धां न सांगण्यासारखें तें गुह्य आहे ? मि. ॲण्डरसन यांनीं उपरोधिक कठोर स्वरानें विचारिलें.

"मी तें कोणालाहि सांगणार नाहीं, असें नासरखानाला वचन दिलें आहे." मिसेस् ॲण्डरसन ह्मणाल्या.

"You tell the secret before five to-day, or you pack off,—पांच वाजण्याच्या आंत गुह्य काय आहे तें सांग, नाहीं तर चालती हो !" मि. ॲण्डरसन एकदम ह्मणाले, व खुर्चीवरून उठून आपल्या खोलींत जाऊन बसले.

मेरी ॲण्डरसननें आतां काय करावें ? गुह्य सांगावें, तर वचनभंग होणार; न सांगावें तर प्रियपतीशीं अशा तऱ्हेचा वियोग होऊन जगांत नाचक्की होणार ! एकदां वाटे कीं, सांगून टाकावें गुह्य; पुनः वाटे कीं दिलेलें वचन मोडणें चांगलें नाहीं. अशा प्रकारचा त्यांच्या अंतःकरणांत कलह चालला होता. त्या बराच वेळ तेथें खुर्चीवर बसून अश्रु ढाळीत राहिल्या, व कांहीं वेळानें आपल्या खोलींत निघून गेल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नासरखान वरील संभाषण लांबून ऐकतच होता. सूड घेण्याची आपली युक्ति पूर्णपणें साधली, असें वाटून त्याला प्रथम फार आनंद झाला; परंतु खोल विचार करून पहातां त्याला अशी भीति वाटूं लागली कीं, मेमसाहेब आपलें बिंग सांगून मोकळ्या होतील व मग आपला सगळा कावा बाहेर फुटेल ! या विचारानें तो इतका घाबरला कीं, आपली नोकरी गेलीच व आपणावर फिर्याद झाली, असें त्याला क्षणभर वाटलें व आतां येथून एकदम पळून जावें कीं कसें, याचा तो विचार करूं लागला. पण बिचाऱ्याची ऐन वेळीं कंबरच खचली. करावयास गेलों एक व झालें भलतेंच, असें ध्यानांत येऊन तो आतां अगदीं निराश, निरुत्साह, निर्जीव स्थितींत कांहीं मिनिटें भटारखान्याचें दार लावून आंत स्वस्थ पडला !

खरें सांगावयाचें ह्मणजे नासरखान जात्या निर्दय, क्रूर, खुनशी, धाडशी स्वभावाचा नव्हता, हें येथें नमूद केलें पाहिजे. त्याच्यामध्यें अनेक दोष असतील, व त्यानें विकारवश होऊन अनेक पापेंहि केलीं असतील; पण यावरून त्याचा स्वभाव पक्का डामरट व खुनशी होता, असें ह्मणतां येणार नाहीं. त्याच्या अंतःकरणांत उच्च विचारांना आणि विकारांना अगदींच कधीं थारा मिळत नव्हता, असें मला वाटत नाहीं. पुष्कळ वेळां त्याला सद्बुद्धि सुचत असे व त्यानें बरेच वेळां या सद्बुद्धीचें ह्मणणें वर्तनांतहि आणलें होतें. कसेंहि असो, एवढी गोष्ट खरी कीं, निराश होऊन तो भटारखान्यांत पडल्यावर त्याचें मन त्याला खाऊं लागलें, व गरीब बापड्या मेमसाहेबांवर नाहक भलता आरोप केल्याबद्दल त्याचें मन पश्चात्ताप पावूं लागलें. “ हाय, हाय !” उमाळा येऊन तो मनांत ह्मणाला “ मेमसाहेबांनीं माझ्यावर किती उपकार केले, व त्यांचे मीं कसे उपकार फेडले ! जिनें मला अनेकदां वांचविलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवरा घरांतून घालवून देण्यास तयार झाला असतांहि जी आपलें गुह्य सांगत नाहीं, तिचाच मीं नाश केला! या खुदा! मी पागल आहें, मी गुन्हेगार आहें! तोबा तोबा!"

दुर्दैव असें कीं, ही वृत्ति फार वेळ टिकली नाहीं. बुटांच्या लाथांची त्याला पुन: आठवण झाली; फिर्याद होऊन तुरुंगांत जाण्याची पाळी लवकरच येणार हाहि विचार मनांत आला व त्याचें अंत:करण संतापानें व भीतीनें व्याकूल झालें. मेमसाहेब थोडा वेळ दम धरतील, पण अखेर सर्व कबूल करतील असें तो मनांत ह्मणाला व असल्या बाईचा नाश करण्यांत कांहीं पाप नाहीं, असा त्यानें मनाशीं निश्चय केला, आणि ॲण्डरसनसाहेबांकडे जाऊन मेमसाहेबांबद्दल खोट्यानाट्या कांहीं गोष्टी आतांच्याआतांच सांगून टाकाव्या, व त्याचें मन त्यांच्या मडमेबद्दल कलुषित करावें, या हेतूनें तो त्यांच्या खोलीकडे जाऊं लागला. इतक्यांत त्यानें पांचाचे ठोके ऐकले.

मिसेस् ॲण्डरसन आपल्या पतीच्या खोलीकडे जात होत्या. या आपल्या आधीं जाऊन आपलें सर्व बिंग बाहेर फोडणार, अशी नासरखानाला धास्ती पडली, व आतां काय करावें हें त्याला सुचेना. येथून एकदम सूंबाल्या करावा असा त्याच्या मनांत पुन: विचार आला; पण पळून गेलों तरी पोलीस लोक मला पुन: धरून अणतील, अशी भीति पडून तो जागच्याजागींच तटस्थ उभा राहिला. मिसेस् ॲण्डरसननीं दिवाणखान्याशीं जाऊन दारावर 'टक टक टक' असा अवाज केला. 'आंत ये' असें मि. ॲण्डरसन ह्मणतील अशी तिची अपेक्षा होती; पण तसें कांहीं न होतां मि. ॲण्डरसन स्वत:च बाहेर आले व निर्दय दृष्टीनें तिच्याकडे पाहून "Well, have you made up your

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

mind?—काय तुझें मग ठरलें?—असें त्यांनीं संथपणें तिला विचारलें.'

"Robert, my dear, won't you give me more time to consider?—"रॉबर्ट, मला विचार करण्यास आणखी वेळ मिळाला तर बरें होईल." मिसेस् ॲण्डरसन प्रेमळ, व कोमल—किंबहुना केंविलवाण्या—वाणीनें म्हणल्या.

"No" मि. ॲण्डरसन यांनीं निश्चयात्मक कठोर स्वरानें उत्तर दिलें. 'I can no longer be fooled by woman's tears and loving words.—नाहीं. स्त्रियांच्या अश्रूंना व त्यांच्या प्रेमळ वाणीला फसून जाण्याइतका मी आतां मूर्ख राहिलेला नाहीं!"

त्या साध्वीला वरील शब्द वज्राघाताप्रमाणें वाटले. कांहीं क्षण ती तटस्थ उभी राहिली, व नंतर पुन: पतीची विनवणी व समजूत करूं लागली. "Robert, won't you have faith in your wife—your own dear Mary, whom you wooed and married only two years ago? Robert, do consider my position. I have engaged my word to the man. रॉबर्ट, दोन वर्षापूर्वींच आपलें माझ्यावर किती प्रेम होतें. याची आठवण करा आपण त्या वेळीं माझी प्रेमपूर्वक कशी मनधरणी केली व मीही किती आनंदानें आपली सहचारिणी होण्यास तयार झाल्यें, याची आठवण अगदीं गेली का? रॉबर्ट, मी नासरखानाला वचन देऊन चुकल्यें आहे म्हणून मला ही गोष्ट सांगतां येत नाहीं, याचा विचार करा."

रॉबर्ट ॲण्डरसननीं यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्यांना दोन वर्षांपूर्वींची, त्या वेळच्या निरतिशय प्रेमाची, उत्साहपूर्ण मनधरणीची,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व आनंदरसपूर्ण विवाहप्रसंगाची आठवण होऊन त्यांचे हृदय हेलावून गेलें. त्यांच्या डोळ्यांत अश्रुबिंदु दिसूं लागले. त्यांच्या मुखचर्येवरील कठोरता व निश्चयात्मकता गेली व तेथें औदासीन्य व संशयवृत्ति यांचा अंमल बसला. त्यांचे ओंठ कांपूं लागले आणि खालीं पायहि कांपूं लागले. त्यांच्या हातांतलें पुस्तक गळलें, अंगाला घाम सुटला व घेरी आल्यासारखें वाटून जवळच्या एका खुर्चीवर जाऊन ते बसले; परंतु लवकरच त्यांनीं आपलें मन आवरलें, व आपल्या मनोदौर्बल्याबद्दल स्वतःस दोष लावून घेऊन त्यांनीं थोडीशी कृत्रिम कठोरता धारण केली आणि म्हटलें "Mary, let us not waste our time; will you please be quick and settle the matter once for all?—मेरी, आपला वेळ उगाच व्यर्थ चालला आहे. एक काय तें लवकर उत्तर देऊन प्रकरणाचा लवकरच निकाल कां लावून टाकीत नाहींस?"

हें वाक्य ऐकून मेरी ॲण्डरसननें आपले अश्रु पुशिले व दीर्घ उसासा टाकला. त्यांच्या चर्येवर औदासीन्याची छाया तर होतीच, पण त्या छायेमध्येंहि एक प्रकारचें दिव्य पावित्र्यतेज होतें. आपल्या प्रिय पतीला सोडून जावें लागणार या दुःखानें तिच्या आरक्त झालेल्या नेत्रांतून प्रेमाश्रु एकसारखे गळत होतेच; पण सदाचारी दीन लोकांचा कैवारी जो क्राइस्ट त्याला तरी निदान आपण पारखे झालों नाहीं, या दृढ निष्ठेमुळें त्या तीर्थजलतुल्य प्रेमाश्रूंनींच तिच्या मुखावर रुचिर—मणींची शोभा पसरली होती. असो. ती खुर्चीवरून उठली व सगद्गद परंतु कोमल मधुर स्वरानें आपल्या प्रिय व मान्य पतीस ह्मणाली, "रॉबर्ट, मी जातें; दिलेलें वचन मोडण्याचा मला मोह पाडूं नका. माझें वर्तन आतां आपणांस अप्रिय वाटेल; पण कांहीं दिवसांनीं याबद्दल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्हांला माझी प्रशंसा करावीशी वाटेल, असें माझी मनोदेवता मला सांगते. रॉबर्ट,–प्रिय रॉबर्ट,–प्रियतम रॉबर्ट, मी आपणांस सोडून जात नाहीं,–माझें शरीरच केवळ आपल्या आज्ञेनें येथून जात आहे, व माझें हृदय येथेंच अडकून राहिलें आहे, हें ध्यानांत ठेवा. दोन दिवसांपूर्वीं मी आपणांस जें रागानें बोलल्यें त्याची क्षमा करा, व त्या दिवसाच्या मेरीची स्मृति विसरून दोन वर्षांपूर्वींच्या मेरीची आठवण करीत रहा. बरें आहे, मी जात्यें."

असें ह्मणून त्यांनीं नासरखानाला हांक मारली गाडीला घोडे लावून ती घेऊन येण्यास त्यांनीं त्याला आज्ञा दिली. पतिपत्नींमधील वरील संवाद नासरखान दुरून कां होईना, पण ऐकत होता. मेम-साहेब आतां आपलें बिंग फोडणार अशी त्याची अपेक्षा होती. पण त्यांचा तो उच्च प्रकारचा–दिव्य–निश्चय पाहून त्याच्या हृदयांत कसेंसेंच होऊं लागलें. त्याच्या उच्च मनोवृत्ति जागृत झाल्या व तो मेमसाहेबांना एकदम ह्मणाला, " मेमसाहेब, थांबा. मीच सर्व गोष्टी सांगून टाकतों. तुम्हीं मातेप्रमाणें माझें पालन केलें आहे, तुम्ही माझ्या माता आहां. माझ्याकरितां तुमचा नाश मी होऊं देणार नाहीं !" असें ह्मणून त्यानें लगेच ॲण्डरसन साहेबांना सर्व हकीगत सांगितली व आपला गुन्हा कांहींएक मागें न ठेवतां पूर्णपणें कबूल केला.

त्याची हकीगत ऐकून मि. ॲण्डरसन रागावले नाहींत; कारण आपल्या कोमल व प्रेमळ स्त्रीच्या अत्युच्च चारित्र्याच्या मानानें आपण फारच कमी योग्यतेचे आहों, असें त्यांना वाटूं लागून ते आपल्या मनांत ओशाळले होते. अशा या वृत्तींत असल्यामुळें ते नासर-खानावर संतापले नाहींत व मागाहून त्याच्यावर त्यांनीं फिर्यादहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली नाहीं हें खरें; पण त्यांनीं त्याला नोकरीवरून मात्र काढून टाकलें.

* * * *

नासरखानाचें पुढें काय झालें हें नक्की ठाऊक नाहीं. त्याला पुढें वेड लागलें असें कांहीं लोक ह्मणतात, व कांहीं लोक त्याच्या चारित्र्यांत अचानक क्रान्ति होऊन तो सदाचार–रत व विरक्त असा फकीर बनला, असें ह्मणतात. माझी माहिती अशी आहे कीं त्याच्या वृत्तींत खरोखरीच पालट झालेला असून तो आतां फकिरी वृत्तीनें *** या गांवाबाहेर एका झाडाखालीं बसलेला असतो व त्याच्या दर्शनार्थ हिंदु, मुसलमान व एखाद वेळेस कांहीं युरोपिअनहि जात असतात. तो कोणाशीं कांहीं बोलत नाहीं पण तसबीचे मणि ओढतां ओढतां 'अल्ला, अल्ला, मेरी, मेरी,' असे उद्गार मात्र त्याच्या तोंडून वारंवार निघत असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन स्वदेशींचा लढा

कलकत्ता, ९ मार्च, १९

प्रियमित्र मुकुंदराव,

माझी अवस्था आज कठीण आहे. माझा आणि 'नलिनी'चा आजपासून कायमचा विरह झाला! कारण 'स्वदेशी.' ती ह्मणते, 'तुह्मांला जसा तुमचा 'स्वदेश' प्रिय आहे त्याप्रमाणेंच मलाहि माझा 'स्वदेश' प्रिय आहे. तुम्हीं हिंदुस्थानाकरितां मरण्यास तयार आहांत, त्याचप्रमाणें मी इंग्लंडकरितां मरण्यास तयार असलें पाहिजे!

मुकुंदराव, १९०३ सालीं तुम्हीं कलकत्ता काँग्रेसला आलेत तेव्हांचा 'मी;' रेव्हरंड लॉकफेअरला व नंतर त्याच्या मुलीला ४० रुपयांकरितां बंगाली शिकविणारा 'मी;' एलन् लॉकफेअरवर प्रेम असतांना स्वदेशप्रेमामुळें तिच्याशीं विवाह करण्याचे विचार टाळूं पाहाणारा 'मी;' तिचेंहि प्रेम मजवर बसल्यावर व ध्येयें आणि आवडीनिवडी एक ठरल्यावर तिच्याशीं उत्साहपूर्वक विवाह केलेला 'मी;' आणि तिचा विरह झाल्यामुळें मूढ झालेला 'मी'—कसलीं हीं स्थित्यंतरें आणि कसलें हें नाटक!

कलकत्त्याला आलेत तेव्हां आपण मन मोकळें करून स्वदेशींवर, बहिष्कारावर वगैरे बोललों, व आपली मैत्री जुळली. 'आपल्या स्नेहांत कधीं ह अंतर यावयाचें नाहीं' असें मीं ह्मटलें होतें तें ऐकून तुम्हीं हंसलेत. तुमचें तें साभिप्राय मंदहास्य मला अजून आठवतें—"अंतर पडूं नये अशी माझी देखील इच्छा आहे, पण जगांत काय स्थित्यंतरें घडून येतील कोणाला ठाऊक?"—असा त्या किंचित् उदास अशा हास्याचा अर्थ होता. माझ्या आनंदी, उत्साही व श्रद्धापूर्ण अशा स्वभावाची त्या हास्यांत कोमल निंदा गर्भित होती व थोडीशी असूयाहि त्यांत होती. तुमचें हेंच आनंद-औदासीन्य-मिश्रित हास्य माझ्या विवाहाच्या मंगल दिवशीं पुनः दिसून आलें. 'माझ्यासारखा आनंदी मनुष्य जगांत दुसरा कोण आहे—माझ्या व माझ्या नलिनीच्या प्रेमाची सर कोणाला येणार आहे, आमच्यासारखें जोडपें जगांत सांपडणार नाहीं' असें मी तुमच्याशीं अर्धवट थट्टेनें व अर्धवट सद्भावानें ह्मटलें. तुह्मांला माझा विवाह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहून आनंद झाला होता, पण माझें फाजील उत्साहाचें भाषण ऐकून तुमचें तें किंचित् उदास असें साभिप्राय हास्य तुमच्या तोंडावर चमकूं लागलें. 'जगांत असला आनंद फार वेळ टिकणें कठीण असतें-टिकला तर उत्तम-टिकावा अशीच माझी इच्छा आहे-पण हें कठीण असतें' हा तुमच्या हास्याचा अर्थ होता. मला त्यावेळीं तुमचा राग आला, व तुमच्या अनुत्साही वृत्तीची मी चेष्टा केली; इतकेंच नव्हे तर निंदाहि केली. "माझ्या विशिष्ट वृत्तीचा हा दोष आहे" असें तुम्हीं ह्मटलेंत व आपली चूक प्रांजलपणें कबूल केलीत तेव्हां माझा राग शांत झाला. पण आज मी कबूल करतों कीं तुमचीच वृत्ति बरोबर होती. कारण "नलिनी" आज मला सोडून गेली!

आमचें लग्न झालें त्या वेळेस तुम्हीं हजर होतेत. तिचे धर्मबांधव व देश-बांधव तिला दोष देत होते तरी ब्राह्मो धर्म चांगला अशीं तिची खात्री झाल्यावर—प्रेमामुळें अशी 'आत्मवंचना' झाल्यावर असें ह्मणा पाहिजे तर—तिनें तो धर्म स्वीकारला. जॉन ब्लॉक्लेसारखा 'ज्यूट (Jute) च्या बाजाराचा राजा तिची मनधरणी करीत होता; पण त्या लक्षाधीशाला सुद्धां झिडकारून तिनें माझ्यासारख्या भिकाऱ्याला वरलें आणि आईबापांना सोडून ती माझी अर्धांगी झाली.

"तुमचें नांव 'नलिनीकांत,' तेव्हां तुमच्या बायकोचें नांव 'नलिनी' ठेवावें" असें तुम्हींच मला ह्मणालेत आणि मग तिच्याकडे वळून तुम्हीं तिला जेव्हां ह्मणालेत कीं 'काय, एलन् लॉकफेअर, तुम्हीं आपलें नांव बदलावयास तयार आहांत काय?' त्या वेळेस ती ह्मणाली, "मुकुंदराव मी आपल्या आईबापांना, भावांना, धर्माला-सगळ्यांना-ज्याच्याकरितां सोडिलें, त्याला जर 'नलिनी' हें नांव प्रिय असलें तर मी या बाबतींत हरकत घेईन असें तुह्मांला वाटतें काय?" हा प्रसंग तुम्हांला आठवतो आहे ना? आणि तीच 'नलिनी' मला आज टाकून गेली!

माझ्याशीं भांडून गेली असती तर हरकत नव्हती; पण भांडण नाहीं आणि कांहीं नाहीं. प्रेम होतें तसें कायम असतांना ती गेली! कां, तर ती म्हणते, 'तुम्ही इंग्लंडचे शत्रु, तेव्हां माझेहि शत्रु.'

स्वदेशीच्या आणि बहिष्काराच्या चळवळींत तिनें आपणांला किती मदत केली हें तुह्मांला ठाऊक आहेच. तुम्हीं कलकत्त्यास १९** सालीं आलेत तेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिच्याच प्रोत्साहनानें आपण एक 'स्वदेशीसमिति' काढली. तुम्हांला पोलिसांनीं पकडलें हें आम्हांला *** गांवीं कळलें. 'अमृत-बझार-पत्रिकें'त आलेली ती बातमी ऐकल्यावर तिनें निराशेचा व दुःखाचा श्वासोच्छ्वास टाकला व तिच्या डोळ्यांत अश्रुबिंदु आले. कांहीं तरी निमित्त करून तिनें ते हळूच पुसले व मला म्हणाली, "ठीक आहे, स्वदेशीकरितां असले हे कष्ट भोगावे लागावयाचेच." पण यानें माझें समाधान झालें नाहीं. मी अमृत-बझार-पत्रिका वाचूं लागलों. पण लक्ष लागेना. तुमची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिली व मग दाबलेलें रडूं एकदम कोसळलें. नलिनीलाहि मग उमाळा आवरेना. कांहीं वेळानें मी उसासा टाकून उठलों व इकडे तिकडे फिरूं लागलों. 'स्वदेशी अधिक जोरानें करावयाची हेंच या दडपशाहीला उत्तर' असें मी अर्धवट तिला उद्देशून व अर्धवट मनांत बोललों. 'हाच उपाय' ती म्हणाली व तिनें डोळ्यांतला बिंदु पुसला. इतक्यांत एक पोलिस येऊन दार ठोठावूं लागला. झालें. वारंट, अटक, कच्चीकैद, खटला, सजा, सर्व विधि होऊन मी 'राजाचा पाहुणा' बनलों! माझ्या गैरहजिरींत तिनें त्या गांवीं स्वदेशीचा किती पुरस्कार केला हें तुम्हांला ठाऊक आहे. पण तीच आज उलटली आहे! "तुम्हीं इंग्लंडचे शत्रु आहांत; किती केलें तरी मी 'इंग्लिशवूमन' आहें—मला पतीपेक्षां माझा स्वदेश अधिक प्रिय आहे" असें ती म्हणते. 'लग्न केलेंस त्या वेळेस समजत नव्हतें का तुला हें?' मी रागानें विचारलें. 'त्या वेळेस व नंतरहि मी प्रेमानें अंध झालें होतें' तिनें शांतपणें उत्तर दिलें!

मुकुंदराव, तुम्ही ताबडतोब इकडे निघून या. मी वेडा होत चाललों आहें. पत्र कसें तरी लिहिलें आहे व लिहीत आहें. तुम्ही तरी तिला चार गोष्टी सांगून पहा. तुम्ही, तिची आई, तिचीं मुलें, तिची बहीण, दोन भाऊ आणि मी—यांशिवाय दुसऱ्या कोणावर तिची विशेष भक्ति नाहीं. मुलें बोलून चालून अजाण; आई, बहीण, भाऊ, सगळे मँचेस्टर येथें; माझ्यावर प्रेम असून राग; तेव्हां तुमच्याशिवाय ती कोणाचें ऐकणार नाहीं. रजा घ्या, नाहीं तर नोकरी सोडा. ताबडतोब आले नाहींत तर मला वेड लागेल किंवा मी मरेन किंवा मी आत्महत्त्या करून घेईन, यांत काय तें समजून घ्या.

आपला

नलिनीकांत बानर्जी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. क. सगळेंच मुसळ केरांत. वेड खरेंच लागलें म्हणावयाचें. 'स्वदेशी'चें भांडण केव्हां कसें झालें हें सांगावयाला विसरलोंच. 'हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण' या विषयावर मी 'बंगाली समालोचका'करितां आर्टिकल लिहीत होतों, नव्हे, मी सांगत होतों आणि नलिनी लिहीत होती (हल्ली तिचें बंगाली अक्षर चांगलें सुधारलें आहे. पण त्याचा आतां काय उपयोग ? असो.) सांगतां सांगतां हिंदी गिरण्यांतील सुताच्या कापडांवरील 'एक्साइज' जकाती-संबंधानें मी आवेशांत येऊन असें विधान केलें, कीं "लँकेशायरच्या लोकांचें नुकसान होईल म्हणून हिंदुस्थानावर अशा प्रकारची जकात बसविणें अन्यायाचें आहे. लँकेशायरच्या लोकांकरितां हिंदी लोकांना हा स्वार्थत्याग करावयास लावणें अर्थशास्त्रदृष्ट्या व नीतिदृष्ट्या निंद्य आहे. लँकेशायरचे मजूर हे आमचे काकेमामे लागत नाहींत; त्यांना चैन करावयास सांपडावी म्हणून आम्हीं कां मरावें ? लँकेशायरचें वाटेल तें होवो, आम्हांला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आम्हांला हिंदुस्थानचें हिताहित स्व-संरक्षणाच्या दृष्टीनें पाहावयाचें आहे, लँकेशायर जगतें का मरतें हें पाहाण्याचें आम्हांस कारण नाहीं."

हीं वाक्यें मी जोरांत सांगून गेलों व तिनें तीं भराभर लिहून टाकलीं. आणखी पुढें मी सांगूं लागणार इतक्यांत नलिनी म्हणाली, 'हीं वाक्यें जरा बदलावयास नकोत का ?'

"कां ?' मी विचारलें, '१२४ अ' खालीं सांपडण्याची तुला भीति वाटते होय ? वाच पाहूं पुनः"

"१२४ अचा प्रश्न नाहीं. आपलीं विधानें बरोबर आहेत काय ? लँकेशा-यरची आपल्याला कांहींच पर्वा नाहीं ?"

"मुळींच नाहीं. तेथले एकूण एक सर्व लोक मेले तर मला त्याचें मुळींच कांहीं वाटणार नाहीं."

"वादाच्या भरांत असें म्हणतां कां खरेंच आपल्याला असें वाटतें?" तिनें पुनः विचारलें.

"खरोखर माझी अशी भावना आहे. लँकेशायरचा आणि आमचा संबंध काय ?" मी चकचकीत उत्तर दिलें.

हें उत्तर ऐकल्यावर ती कांहीं बोलली नाहीं, पण तिच्या मनाला मोठा धक्का बसला असें तिच्या चर्येवरून दिसून आलें. इतक्यांत मला आठवण झाली कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिची बहीण–तुम्हीं १९ * * सालीं आले होतेत तेव्हां आमच्याकडे एक दिवस आली होती ती–मँचेस्टरमध्यें राहाते. तिचे दोन भाऊ तेथेंच गिरणीमध्यें काम करतात हेंहि मला लगेच आठवलें. तिला वाईट कां वाटलें हें माझ्या लक्ष्यांत आल्यावर मी ह्मटलें,

" तुझ्या आईची आणि बहिणीची आठवण झाली होय तुला ? माझें विधान चुकीचें होतें खरें. पण नलिनी, असल्या विधानांचा शब्दशः अर्थ करावयाचा नसतो हें तुला देखील समजूं नये ना ?"

" मी चुकलें. मला कांहीं समजत नाहीं. माझ्या मनाचा घोंटाळा झाला आहे आणि मला आतां कांहीं सुचत नाहीं. आपण सांगावयाला लागावें आतां पुढें."

मीं सांगूं लागलों. पण माझ्या तोंडांतून सरळ व शुद्ध वाक्यच येईना. वाक्यें लांबलचक किंवा बेढब होऊं लागलीं. इतक्यांत तिच्या डोळयांतून दोन तीन अश्रु कागदावर पडले ते मला दिसले.

अशा प्रसंगीं तोंडानें सांत्वन करण्यापेक्षां मौन धरलेलें बरें असा विचार करून मी स्वस्थ बसलों व तीहि तेथेंच सचिंत बसली. कांहीं वेळानें ती म्हणाली:—कांत, आजपासून आपण माझे ' कांत ' नाहीं; आपलें व माझें सख्यहि आजपासून संपलें. आपला स्वदेश हिंदुस्थान; माझा स्वदेश इंग्लंड; आपण हिंदुस्थानचे कैवारी आहांत; मला इंग्लंडचा कैवार घेतला पाहिजे.'

" नको कोण म्हणतो आहे ? इंग्लंडचें आणि आमचें कांहीं वैर नाहीं."

" या शाब्दिक कोट्यांनीं माझें आतां समाधान व्हावयाचें नाहीं. मी आपल्याशीं लग्न केलें हेंच माझें चुकलें. आपली स्वदेशाबद्दलची प्रीति, आपला स्वदेशाभिमान, आपली स्वार्थत्यागाची तयारी, आपलें पवित्र आचरण, इत्यादि गोष्टींनीं आपण मला लहानपणीं प्रिय झालेत व मी विकारवश होऊन तुमच्याशीं विवाह केला. त्यावेळीं मला वाटत होतें कीं, हिंदुस्थानच्या लोकांवर इंग्लंड मोठा अन्याय करीत आहे. या अन्यायाचा प्रतिकार करणारे सर्व स्वदेशी लोक मला त्यावेळीं आवडत असत. आपल्या सद्गुणांनीं मला आपण मोह घातला आणि त्यामुळेंच मी आपला ' स्वदेश ' त्यावेळीं विसरलें. पण आतां माझे डोळे उघडले–"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"नलिनी," मी ह्मटलें–मी पत्र लिहीत आहें कां ही कादंबरी आहे हें समजत नाहीं–केवढें तरी पत्र हें वाढत चाललें आहे–बुक पोस्टानेंच पाठविलें पाहिजेत हे नोटपेपर्स. परंतु तुम्हांला सर्व हकीगत कळविली पाहिजे—ताबडतोब येण्यास मात्र चुकूं नका. ती तर निघून गेली. मुलांनाहि तिनें बरोबर नेलें. माझें घर बागेसारखें फुललेलें होतें, तें आतां शुष्क झालें आहे. दोघां मुलांना घेऊन जातांना पाहिलें तेव्हां वाटलें कीं, 'शरच्चंद्रा'ला आपण ठेवून घ्यावें, आणि अंगावरच्या 'अरविंदा'ला तिला नेऊं द्यावें. थोरल्यावर तिचा हक्क नाहीं. पण त्याला तिचा फार लळा आणि त्याच्यावर तिचें फार प्रेम. कायदेशीर हक्क बायकोपाशीं काय लढवावयाचा ? आणि नलिनीसारखी बायको–ती मल सोडून गेली, पण इतर बायकांसारखी सोडून गेली नाहीं. तत्त्वाकरितां सोडून गेली. तत्त्वाच्या कुंडांत प्रेमाची–कोमलतेचीहि–तिनें आहुति दिली. मुकुंदराव, या 'तत्त्वां'नीं काय घोटाळा केला आहे जगांत ! 'तत्त्वा'करितां आह्मी–'आह्मी' वर जोर द्यावयाचा—**आह्मी** वेगळें राहावें ना? 'शरच्चंद्राला मजजवळ ठेवतेस का ?' असें मी तिला विचारलें. ती ह्मणाली, 'हो, ठेवलेंच पाहिजे. कायद्यानें आपल्याला तो हक्क दिलाच आहे.'

'नलिनी, तूं वेगळी राहा; पण कायद्याची भाषा माझ्याशीं बोलूं नको. कायद्याचीं बंधनें लुच्चांकरितां आहेत, आपल्याकरितां प्रेमाचीं आणि सत्तत्त्वांचीं बंधनें आहेत. शरच्चंद्र मजजवळ राहावा असें मला वाटतें. पण नको, तूंच घेऊन जा. माझ्याकरितां तूं थोडा का स्वार्थत्याग केला आहेस ? आईबाप सोडलेस; भाषा बहुतेक सोडलीस; वेष बदललास; चालीरीती आमच्या घेतल्यास; हिंदुस्थानाला इतके दिवस 'स्वदेश' ह्मणून 'स्वदेशी'ला साहाय्य केलेंस. आतां तुला इंग्लंड हा स्वदेश वाटतो, आणि हिंदुस्थान शत्रु वाटतो; नशीब आपलें! तुला मी पुष्कळ दुःख दिलें आहे; क्षमा कर. शरच्चंद्राला तूंच घेऊन जा. जाईवरचीं फुलें जाईवरच असलेलीं चांगलीं."

मुकुंदराव, तुम्हीं मागें मला एकदां म्हणाले होतेत कीं, "स्वदेशाच्या दिवसांत आपण जन्माला आलों हें आपलें महद्भाग्य; त्या योगानें आपली आत्मोन्नति कितीतरी होत आहे." असेल. पण 'स्वदेशी'"नेंच माझा अखेर सर्वस्वी घात केला ! मी 'स्वदेशीवाला' ह्मणूनच माझ्यावर सात्त्विक नलिनीचें प्रेम बसलें. तिची वृत्ति आतां राजस झाली आहे ह्मणून ती माझा त्याग करून गेली—का माझीच वृत्ति राजस आहे ह्मणून मी तिला दोष देत आहें ? का,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ती मूर्ख, आणि मीहि मूर्ख ? दोघेंहि मूर्ख हेंच खरें दिसतें. पहिल्या पासूनच ती थिऑरेटिकल होती. भावना सात्त्विक, कोमल व तीव्र अशा लोकांचें हें असें व्हावयाचेंच. मीहि असाच आहें. तुम्ही मला 'थिऑरेटिकल फूल' ह्मणतांच, मी तुह्मांला तेंच ह्मणतों. आपण सर्वच 'फूल' आहोंत झालें ! पत्राला आरंभ कोठें केला, मध्यंतरीं आलों कोठें, आतां वाहवलों आहें कोठें, हें मला समजत नाहीं. मुद्दा तुह्मांला समजला आहे. ताबडतोब निघून या. नोटपेपर संपले. पोस्टाचीहि वेळ झाली. ह्मणून आतां संपवितों.

आपला

नलिनीकांत.

प्रकरण दुसरें

चित्रपट

" ताबडतोब निघून या. कारण पत्रांत. नागपूर स्टेशनच्या पत्त्यावर पत्र येईल."

" तार पाहातांच निघा " अशी तार आल्यामुळें मुकुंदराव पुण्याहून रात्रींच्या गाडीनें निघून नागपूर मेलनें कलकत्त्यास जात असतां नागपूरच्या स्टेशनवर त्यांना वरील पत्र मिळालें. पत्राकरितां त्यांना बरीच विचारपूस करावी लागली. कारण तें बुकपोस्टानें आलें होतें व पोस्टमास्तरला कांहीं संशय येऊन त्यानें तें फोडून वाचल्यानंतर स्टेशनवर पाठवून दिलें होतें; आणि तें तेथील एका कारकुनाच्या ऑफिसांतच कांहीं वेळ पडलें होतें. पत्र मिळाल्यावर गाडींत आपल्या जागेवर बसून मुकुंदरावांनीं तें पत्र एकदा भराभर वाचलें व मग पुनः मधूनमधून दोनतीनदां वाचलें. मिस् 'एलन् लॉकफेअर'ला नलिनीकांत जेव्हां शिकविण्यास जात होते, तेव्हांपासूनची त्यांची आणि मुकुंदरावांची १९०३ मधल्या कलकत्ता कॉंग्रेसच्या व त्यावेळच्या 'स्वदेशी' संमेलनाच्या निमित्तानें ओळख झाली होती. ओळख झाल्यावर प्रांता-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांतात अधिक स्नेहभाव वाढावा व स्वदेशी चळवळीला संघटित स्वरूप यावें ह्मणून दहावीस जणांनीं 'अल्पारंभः' या न्यायानें एक संस्था काढली. या स्वदेशी–समितीमुळें या ओळखीचें स्नेहांत रूपांतर झालें होतें. मुकुंदरावांनीं आपल्या परमस्नेह्याचे–बायकोपेक्षांहि प्रिय व मान्य असलेल्या स्नेह्याचें–तें शोकवार्ताहर पत्र वाचलें व त्यांच्या नेत्रांत दोन लहान अश्रुबिंदु आले. त्यांनीं दीर्घ निःश्वास टाकला व उपर्णे, कोट वगैरे काढून डब्याच्या खिडकींतून स्टेशनवरील उतारू, पानविके, फळविके, वगैरेकडे पाहूं लागले. 'पाहूं लागले' ह्मणण्यापेक्षां त्यांचे डोळे तिकडे होते असें म्हटलें पाहिजे. कारण ते शून्य दृष्टीनेंच तिकडे पाहात होते. सर्व लक्ष अंतर्मुख होतें. त्यांच्या स्मृतिपटलावर नलिनीच्या, नलिनीकांताच्या, व स्वतःच्या चरित्राचीं अनेक चित्रें एकामागून एक सिनेमांतील देखाव्याप्रमाणें येत होतीं व त्यांचें सारें लक्ष त्या चित्रांकडे लागलें होतें.

* * * *

"कान्त, मिस् एलनला शिकविण्यास जातां खरे; पण संभाळा हो, कालिदास ह्मणतो त्याप्रमाणें गृहिणी ही ललितकलांमध्यें प्रियशिष्या झाली तर उत्तम; पण आधीं प्रियशिष्या असून मग ती जर 'गृहिणी' झाली, तर हें लोकांत तरी वाईट दिसतें. आणि एकंदरींत हा गौणच प्रकार."

"कांहीं तरी बोलतां झालें," नलिनीकांतानीं उत्तर दिलें, "माझ्या मनांत देखील हे विचार येत नाहींत, त्यांतून ती युरोपिअन. माझें मन तिच्यावर पुष्कळ बसेल; पण ती माझ्याशीं लग्न करावयास कबूल झाली पाहिजे ना? त्यांतून पुनः मी नॅशनॅलिस्ट; जवळ विशेष पैसाहि नाहीं. जॉन ब्लॉकूले–'**ब्लॉकूले, फिलिप् ॲण्ड को.**' चा येथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख्य चालक—तिच्याकडे हल्लीं येरझारा घालीत असतो. त्याच्यासारख्या स्वजातीय, तरुण, लक्षाधीश, अशा........"

हा चित्रपट गेल्यावर दुसरा चित्रपट डोळ्यांपुढें आला. मनच तें, मनांतले चित्रपट एकदम कोण कसे बदलतो हें मानसशास्त्रवेत्त्यांनीं पहावें, कथालेखकाचें तें काम नाहीं. असो. पुढील चित्रपट असे होते.

" मुकुंदराव, ती 'ब्रह्मो' होण्यास तयार आहे. बंगाली वेष घेण्यास देखील ती तयार आहे. आईबापांना सोडण्यास तयार आहे. बंगालची फाळणी रद्द करून घेण्याकरितां माझ्याबरोबर तुरुंगांत येण्यास तयार आहे. तिच्या अशा सात्त्विक प्रेमाला...."

* * * *

" नलिनीकांत, मिस् एलनची शिकवणी धरलीत येथेंच घसरलें, तिच्याशीं सामाजिक, राजकीय वगैरे बाबतींत संभाषण केलेंत, ही दुसरी चूक झाली. आतां त्याचे सर्व परिणाम भोगले पाहिजेत. जगांत जर देशादेशामध्यें भेदभाव नसता तर तुमचा विवाह अत्यंत अभिनंदनीय झाला असता. अस्तु. जगाचे मालक आपण नाहीं, आणि चालकहि नाहीं; आपण केवळ प्रेक्षक. सर्व गोष्टी आपल्या मनासारख्या कशा घडून येतील ? एलनचा स्वभाव चांगला आहे; पण तिचे मनोविकार तीव्र आहेत. तुमचें कसें पटेल तें पटो....परंतु जगांत सर्वगुणसंपन्न अशीं माणसें कशीं मिळणार ? आपण तरी कोठें सर्वगुणसंपन्न आहोंत ? तेव्हां करा झालें लग्न. आपल्या कार्याला तिची चांगली मदत होईल.

* * * *

" तुह्मांला, मी नलिनीवहिनी ह्मणूं का मिसेस बानर्जी ह्मणूं ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"मी जातीनें महाराष्ट्रीय ब्राह्मण असतें तर तुम्ही काय ह्मटलें असतेंत ?"

"नलिनीवहिनी ह्मटलें असतें."

"झालें तर, त्याच नांवानें मला हांक मारा."

"नलिनीवहिनी, आज तुह्मांला आम्ही स्वदेशीसमितीचें मेंबर करून घेणार."

"अवश्य. मी लग्न केलें तें याचसाठीं. हिंदुस्थानची कांहीं तरी माझ्या हातून सेवा व्हावी अशी माझी इच्छा आहे. पूर्वजन्मीं मी हिंदी असलें पाहिजे. मला तुम्ही लोक फार आवडतां. मी आपल्या वडिलां-बरोबर ऑस्ट्रेलियांत व अमेरिकेंत गेलें होतें. पण हिंदी लोकांची सात्त्विकता निराळीच. मी इंग्लंडांत जन्मलें, पण माझें मन हिंदी आहे. मला आपलें रामायण, आपली भगवद्गीता, आपली सीता, आपली सावित्री, आपले ते ऋषि, त्यांची ती तपश्चर्या, आपले गोखले, टिळक मला फार आवडतात................"

"पण 'नलिनीकांत' सर्वांत अधिक आवडतात!"

"खरें आहे. पण....तुमच्या या चेष्टेनें माझी विचारांची सांखळी तुटली. मी काय म्हणत होतें? होय. मला हिंदी लोक फार आवडतात. हिंदुस्थान हाच मला स्वदेश वाटतो. मला इंग्लडमधल्या भूमींत जन्माला आणणाऱ्या देवाची थोडीशी चूक झाली!"

* * * *

उपर्णें तोंडावर घेऊन डब्यांतील बांकावर पसरलेल्या मुकुंदरावांच्या स्मृतिपटलावरील आणखी एक चित्रपट:—

* * * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" मुकुंदराव, नलिनी ह्मणत आहे, " तुम्ही आणि कान्त स्वदेशी-करितां तुरुंगवास भोगलात. आतां माझी नाहीं का पाळी ?"

" तुह्मांला कोणी देखील कैदेंत घालावयाचा नाहीं. ' बायको ' आणि त्यांतून युरोपिअन—मग बघावयासच नको. आजकाल बायकोच्या जन्माला यावें. चार यत्ता झाल्या नसल्या तरी सभेंत सर्वांपुढें खुर्ची; एक दोन लेख व तीन चार व्याख्यानें दिल्याबरोबर 'विदुषी' ही पदवी; राजकारणांत कधीं चुकून कडक बोललीच तरी देखील हरकत नाहीं. तिच्या अंगाला कोणी हात लावूं शकत नाहीं."

" नलिनीकांत, ' कोणी हात लावूं शकत नाहीं' हें म्हणण्याचा आपणाला अधिकार नाहीं. आपण त्यांचें पाणिग्रहण........"

" नॉन्सेन्स. " नलिनी म्हणते " अजून तुम्हांला शाब्दिक कोट्या कराव्याशा वाटतात ना ? पण मुकुंदराव, मला तुरुंगवास सोसवेल का ? तुरुंगांत बायकांना काय काम देतात ?"

" चरक्यावर लोंकर, नाहीं तर सूत काढण्याचें, किंवा सुताला पीळ देण्याचें काम असतें. कांहीं ठिकाणीं, ज्वारी बाजरी नीट करण्याचें...."

" पुरे, पुरे, प्रसंग आल्यावर आपोआप समजेल." नलिनीकांत म्हणाले, " I cannot bear the idea of her going to prison."

" बरें, नलिनीवहिनी, हा विषयच बदलतों. जॉन ब्लॅकूले पर्वा आपल्याकडे कशाला आले होते ?"

" ते म्हणतात कीं, लग्न नाहीं तर नाहीं. 'मित्र' ह्मणून आपल्या-कडे येण्याची मला परवानगी असावी."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" गृहस्थ चमत्कारिक दिसताहेत मला." मुकुंदराव ह्मणाले.

" नाहीं, नाहीं. तुमचा गैरसमज आहे. " नलिनीकांत ह्मणाले. " त्यांचें हिच्यावर प्रेम होतें, हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? मुकुंदराव, तुम्हांला नलिनीसारख्या स्त्रियांच्या प्रेमपाशांत सांपडणें म्हणजे काय आहें, हें ठाऊक नाहीं, ह्मणून तुम्हीं ब्लॉकूलेनां दोष देतां. मी तरीं त्यांना दोष देणार नाहीं."

अशा प्रकारचे विविध चित्रपट मुकुंदरावांच्या मनःचक्षूंसमोरून केवळ दोनचार मिनिटांच्या अवधींत येऊन गेले असतील. नंतर त्यांना नलिनीकांताच्या पत्राची आठवण झाली व त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. डोळ्यांवर उपणें होतें ह्मणून बरें झालें, नाहीं तर रडण्याचीहि चोरी झाली असती. नलिनीकांताची, नलिनीची आणि त्यांची आज कांहीं नाहीं तरी आठ दहा वर्षांची ओळख. त्यांनीं तिघांनीं मिळून प्रथम एक ' स्वदेशसेवक ' मासिक काढलें; तें हिंदी–बंगाली–इंग्रजी असें असे. बंगाली बाजू नलिनीकांतांकडे, इंग्रजी नलिनीकडे व हिंदी मुकुंदरावांकडे, अशी व्यवस्था होती. पुढें तें मासिक बंद पडलें–अथवा पाडलें गेलें. नंतर त्यांनीं साप्ताहिक काढलें, त्यांत पैशाची तूट आली ह्मणून तें बंद झालें. नलिनीला गरीबी ठाऊक नव्हती, पण 'कांतां'च्या संगतीनें त्या बयेची आणि तिची चांगलीच ओळख झाली. युरोपिअन बाईनें हिंदुस्थानांत स्वहस्तानें जीं कामें कधीं केलीं नाहींत, तीं तिनें केलीं. अखेर देशाभिमानामुळें दोघेंहि भुकेबंगाल होऊन तिला शिकवणी धरावी लागली. नलिनीकांतांना बारिसालच्या एका सुप्रसिद्ध श्रीमान् गृहस्थानें बॅरिस्टर होण्याकरितां विलायतेला पाठविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिकडे जाण्यास ज्या दिवशीं ते निघाले, त्या दिवशींच ' शरच्चंद्र ' जन्मला. अस्तु. अशीं अनेक संकटें भोगल्यानंतर त्यांना आतां कोठें सुख मिळूं लागलें होतें. नलिनीकांताची बॅरिस्टरी बरी चालली होती. शरच्चंद्र बोलूंचालूं लागला होता. शरच्चंद्रापाठीमागें 'अरविंद' झाला त्याचे गुण तर विचारूंच नका. मुकुंदरावांनीं अनेक बालकें पाहिलीं होतीं व त्यांनाहि एक चांगलें गोरेंगोमटें मूल झालें होतें. त्यांचें त्याच्यावर अतोनात प्रेम; पण अरविंदाचे गुण पाहून त्यांना तो आपल्या मुलापेक्षांहि अधिक प्रिय झाला होता. सुशील व सुस्वरूप पत्नी, मुबलक पैसे, उत्तम मुलें, परिस्थित्यनुरूप देशसेवेची संधि इत्यादि गोष्टी ज्यांना लाभतात ते महाभाग्यवान् ह्मटले पाहिजेत. नलिनीकांतांचें भाग्य खरोखर दृष्ट पडण्यासारखें होतें. आणि नजर पडलीहि ! अस्तु.

प्रकरण तिसरें

कलकत्त्यास

कलकत्त्यास गेल्यावर नलिनीकांत व मुकुंदराव यांचें काय बोलणें झालें, त्या दोघांचे हातरुमाल अश्रूंनीं व नाकांत आलेल्या पाण्यानें किती भिजले, डोळे कसे लाल झाले, या गोष्टींचें वर्णन करण्याची जरूरी नाहीं. गाडी सकाळीं हौऱ्यास (कलकत्त्यास) पोंचली. नलिनी ज्या हॉटेलांत राहण्यास गेली होती तेथें दुपारीं ते गेले. कार्ड आंत पाठविल्याबरोबर नलिनी बाहेर आली. हिंदी पोशाख तिनें आतां टाकला होता. ती आतां ' इंग्लिश–वूमन ' झाली होती. हस्तांदोलन वगैरे झाल्यावर ती ह्मणाली, " मुकुंदराव, आपण येणार हें मला ठाऊक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्मणून मी तुम्हांला पत्र लिहिलें नाहीं. आपली मी किती तरी वाट पाहात होतें ! मी " कान्तांना " कां सोडलें हें तुह्मांला कळलेंच आहे. मी तुह्मां दोघांना दुःखसागरांत लोटलें आहे; पण मी काय सुखशय्येवर लोळत आहें ? मी आनंदानें का 'कान्तां' चा त्याग करीन ?" पुढें नलिनीला बोलवेना. मुकुंदरावहि कांहीं बोलले नाहींत. सकाळच्या अश्रुधारांची व हुंदक्यांची पुनरावृत्ति झाली. कांहीं वेळानें मकुंदराव ह्मणाले,

"नलिनीवहिनी, इंग्लंड तुमचा 'स्वदेश' हें खरें. पण इंग्लंडचें आणि हिंदुस्थानचें सदैव वांकडें असावें असा कोठें शास्त्रार्थ आहे ?"

" पण केव्हां ना केव्हां तरी कलहाचा प्रसंग येणारच ना ? दोघांचे हितसंबंध निराळे आहेत. आज नाहीं उद्यां, दहा वर्षांनीं, शंभर वर्षांनीं—

" नलिनीवहिनी, असल्या कल्पना करण्यांत काय अर्थ आहे ? सात्त्विक वृत्तीनें दोन्ही राष्ट्रांनीं राहण्याचा विचार केला तर दोघांचे हितसंबंध भिन्न किंवा विरोधी मुळींच नाहींत. इंग्लिश लोक किंवा हिंदी लोक तामसी किंवा राजसी वृत्ति स्वीकारूं लागले तर मात्र विरोध अपरिहार्य आहे खरा."

" मुकुंदराव, समजा, पंचवीस वर्षांनी इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामध्यें मोठा कलह उत्पन्न झाला आहे; अशा प्रसंगीं माझ्या शरच्चंद्रानें आणि अरविंदानें इंग्लंडची बाजू घ्यावी कीं हिंदुस्थानची ? बापाची का आईची ? आणि मी काय करावें ? अविचारानें केलेल्या लग्नामुळें मला स्वतःला स्वदेशद्रोह तरी केला पाहिजे, किंवा पतिद्रोह तरी केला पाहिजे आणि माझ्या मुलांनीं आईला तरी मारली पाहिजे किंवा बापाला तरी मारलें पाहिजे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"नलिनीवहिनी, काल्पनिक उदाहरणें घेऊन पाहिजे त्याला पाहिजे तेथें अडवितां येईल. 'व्यवहार' ह्मणून जगांत कांहीं आहे किंवा नाहीं ?"

"माझ्या प्रश्नाचें आधीं उत्तर द्या. तत्त्वाकरितां भांडणारीं माणसें कल्पनेच्या साम्राज्यांतच वावरत असतात. 'स्वराज्य' मिळालें नाहीं, ह्मणून 'व्यवहार' कोणाचा अडला होता असें नाहीं ? मग तुम्हीं कां त्या करितां एवढे भांडतां ? हे प्रश्न तत्त्वाचे आहेत. अशा प्रश्नांत रोजच्या व्यवहारापेक्षां दूरदृष्टीच्या कल्पनेला अधिक महत्त्व दिलें पाहिजे."

"तुमचा प्रश्न काय आहे ? इंग्लंड व हिंदुस्थान यांमध्यें कलह उत्पन्न झाला असतां पतिद्रोह करावा का देशद्रोह, असाच ना ? याचें सरळ उत्तर असें आहे. ज्या बाजूला सत्य असेल, जो पक्ष सत्पक्ष असेल, त्या बाजूला तुम्हीं मिळावें, मग तो पतीचा पक्ष असो वा नसो. हिंदुस्थानच्या लोकांचा पक्ष सत्पक्ष आहे ह्मणून तुही आह्मांला पूर्वीं मिळाल्यातच ना ? तसेंच पुढेंहि. बरें, आमचा पक्ष असत्पक्ष ठरला तर इंग्लंडची बाजू घ्या."

"मुकुंदराव, मित्रप्रेमामुळें तुम्हीं अयुक्तिक भाषण करीत आहांत."

"नलिनीवहिनी, दुराग्रहामुळें आपण....पुढें बोलत नाहीं मी."

"मुकुंदराव, तुम्हीं रागावलेले दिसतां. आपण पुनः बोलूं; याविषयीं माझी खात्री करून द्या, म्हणजे मी 'कांतां'च्या पायां पडेन आणि मला पुनः पदरांत घ्या असें ह्मणेन. मला तेंच पाहिजे आहे. माझा शरच्चंद्र एकसारखा त्यांची आठवण काढीत असतो. अरविंदहि तसाच. दोघांना अगदीं चैन पडत नाहीं. मला स्वतःला जीव नकोसा झाला आहे. मी....सुखानें का बाहेर निघालें आहे ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नलिनीचा दुःखावेग मुकुंदरावांना पाहावेना. ती मुक्तकंठ रडूं लागली, तेहि पुनः रडूं लागले. इतक्यांत कोणी दार ठोठावलें. नलिनीनें डोळे चोळले व दार उघडण्यास ती गेली. घराबाहेर शरच्चंद्र होता. त्यानें आपल्या आईच्या हातांत एक कार्ड दिलें व 'बाहेर बसले आहेत ते; त्यांच्याबरोबर दोन बायका आहेत; त्यांना आंत आणूं का?' असें ह्मणाला. "त्यांनीं मला हा पोपट दिला" असेंहि तो लगेच ह्मणाला व पोपट (चित्र) आईला दाखवूं लागला. क्षणार्धांत त्याची दृष्टि मुकुंदरावांकडे गेली. त्यानें त्यांना ओळखलें, पण त्यांच्याजवळ जाण्यास तो लाजूं लागला व आईचा झगा धरून तिच्या पाठोपाठ मुकुंदरावांकडे चोरून पाहात पाहात आला. नलिनीनें कार्डावर ' John Blockley, Esq., हें नांव वाचल्यावर तिच्या कपाळावर आंठ्या चढल्या, व ती मुकुंदरावांकडे येऊन ह्मणालीं, "This man is again making love to me" (हा गृहस्थ पुनः माझी मनधरणी करीत आहे.)

"मग त्याला एकदमच रोखठोक जबाब कां देत नाहीं?"

"तसें मला एकदम बोलतां येत नाहीं. प्रत्यक्ष लग्नाची किंवा प्रेमाची गोष्ट ते काढीत नाहींत. पण मनांतला हेतु तो आहे. लवकरच त्यांना मी सुचविणार आहे कीं फार येऊं नका माझ्याकडे. पण आतां एकदम तुटून बोलतां येत नाहीं. प्रथम ते ह्मणाले, "तुमच्या हिंदी पतीनें सोडलें हें ऐकून मला वाईट वाटलें. पैशाची वगैरे मदत पाहिजे असली तर मी देईन." किती केलें तरी ते सभ्य गृहस्थ आहेत. आणि त्यांचा हेतु चांगला व शुद्ध असण्याचा संभव आहे. माझ्यावर त्यांचें प्रेम होतें, तेव्हां आतां मी संकटांत आहें हें ऐकल्यावर मला मदत करण्यास व माझें सांत्वन करण्यास त्यांनीं यावें हें साहजिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. आणि ते येतात तेव्हां बरोबर एक दोन बाया घेऊन येतात, एकटे येत नाहींत."

मुकुंदराव यावर विशेष कांहीं बोलले नाहींत. पण जॉन ब्लॉकूलेचें आगमन त्यांना विशेष रुचलें नाहीं. गांवांत जी बोलवा आहे ती खरीच ह्मणावयाची काय? जॉन ब्लॉकूलेच्या कोट्यावधि रुपयांना आणि तारुण्याला भुलून तिनें आपल्या हिंदी पतीला सोडलें असेल काय? तत्त्वांचा प्रश्न वास्तविक लग्नाच्या वेळीं सुचावयाचा, दोन मुलें झाल्यावर 'इंग्लंड' हा माझा 'स्वदेश' व हिंदुस्थान 'स्वदेश' नव्हे असें ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नलिनीकांताला सोडण्याचें कारण दुसरेंच कांहीं तरी असलें पाहिजे, अशी शंका त्यांच्या मनांत एकदम आली. त्यांचा चेहरा उतरला. नलिनीनें त्यांचा लवकरच निरोप घेतला व 'उद्यां अवश्य या' असें ह्मणून तीं जॉन ब्लॉकूलेकडे गेली. मुकुंदरावांनीं शरच्चंद्राला "ओळखलेंस का मला?" ह्मणून विचारलें. पण तो लाजून कांहीं बोलला नाहीं व आईच्या पाठोपाठ गेला. ते मग तसेच निघून गेले.

प्रकरण चवथें

"मुकुंदराव तुमचेंहि नलिनी ऐकत नाहीं म्हणावयाची? अगदीं वेडी आहे. पहिल्यापासूनच ती अशी आहे. मनोविकार सात्विक, पण अतिप्रबल; व्यवहाराचें नांव नाहीं."

"मनोविकार इतके प्रबल होते म्हणूनच तिनें तुमच्याशीं विवाह केला. आणि ह्मणूनच ती आपल्या स्वदेशी चळवळीला मिळाली. थोड्या दिवसांत बारिसाल जिल्ह्यांत तिनें किती चांगलें नांव मिळविलें!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं वर्षांनीं तिची कीर्ति सर्व बंगाल्यांतच नव्हे तर हिंदुस्थानांत पसरली असती."

"असती, 'असतें,' 'होतें,' 'असेल,' 'असावें' या शब्दांसारखे वाईट शब्द जगांत नाहींत." नलिनीकांत म्हणाले. कांहीं वेळानें ते पुनः म्हणाले, "मुकुंदराव, नलिनीची गांवांत हल्लीं कीर्ति काय झाली आहे, तुम्हांला ठाऊक आहे ना ?"

"होय. जॉन ब्लॉक्ले तिच्या बंगल्यावर नेहमीं जात असतात आणि........लोकांचें तोंड कोण धरणार ?"

"ती बिघडली नाहींच, असें तुमचें ह्मणणें आहे काय ?" नलिनीकांतानीं म्हटलें.

"अलबत्" मुकुंदराव ह्मणाले. "तथापि मी आज तिकडे जाणार आहें तेव्हां सर्व विचारतों. मला स्पष्ट विचारावयास हरकत नाहीं."

"जा, मुद्दाम जा. नलिनीनें सत्त्व सोडलें हें मला कधींहि खरें वाटावयाचें नाहीं. पण कोणाला ठाऊक ?"

"अशक्य आहे. भलती शंका........"

"मला शंका नाहीं. पण कोणी सांगावें ? या जगांत........"

"नलिनीकांत, माझी उदास व साशंक वृत्ति कलीसारखी आज तुमच्या हृदयांत शिरलेली दिसते !"

"कांहीं कां असेना. तुम्ही जाऊन एकदां साफ खुलासा करून या. दुसरं एक काम आहे. तिला दर महिन्यास मी चारशें रुपये देत जाईन; हे रुपये पुरतील ना, असें तिला विचारा."

* * * *

स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं
देवो न जानाति कुतो मनुष्यः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'स्त्रियांचें चरित्र देवाला देखील कळत नाहीं' हें सुभाषित कलकत्यास त्या दिवसांत किती तरी सुसंस्कृत बंगाल्यांच्या तोंडून निघालें असेल. आणि कां निघूं नये? त्यांचा तरी काय दोष? नलिनीचें आणि तिच्या पतीचें भांडण झालें हें खोटें नव्हतें; जॉन ब्लॉक्ले हे तिचे पूर्ववयांतले 'लव्हर' होते हें खोटें नव्हतें; भांडणापूर्वी ते तिच्याकडे जात येत होते, हेंहि खोटें नव्हतें; नलिनीकांतांना सोडल्यानंतर ते तिच्याकडे वारंवार मोटारींतून येरझारा घालीत होते, तिला घेऊन दोनतीनदां ते मोटारींतून लांब फिरावयास गेले होते, तिच्या मुलांना ते कांहीं ना कांहीं तरी खेळणीं देत असत, या सर्व गोष्टी खऱ्या होत्या. अशा स्थितींत नलिनी ही लवकरच 'मिसेस ब्लॉक्ले' होणार असें जो तो कुजबुजूं लागला, यांत आश्चर्य नाहीं. कांहीं गोष्टी खऱ्या असूं नयेत अशी आपली इच्छा असते; पण पुरावा उलट असला तर कोण काय करणार? एका इंग्लिश वर्तमानपत्राच्या स्त्रियांकरितां राखून ठेवलेल्या पानांत लिहिणारी जी संपादिका होती, ती मनानें चांगली होती, विचारी होती, कोणत्याहि गोष्टीवर सहसा विश्वास ठेवणारी नव्हती. पण तिचाहि नाइलाज झाला. तिच्या असिस्टंट संपादिकेनें पुढील प्यारिग्राफ लिहून संपादकीय स्फुटांमध्यें घालण्यास दिला. तो तिनें स्फुटांत घालण्याचें जरी नाकारलें तरी काल्पनिक सही करून पत्रव्यवहाराच्या सदरांत तो देण्यास हरकत नाहीं, असें तिला देखील वाटलें. कारण गांवांतली बोलवा तशीच दाट होती. पत्रांतील तो प्यारिग्राफ अशा आशयाचा होता:—

" मिसेस नलिनी बानर्जी (ज्या पूर्वी एलन् लॉकफेअर म्हणून ओळखल्या जात होत्या) व जॉन ब्लॉक्ले यांचा वाङ्‌निश्चय झाल्याची बातमी जी गांवांत आहे ती निराधार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे असें नलिनीबाईनीं माझ्या मैत्रिणीस सांगितलें. तथापि जॉन ब्लॉक्लेसारखे ज्यूटचे राजे आणि मिस् एलन् लॉकफेअर (मला पूर्वींचेंच नांव बरें वाटतें) यांच्यासारखी 'सौंदर्यराज्ञी' (Queen of Beauty), हीं विवाहविधीनें बद्ध झाल्यास पूर्वींच्या एका चुकीचें निरसन होऊन सर्वांना आनंद होईल असें सर्व लोक आपआपसांत ह्मणत आहेत, आणि हेंहि तितकेंच खरें आहे."

नलिनीकांताच्या नजरेस हा प्यारा पडलाच. मुकुंदरावांना त्यांनीं तो दाखविला व पुस्तक घेऊन वाचूं लागले. कांहीं वेळानें नलिनीकांत ह्मणाले,

"मी स्वतः जाऊन सर्व खुलासा करून घेऊन येतों."

"खुलासा कसला करून घेतां ? लोक पाहिजे तें लिहितील. नलिनी तशी मुळींच नाहीं."

"मलाहि तसेंच वाटतें. पण........"

"पण काय ?" मुकुंदराव ह्मणाले.

"कांहीं नाहीं. अलीकडे मी तुमच्यासारखाच शंकेखोर होऊं लागलों आहें."

"मी असे भलते संशय कधीं काढीत बसत नाहीं."

"मी तरी कोठें संशय काढीत बसतों आहें ? मीच ह्मटलें नाहीं का कीं, नलिनी आपलें सत्त्व कधीं सोडावयाची नाहीं. मला शंका मुळींच नाहीं. पण, म्हणतात ना, कोणाचं मन केव्हां कसें फिरेल........"

"ह्मणजे हा शंकेखोरपणा नव्हे वाटतें ? 'मला शंका नाहीं, पण कोणी सांगावें ?' हें भाषण विसंगत आहे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" विसंगत असेल." नलिनीकांत ह्मणाले. " पण तें माझ्या मनोवृत्तीचें निदर्शक आहे. तुमच्या " लॉजिक"ला विसंगति खपत नाहीं, पण मनोवृत्तींना सर्व कांहीं चालतें."

" हरकत नाहीं. मला आज नलिनीवहिनींनीं बोलावलें आहे, तेव्हां मी जातोंच. तुम्ही Zoological Gardens मध्यें (प्राणिसंग्रहोद्यानामध्यें) आपल्या रोजच्या जागेवर बसा. मी तिच्या-कडून बागेंतच येतों. मग आपण फिरावयाला जाऊं."

जाकीट, कोट, बूट, वगैरे चढविण्यास ते बाहेर जाणार इतक्यांत पोस्टमननें नलिनीकांतांच्या खोलींत एक पत्र टाकलें. पत्रावरचें अक्षर ओळखीचेंच होतें. नलिनीचेंच तें पत्र हें मुकुंदरावांना व कांतांना पत्र उघडण्यापूर्वींच कळलें. घाईघाईनें पत्र फोडून नलिनीकांत वाचूं लागले.

प्रिय कांत,

मुकुंदरावांनीं रोज रोज येऊन माझें मन अर्धवट वळविलें आहे. आपलें पत्नीत्व स्वीकारल्यामुळें मी जी एक जबाबदारी पतकरली आहे तिच्यांतून मला मुक्त होतां येत नाहीं, हा त्यांचा युक्तिवाद माझ्या मनाला त्रास देत आहे. मुकुंदराव मला म्हणाले:–"तुमच्याशीं नलिनीकांतांनीं लग्न केलें नसतें, तर त्यांना या वयांत अपत्यहीन व स्त्रीहीन अशा घरांत भुताप्रमाणें राहण्याची पाळी आली नसती. आतां त्यांना दुसरें लग्न करतां येत नाहीं; करण्याची इच्छा असली तरी बायको मिळणें कठीण. इत्यादि." मी आपली पत्नी झालें तेव्हां जी विशेष जबाबदारी पतकरली ती पार पाडणें माझें कर्तव्य आहे असें मी समजतें, तरी आपली इच्छा असल्यास मी परत येत्यें माझी सदसद्विवेकबुद्धि मात्र माझ्या मनाला नेहमीं टोंचीत राहील. पण हें सर्व दुःख मला सोसलें पाहिजे. आपणांला दुःख देण्याचा मला काय अधिकार ? शिवाय, आपलीं अपत्यें आपल्यापासून मी हिरावून नेलीं हा विचार मला स्वस्थ बसूं देत नाहीं. तरी काय करूं तें कळवावें.

मेट्रोपॉलिटन हॉटेल
बर्जेस् रोड, कलकत्ता
*15th April 19***

आपल्यावर प्रेम करणारी परंतु ' स्वदेशा '-भिमानामुळें कर्तव्यमूढ झालेली आपली
नलिनी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील पत्र वाचल्यावर नलिनीकांतांनीं तें मुकुंदरावांजवळ दिलें व व त्यांचें वाचून होईतोंपर्यंत स्वस्थ बसले. वाचून झाल्यावर मुकुंदराव ह्मणाले, "मग काय उत्तर सांगूं मी ?"

"तिला म्हणावें, सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध तूं वागावेंस अशी माझी इच्छा नाहीं. माझे हाल होतात ही गोष्ट खरी; पण त्याला तूं काय करणार ? भोक्तृत्व आहे तें भोगलें पाहिजे. तुझें मन शुद्ध नसतां तुला घरांत आणणें म्हणजे तुला 'रखेली' करण्यासारखेंच आहे. माझी वायको 'रखेली' व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. मुलांना तूं घेऊन गेलीस हे माझ्यावर उपकारच केलेस असें मी समजतों. त्यांच्यावर दोघांचा 'हक्क' समसमान आहे. प्रेम मात्र तुझें अधिक आहे. तेव्हां तुझ्या जवळच त्यांनीं रहावें."

"You have spoken like yourself" मुकुंदराव म्हणाले. "हेंच उत्तर द्यावयाचें दुसरें काय ?"

नलिनीकांतांची मुद्रा या क्षणीं एकदम बदलली. मघांचें भाषण करीत असतांना त्यांच्या तोंडावर जें तेज होतें तें एकदम मावळलें व मुद्रेवर कृष्णविचारांची व विकारांची दाट छाया पडली. ते म्हणाले,

"मुकुंदराव, मला एक शंका येते. जॉन ब्लॉक्लेशीं लग्न करण्याची मी परवानगी द्यावी, ह्मणून तर हें कावेबाजपणाचें पत्र नसेल ना ?"

"याला म्हणावें दीर्घशंकेखोर ! कांत, अधिक बोलण्यांत अर्थ नाहीं. मी जातों आतां."

"ठीक आहे. मी वेडा झालों आहें. सर्वस्वीं तुमच्या ताब्यांत आहें असें समजून माझ्याशीं वागा. माझे सद्विचार 'माझे' समजा, असद्विचार माझे नाहींत असें समजा. मुकुंदराव, मी वेडा झालों आहें. मला इस्पितळांत पाठवा."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं शेवटलीं दोन वाक्यें त्यांनीं स्फुंदत स्फुंदत म्हटलीं व रुमाल तोंडाला लावून ते हुंदके देऊं लागले !

कांहीं वेळानें ते दचकल्यासारखे एकदम बसले व आपल्या मित्राला म्हणाले,

" मुकुंदराव, माझ्याकडून ' डायव्होर्सची ' (घटस्फोटाची)परवानगी मिळविण्याची ही युक्ति नसेल ना ? " नवऱ्यासारखा संशयखोर जगांत कोणी नसेल ! आणि साहजिकहि आहे. स्त्रियांचें चरित्र देवांनादेखील अगम्य ह्मणतात तें खोटें नाहीं. सर्व स्त्रियांचें चरित्र असें नसतें, पण कांहींचें असतें. आमच्या ओळखीचा एक गृहस्थ आपल्या बायकोस मोठी पतिव्रता समजत असे. एके दिवशीं........पण नको. सर्व लोकांना असल्या गोष्टी ठाऊक आहेत. ' नलिनी ' झाली तरी ती स्त्रीच; आज एका भृंगावर लुब्ध झाली, तर उद्यां दुसऱ्या भृंगावर कशावरून लुब्ध होणार नाहीं ? त्यांतून जॉन ब्लॉक्लेसारख्या मधुपाचा वर्ण, त्याचें हरतऱ्हेचें ऐश्वर्य, त्याची आग्रही रसोपभोगेच्छा, इत्यादि गोष्टींच्या जोरावर नलिनीच्या हृदयपुटांत त्यानें प्रवेश केला असला तर त्यांत त्याचा किंवा तिचा तरी काय दोष ?

" कांत," मुकुंदराव ह्मणाले "माझ्याहि मनाचा घोंटाळा होऊं लागला आहे. गुलाबाला जशी कीड लागते तशी नलिनीसारखीच्या मनाला देखील कीड लागणें शक्य आहे. पण वास्तविक अशी कीड लागूं नये. कसें कां असेना ? मी आतां जाऊन स्पष्ट विचारून येतों."

असें ह्मणून मुकुंदरावांनीं कपडे वगैरे चढविले व ते नलिनीवहिनीकडे गेले. हॉटेलांत ते शिरले तेव्हां वरून जिन्यांतून जॉन ब्लॉक्ले व एक ह्मातारी बाई, हीं येत होतीं. ब्लॉक्लेसाहेब रागावलेले होते. त्यांच्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडे पाहिलें न पाहिल्यासारखें करून मुकुंदराव वर गेले व शिपाया-बरोबर आंत कार्ड पाठविलें. बाहेर शरच्चंद्र व अरविंद खेळत होते. तेथें ते आतां महिनाभर वारंवार येऊं जाऊं लागल्यामुळें शरच्चंद्राची व त्यांची पुन: दोस्ती जमली होती. त्याला त्यांनीं हातांत पकडलें व 'मारूं का?' असें थट्टेनें ह्मणाले. इतक्यांत अरविंद तेथें रांगत आला. शरच्चंद्राला सोडून त्यांनीं अरविंदाला कडेवर घेतलें; लवकरच त्यांना बोलावणें आलें.

आंत गेल्यावर मुकुंदरावांना काय मोह झाला कोणाला ठाऊक, त्यांनीं व्यवहार सोडून एकदम विचारलें, "जॉन ब्लॉक्ले आतां येथें कशाला आले होते?"

हा प्रश्न त्यांनीं अशा रीतीनें विचारावयाचा नाहीं. पण मोह पडून कोणाच्या हातून चुका घडलेल्या नाहींत?

नलिनीला तो प्रश्न अर्थात् आवडला नाहीं. व्यभिचारिणी झाली, तरी तिला देखील 'व्यभिचारिणी' हें नांव आवडत नाहीं. कर्माला हरकत नसते, पण तो शब्द नको असतो! नलिनी अर्थात् तशी नव्हती. तिला मग तो भलताच प्रश्न कसा आवडेल? तिनें मुकुंदरावांना एकदम उत्तर दिलें, 'तुह्मांला त्याची पंचाईत?"

परंतु लगेच तिला आपला दोष दिसून आला व ती म्हणाली, "मुकुंदराव, क्षमा करा. जॉन ब्लॉक्ले यांचें व माझें जरासें गुप्त स्वरूपाचें भाषण झालें. तुह्मांला तें लवकरच समजेल. तुमचा आणि माझा कोणत्या प्रकारचा संबंध आहे हें मी विसरलें व तुटक बोललें याबद्दल माफ करा. तुम्हांला गुह्य गोष्टी सांगण्यास हरकत नाहीं. तें........"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" नलिनीवहिनी, आपलं गुह्य ऐकण्याची मला इच्छा नाहीं" मुकुंदराव रागारागानें म्हणाले. " मी आलों तसा जातों" असें ह्मणून त्यांनीं अरविंदाला खालीं ठेवलें व जाऊं लागले. नलिनीनें त्यांना काकुळतीनें हांक मारली; ' क्षमा करा ' असें देखील म्हणाली; तरी मुकुंदराव परत फिरले नाहींत. अरविंदानें त्यांचें उपरणें धरलें होतें. तें त्यांनीं भराभर सोडवून घेतलें व रागारागानें हॉटेलांतून निघून गेले.

मुकुंदरावांचा तिनें जो अपमान केला होता त्यामुळें तो सात्त्विक ब्राह्मण कोपला; परंतु अशा ब्राह्मणांचा राग फार वेळ टिकत नाहीं. आईबाप आपल्या मुलांना मारतात; पण तो जसा राग फार वेळ टिकत नाहीं तशापैकींच मुकुंदरावांच्या रागाची अवस्था झाली. मुलाला एखादे वेळेस रागाच्या भरांत अधिक मार बसला तर आईबापांना मागाहून वाईट वाटतें. त्याप्रमाणेंच नलिनीवर आपण उगाच रागावलों असें मुकुंदरावांना वाटलें व त्यांना पश्चात्ताप होऊं लागला. तथापि नलिनीकांताचा संशय अगदींच खोटा असें त्यांच्यानें खात्रीपूर्वक विधान करवेना.

मानवी मना, काय तुझे हे गुंतागुंतीचे धागे ! प्रेम, राग, पश्चात्ताप, संशय, खात्री, इत्यादि विविध व विरोधी ' गुणां ' चें गुंतागुंतीचें जें मनोमय वस्त्र बनतें, त्याच्याकडे या लेखकानें किती वेळां कौतुकानें व 'आश्चर्यवत्' दृष्टीनें पाहिलें असेल ! सज्जनांच्या सत्त्वगुणप्रधान अशा मनांत किती वेळां तरी काळसर धागे या लेखकाला दिसले आहेत ! अस्तु.

मुकुंदराव रागारागानें गेलेले पाहून नलिनीला वाईट वाटलें. जो मनुष्य आपलें हित चिंतीत असतो त्याचा आपल्या हातून, चुकून कां होईना, पण अपमान व्हावा, हें कोणाहि सहृदय मनुष्यास दुःखदच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणार. जॉन ब्लॉक्लेचें नांव व आपलें नांव यांची जोडी लोकांच्या जिभेवर कशी नाचत आहे हें तिला ठाऊक होतें. "आणि कां नाचूं नये" ती आपल्या मनाशीं ह्मणाली. "माझें वर्तन जसें असावयास पाहिजे तसें कोठें आहे? जॉन ब्लॉक्ले यांना मी वारंवार येथें कां येऊं देतें? त्यांच्या मोटारींत बसून दोन तीनदां लांब कां फिरावयास गेलें? ते आपले पूर्वींपासूनचे ओळखीचे, एक वेळ आपल्या आई-बापांच्या पसंतीस उतरलेले आपले 'लव्हर,' आपल्या आईबापांना त्यांनीं अनेक वेळां पैशाची मदत केलेली, आपल्या भावाला मँचेस्टर-मध्यें त्यांच्याच शिफारशीवरून नोकरी लागलेली, इत्यादि खासगी संबंध लोकांना काय ठाऊक? ते माझ्याकडे येतात ते लग्नाच्या उद्दे-शानें तर खरे; पण 'रेव्हरंड लॉकफेअरची ही मुलगी, विचारी संकटांत पडली आहे, तिला मदत करणें आपलें कर्तव्य आहे' अशी सात्त्विक भावना त्यांच्या मनांत आहेच आहे. आतां त्यांचे उपकार घेतले तरी पंचाईत, न घेतले तरी पंचाईत. अशा लोकांना सडेतोड उत्तर देणें कठीण पडतें. त्यांना सुचवून पाहिलें, पण प्रेमामुळें त्यांना हें समजत नाहींसें दिसतें. वास्तविक ते शहाणे आहेत आणि मी न सांगतां त्यांना हें समजावयास पाहिजे होतं. पण प्रेमापुढें अक्कल गप्प बसते ह्मणतात तेंच खरें. आज त्यांनीं अखेर 'प्रपोज' केलेंच. 'रात्रीं मी हॅाटेलांतच येऊन राहतों' असें ह्मणून ठेवलेंच. मला आतां या हॅाटे-लांतून पाय काढलाच पाहिजे. आधींच लोक पाहिजे तें बोलत आहेत; आह्मी दोघेजण एकाच हॅाटेलांत राहूं लागलों तर बघावयासच नको. 'आठवड्याच्या आंत आपलं लग्न झालंच पाहिजे—होणार—तूं नाहीं ह्मटलंस तरी होणार" काय ही ब्लॉक्ले यांची अहंमन्यता! त्यांच्या या ह्मणण्याचा अर्थ तरी काय? तुम्ही उद्यां लग्न कराल, पण मी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तयार झालें पाहिजे ना ? लग्न करण्याचा मला मोह पडणार नाहीं असें नाहीं. पण त्यांची अहंमन्यता केवढी ही ! कसें कां असेना, आपण येथून आतां गाशा गुंडाळणार..........जायच्या आधीं कांतांना व मुकुंदरावांना एकदां भेटलं पाहिजे. मुकुंदरावांनीं भलताच प्रश्न एकदम विचारला ह्मणून मी रागावलें. पण त्यांचा तरी काय दोष ? त्यांच्या संशयाला कारण नव्हतें का ? त्यांची क्षमा मागावी आणि कांतांनाहि कळवावें कीं 'मी आतां येथून जातें आणि तोंड काळें करतें. 'पत्नी' ह्मणून माझ्यावर आपला हक्क आहे. विवाह केला त्यावेळेस जी विशेष जबाबदारी घेतली ती पुरी पाडलीच पाहिजे तेव्हां आपली इच्छा असल्यास मी आपल्याकडे येतें. पण माझ्या मनांतली गांठ कांहीं अद्यापि जात नाहीं........पत्र मुकुंद-रावांना लिहितेंच मुळीं आतां."

असें मनांत आणून तीं ज्या खिडकींत विचार करीत बसली होती तेथून उठली व टेबलाजवळ जाऊन तिनें पुढील पत्र लिहिलें.

मेट्रॉपॉलिटन क्लब,
बर्जेस् रोड, कलकत्ता.

प्रिय मुकुंदराव,

क्षमा करा, मी आपला जो अपमान केला त्याची कारणमीमांसा मागाहून करूं; क्षमा मात्र वरील शब्द पाहतांच केली पाहिजे. क्षमा केलीच आहे असें धरून मी चालतें; कारण आपलें हृदय मला ठाऊक आहे. तुमचा राग पांच मिनिटांपेक्षां अधिक वेळ कधीं टिकला आहे काय ?

यापुढें आपलें व माझें कदाचित् दर्शन देखील होणार नाहीं. कांहीं कारणा-मुळें मी हें हॉटेल उद्यांच्याउद्यां सोडून जाणार आहें व पुढें कोठें तरी तोंड काळें करणार आहें.

मला या जगांत कसें वागावें हें समजत नाहीं. मला दोन पोरें झालीं आहेत, पण समंजसपणामध्यें मी अद्यापि लहान पोर आहें. माझें कर्तव्य काय हें मला समजत नाहीं. तरी आपण व 'कांत' आज रात्रीं स्वस्थपणें बोलण्यास (व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांतांचें आवडतें दूधकोल्ड्रींक पिण्यास) इकडे यावें. नाहीं तर मी तिकडे येईन. आपलें एकदां दर्शन घेऊन मी जगांत कोठेंतरी दडून बसणार आहें. 'कांत' रागावले आहेत काय ? त्यांचा व आपला आत्मा एक आहे, शरीरें मात्र भिन्न आहेत, ह्मणून मी आपल्याच पत्रांत त्यांना बोलावणें करीत आहे. त्यांना पाहुण्याप्रमाणें–परक्यांप्रमाणें–बोलावणें करण्याची माझ्यावर पाळी यावी ना ? मुकुंदराव, पति–पत्नी ह्मणून आम्हांला राहतां आलें नाहीं ह्मणून मित्रत्वाचें देखील आमचें नातें तुटावें काय ? मी कदाचित् थोड्या दिवसांत जीव देखील देईन. कारण माझ्या हृदयांत प्रेम, पश्चात्ताप, कर्तव्य वगैरे गोष्टींनीं अनर्थ मांडला आहे. मला हें दुःख कदाचित् सहन करवणार नाहीं. शरच्चंद्राला व अरविंदाला कांतांजवळच ठेवूं का ? मला जीव देण्याचा मोह झाला तर त्यांचें कसें होईल ? का मी कांतांजवळच पुनः येऊं ? अलीकडे किती वाळले आहेत ते ! त्यांच्या बायकोनें त्यांची सेवा करावयास नको काय ? मुकुंदराव, मी त्यांना फसविलें असा माझ्यावर आरोप येईल असें मला वाटतें. मी 'कांतां'कडे येण्यास तयार आहें. रात्रीं या व काय तें ठरवूं. माझें 'कॉन्शन्स' मूर्ख आहे. 'कांतां'ना दुःख होउं नये ह्मणून कॉन्शन्सलाहि जाळण्यास मी तयार आहें– पण नको. 'कॉन्शन्स'ला सोडलें, मग मनुष्यत्त्व काय राहिलें ? आणि मी 'कॉन्शन्स' सोडलें, तर 'कांतां'चें माझ्यावर प्रेम राहील काय ? मला या प्रश्नांचीं उत्तरें देतां येत नाहींत. त्यांना घेऊन या. अनमान करूं नका. हॉटेलांत येणें अवघड वाटत असल्यास मी तुमच्या घरीं—हाय, हाय, जें घर माझें होतें त्याबद्दल 'तुमचें' म्हणावें लागण्याची पाळी यावी ना ?—येईन. हें पत्र घेऊन येणाऱ्या बरोबर काय तें नक्की कळवावें.

आपल्या प्रिय मित्राची...पूर्वींची प्रिय
(व आतां कदाचित्-कदाचितच अप्रिय झालेली)
नलिनी व आपली
नलिनीवहिनी.

प्रकरण पांचवें

रात्रीं नऊ वाजतां नलिनीकडे जावयाचें होतें. परंतु नलिनीकांत व मुकुंदराव उत्सुकतेमुळें दहा मिनिटें आधींच तेथें गेले. त्यांनीं आपलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्डें आंत पाठविलीं. परंतु नलिनीनें जरा थांबण्यास सांगितलें. अर्थात् त्यांना बाहेरच्या बांकावर बसावें लागलें. आंत नलिनी कोणाजवळ बोलत होती हें दोन तीन मिनिटांतच त्यांना कळलें.

'We shall be married to morrow' (आपलें उद्यां लग्न होणार) असे शब्द त्यांच्या कानीं आले. आवाज नलिनीचा नव्हता,–अर्थात् कोणा तरी पुरुषाचा होता. नलिनीनें काय उत्तर दिलें हें त्यांना ऐकूं आलें नाहीं. Go......Enough...interview असें कांहीं कांहीं शब्द ऐकूं आले. त्यावरून अर्थबोध कांहीं झाला नाहीं.

'I have waited too long for your consent; I can wait no longer.' (संमतीची फार वेळ वाट पाहिली; आतां मला धीर धरवत नाहीं.) हे शब्द पुरुषाचे होते. अर्थात् जॉन ब्लॉक्लेचे होते, हें वाचकांनीं ताडलेंच असेल. दोन तीन मिनिटें खोलींत बराच किलकिलाट झाला; अर्थात्, हा प्रेमकलहाचा किलकिलाट होता असें नलिनीकांतांना विचार केल्याशिवाय समजलें ! त्यांना घेरी होऊं लागली. इतक्यांत जॉन ब्लॉक्ले खोलीबाहेर आले. त्यांनीं त्या दोनहि हिंदी गृहस्थांकडे विजयदर्शक व तिरस्कार मुद्रेनें पाहिलें व नलिनीकांतांकडे वळून ' म्हणाले, To-morrow you won't see your bird here. (उद्यां तुमचें पांखरूं तुह्मांला येथें दिसावयाचें नाहीं.)

नलिनीकांतांच्या अंगाचा संताप झाला व ते म्हणाले, "मी आपणास विचारलें नव्हतें हें. मला आपल्याशीं बोलण्याची मुळींच इच्छा नाहीं. आपण...."हें वाक्य पुरें करण्याची फारशी जरूर नव्हती. कारण जॉन ब्लॉक्ले हॉटेलांतील आपल्या खोलींत शिरतांना त्यांना दिसले. शिवाय, त्याचक्षणीं त्यांच्या मनांत विचार आला कीं, ' आपलाच दाम खोटा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांवर रागावण्यांत तरी काय अर्थ आहे? नलिनीच जर उलटली........" इतक्यांत नलिनी बाहेर आली व म्हणाली, "या आंत या." ते दोघे एकमेकांच्या तोंडाकडे पहात तिच्या पाठोपाठ खोलींत शिरल्यावर नलिनी त्यांना ह्मणाली, "कांत, माझें मन आतां मुळींच स्वस्थ नाहीं. आपल्याशीं मला अत्यंत महत्त्वाचें भाषण करावयाचें आहे तें माझ्या या मन:स्थितीत शक्य नाहीं. माझें डोकें फिरत आहे. कांत मला क्षमा...." पुढचे शब्द तिच्यानें बोलवले नाहींत, ती बेशुद्ध होऊन पडली. नलिनीकांत रागावले होते, पण त्यांनीं तिचें डोकें मांडीवर सावरून धरलें. क्षणार्धांतच ती जराशी सावध झाली. "कांत, क्षमा करा. मी अपराधी आहें. जॉन ब्लॉक्लेशीं लग्न........"

हें वाक्य उच्चारण्यापूर्वींच तिला पुन: घेरी आली व ती नलिनीकांतांच्या अंगावर पडली. मुकुंदराव पाणी आणण्याकरितां गेले. नलिनीकांतांना तिला मांडीवरून लोटून देण्याची इच्छा झाली; पण तसला कठोरपणा त्यांच्या कृतींत उतरणें शक्य नव्हतें. 'या पापिणीचा इत:पर शरीरस्पर्श नको' असा विचार करून त्यांनीं तिचें डोकें जमिनीवर मात्र ठेवलें. मुकुंदराव पाणी घेऊन आल्यावर नलिनीकांत तेथून उठून खिडकीकडे गेले व कांहींतरी वेड्यासारखी शीळ घालूं लागले. मुकुंदरावांनीं पाणीबिणी शिंपल्यावर नलिनी सावध झाली व इकडे तिकडे बावरल्यासारखें पाहून म्हणाली, "मुकुंदराव, क्षमा करा. आपण उद्यां सकाळीं याल का? आपल्याशीं बोलण्यासारखी माझी स्थिति नाहीं, हें तुम्हीं ओळखतां ना? कांत, तुम्ही तिकडे कां? मी अपराधी आहें, हें मीच कबूल करतें ना? पण मला क्षमा नाहीं का करावयाची? कांत,........पण नको; उद्यांच बोलूं. आपल्याशीं बोलूं लागलें ह्मणजे मनोवृत्ति उचंबळून येतात." मुकुंदरावांना तिचें ह्मणणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हटलें व त्यांनीं आपल्या मित्राचा हात धरून त्याला बाहेर काढलें. "पण उद्यां सकाळीं याल ना?....नाहीं तर इथें हॉटेलांतच कां रहात नाहीं आजच्या रात्रीं? तीन रुपये चार्ज पडेल सारा. जाण्यायेण्याच्या गाडीला नाहीं तरी पैसे द्यावे लागतीलच ना?"

"पाहतों आम्ही काय करावयाचें तें. तुम्ही आतां स्वस्थ पडा. गुड् नाइट." "गुड् नाइट" नलिनीनें उलट म्हटलें.

कांतांनीं 'गुड् नाइट' ह्मटलें नाहीं. इतक्यांत नलिनी बाहेर आली व ह्मणाली, "मुकुंदराव, या मजल्यावरचीच खोली घ्या बरं का. खालीं डांस फार आहेत."

"बरें. आम्ही सर्व करतों; तुम्हीं पडा आतां,' असें मुकुंदरावांनीं ह्मटलें व पुन: 'गुड् नाइट' करून मित्राचा हात धरून मॅनेजरच्या खोलीकडे जाऊं लागले.

* * * *

वरच्या मजल्यावर मॅनेजरनें त्यांना खोली दिली; नलिनीकांत आपल्या पलंगावर बसून अश्रु ढाळीत व उसासे टाकीत होते. अशा वेळीं पैशाचा वगैरे प्रश्न काढणें हृदयशून्यतेचें लक्षण होतें. पण मुकुंदरावांचें हृदय कोमल ह्मणूनच त्यांनीं हृदय कठोर करून प्रिय मित्राचें मन दुसरीकडे वळविण्याकरितां ह्मटलें, "येथें राहणें जितकें महाग वाटतें तितकें महाग नाहीं कांहीं."

नलिनीकांत कांहींच बोलले नहींत.

"मॅनेजर बरा मनुष्य दिसला. थोडासा लुच्चा आहे; पण बोलण्यांत गोड आहे."

नलिनीकांतांचें तोंड या विषयानेंहि उघडलें नाहीं असें पाहून मुकुंदराव ह्मणतात, "आज तिथि कोण हो? अमावास्या दिसते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामनवमीच्या आंत पुण्यास परत येतोंच येतों, असें तिला सांगितलें होतें, पण पौर्णिमा गेली, अमावास्या चालली तरी आम्हीं येथेंच."

"मग उद्यांच जा ना? येथें राहण्यांत आतां काय शोभा आहे? पण रहा दोनचार दिवस आणि नलिनीवहिनीच्या दुसऱ्या लग्नाचे सुखसोहाळे...."

"कांत, पुनः बोलूं नका असं."

"नाहीं बोलत आतां. तोंड शिवून घेणारच आहें मी. आतां बोलावयाचं कांहीं राह्यलंच नाहीं मुळीं. ब्रह्मानंद झाल्यावर वाचा बंदच होते, नाहीं का?" असें म्हणून त्यांनीं इतकें कटु हास्य केलें कीं त्यांच्या मित्राला बोलणें वाढविण्याची इच्छाच राहिली नाहीं.

* * * *

साडेअकरा वाजले; बारा वाजले; तरी नलिनीकांत बसलेले. मुकुंदराव अंथरुणावर पसरले होते, पण त्यांना झोंप आलेली नव्हती; डोळा लागण्याच्या बेतांत होता; इतक्यांत नलिनीकांतांनीं त्यांना उठविलें. "मुकुंदराव, मी तिच्याकडे आतांच्या आतां जातों. आणि तिला उठवून सांगतों कीं 'नलिनी असें करूं नको. तुझ्यासारख्या स्त्रीला शोभत नाहीं हें.' माझें ऐकेल ती."

"पण ती लग्न करणार आहे असें तुम्हीं कां गृहीत धरतां?"

"लग्न करणार नसली तर बरेच झालें, मला तरी तेंच ऐकायची इच्छा आहे. ती वाईट नाहीं, तिच्या हातून पाप व्हायचं नाहीं, अशी माझी खात्री आहे. तरी पण संशय आहे तो आतांच्या आतां फेडून घेतों. आणि तिला सांगतों कीं 'नलिनी, माझ्याकरितां नाहीं तरी आपल्या शरच्चंद्राकरितां आणि अरविंदाकरितां वेगळें राहण्याचा हट्ट सोडून दे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" कांत, तुम्ही वेडे तर नाहीं ? भलतं कांहीं तरी बोलूं नका."

" मी बोलत नाहीं. कृतीनें करून दाखवितों. मला ती खोलींत घेणार नाहीं असं व्हायचंच नाहीं."

" कांत, तुम्ही शुद्धींत नाहीं आतां. दारू तर नाहीं प्यालेत ? इतके कामान्ध होऊं नका. बायको जवळ असतांना मनोविकारांचें नियमन करणें कठीण आहे हें मला ठाऊक आहे. पण अगदींच ताळतंत्र सोडूं नका. यावेळीं दार ठोठावीत बसणं चांगलं दिसतं कां ?"

" अहो, मी हांक मारल्याबरोबर ती मला आंत घेईल. पहा तर खरी मौज. प्रेम असलं तर आंत घेईल; नसलं तर उद्यांपर्यंत राहण्यांत तरी काय मौज आहे ?"

" वेड लागलं आहे तुम्हांला, वेड. निजा आतां."

नलिनीकांतांचें डोकें खरोखरच वेड्यासारखें भ्रमण करीत होतें. पण मुकुंदरावांचें त्यावेळेस त्यांनीं ऐकलें आणि स्वस्थ बसले. बसून बसून कंटाळल्यावर खिडकीशीं उभे राहिले. बाहेर काळोख काळाकुट्ट पडला होता. आकाशांत चांदण्यांची फार गर्दी दिसत होती. नलिनी-कांतानीं त्या तारका-समूहाकडे पाहिलें व मनांत म्हटलें, ' नलिनीला असल्या चांदण्यांची शोभा फार आवडावयाची. हिंदुस्थानच्या अंधकार-मय परिस्थितींत आपण स्वदेशी लोक या चांदण्यासारखे चकाकत आहोंत असें म्हणावयाची. एकदां ती म्हणाली कीं " मी मेल्यावर चांदणीच होईन. नाहींतर नको. फूलच होईन........स्वदेशी फूल हो, विलायती नाहीं ! विलायती फुलें सर्व बिनवासाचीं"....हाय, हाय, तीच नलिनी आज या हिंदुस्थानला स्वदेश म्हणत नाहीं. काला, तूं विलक्षण आहेस खरा. **कालाय तस्मै नमः । कालाय तस्मै नमः** भर्तृहरीच्या कोणत्या श्लोकांत आहे बरं हें ?....बरोबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे, 'यां चिंतयामि सततं मयि सा विरक्ता। साप्यन्यमिच्छति जनं' नाहीं, नाहीं, या श्लोकांत नाहीं. '**सा रम्या नगरी महान् स नृपतिः**' या श्लोकांत आहे. '**यां चिंतयामि सततं**' याचा शेवटचा चरण '**धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च**' असा आहे."

हाय, हाय, नलिनीची आणि माझी हीच अवस्था आहे. माझें तिच्यावर प्रेम, पण तिचें दुसऱ्यावर आहे. पण कशावरून तीच अवस्था आहे? तिला विचारून आतां खुलासा करून घेतला पाहिजे. मुकुंदराव, मी जातों तिच्याकडे, आणि संशय........"

"नलिनीकांत, मी कठोर बोलतों पण क्षमा करा. तुम्हीं कामान्ध झाले आहांत. जॉन ब्लॉक्लेचा संशय आजचा नवीन नाहीं. मग आजच तो कां अनावर होत आहे? तुम्हांला आपले विकार आवरत नाहींत, ही खरी गोष्ट आहे. वेड्यासारखं करूं नका........"

"मुकुंदराव, मला तुमची पर्वा नांहीं." नलिनीकांत रागारागानें ताडकन् बोलले. "मी हिच्याकडे जाणार...."

"असं असलं तर मी जाऊं देणार नाहीं. हॉटेलांतल्या साऱ्या लोकांना उठवीन आणि बोंबाबोंब......." वाक्य पुरें न करतांच त्यांनीं आपली जीभ आवरली व सौम्यपणें ह्मटलें, "कांत, क्षमा करा रागानें बोलतों त्याची. लोकांत वाईट दिसेल तुमचें हें वर्तन ह्मणून मी म्हटलें."

"तुम्हींच मला क्षमा करा." कांत ह्मणाले. "मला कांहीं सुचत नाहीं. मी लहान मूल आहें असें समजून मला वागवा तुम्हीं...." इतक्यांत हॉटेलाजवळ एक मोटार सों सों करीत आली व कांहीं माणसें जिना चढून वर येऊं लागलीं........"सिनेमाला किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाटकाला गेलेली मंडळी परत आली बरं का." मुकुंदराव म्हणाले. " नाहींतर कदाचित् एखादीकडे शेण खाऊन आले असतील."

" असेल. तसेंच असेल. जग चमत्कारिक आहे खरं." नलिनीकांत म्हणाले. " कामासारखा प्रबल मनोविकार नाहीं."

हें संभाषण झाल्यानंतर दोन घटका झाल्या असतील. बाहेर सर्व सामसूम होतें. हॉटेलांत एकदोन खोल्यांत नाटकाहून आलेल्या लोकांची कांहीं कुजबुज चालली होती तेवढीच; बाकी सर्व शांत होतें. व्हरँडामध्यें मोठा हँगिंग लँप जळत होता. वारा हलके हलके सौम्य होऊन आतां अजिबात बंद झाला होता. वृक्षलतांचे हेलकावे बंद झाले होते. आणि त्यांचा नाच बराच वेळ चालून श्रांत झाल्या-मुळेंच कीं काय तीं आतां गाढ निद्रासुख घेत होतीं. अशा वेळीं एक तरुण मनुष्य युक्तायुक्ततेचा विचार न करतां नलिनीच्या खोलीकडे चाललेला होता. चांगल्या कुलांत जन्मलेला, लोकांत मानमान्यता मिळविलेला मनुष्यसुद्धां मोह पावतो, तेव्हां सामान्य जनांची काय कथा ? अस्तु. पण त्याला नलिनीच्या खोलीचें दार कोण उघडणार ? मदनासारखा चतुरता शिकविणारा गुरु नाहीं. दार उघडलें नसलें तरी खिडकी एखादे वेळेस उघडी असण्याचा संभव असेल या आशेनें कीं काय तो खिडकीजवळ गेला व त्यानें हळूच ती लोटली. लोटल्या-बरोबर ती खिडकी उघडली गेली. त्या कामांधाला आनंद झाला. तो आंत शिरला, आंत दिवा होता, त्या प्रकाशांत नलिनीचें मुख त्यानें पाहिलें; तें किंचित् म्लान दिसलें. तिला उठवावी का उठविण्यापूर्वी तिचें एकदां चुंबन घ्यावें असा त्यानें क्षणभर मनांत विचार केला. हा 'विचार' कसला ह्मणा ? सर्वच अविचाराचा प्रकार, तेथें विचार हा शब्दच अयोग्य. असो. त्यानें चुंबन घेतलें. इतक्यांत त्याला कांहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावलांची चाहूल ऐकूं आली. तो घाबरला. चोरासारखा भित्रा कोणी नसेल ! ज्याला फसविण्याचा त्या तरुणाचा विचार होता तो आयत्या वेळेस जागा झाला ह्मणावयाचा ! नाहीं. तीं पावलें दुसऱ्याच कोणाचीं तरी होतीं. तीं त्याला अर्थात् प्रिय होतीं. त्यानें खोलीचें दार उघडलें. नलिनीचें पुनः चुंबन घेतलें व तिच्या नाकाला एक उग्र वासाची बाटली लावली. आणि बाहेर येऊन आपल्या सोबत्यांना येण्याविषयीं शीळ घातली. लगेच तिघेजण हलक्या पावलानें तेथें आले. ते चौघे तिला उचलूं लागले. इतक्यांत ती जागी झाली. क्लोरोफॉर्मचा डोस अपुरा झाला म्हणावयाचा ! आपल्या खोलींत अपरिचित मनुष्य भलत्या वेळीं आलेले पाहिल्याबरोबर ती दचकली, एकदम उठली व "कोण ? काय ? कशाला येथें आलेत ?' असें ओरडली. 'अहो उठा, चोर, दरोडेखोर...." अशी आरडाओरड सुरू करणार इतक्यांत तिच्या नाकावर क्लोरोफॉर्मचा हातरुमाल पुनः बसला. ती पडली व तिला ते उचलून घेऊं लागले. पण त्यांना त्या क्षणीं शेजारच्या खोलींत कांहीं कुजबुज ऐकूं आली. क्षणार्धांत नलिनीकांत व मुकुंदराव नलिनीच्या खोलीजवळ आले. सर्व प्रकार पाहिल्याबरोबर ते ओरडणार इतक्यांत मुकुंदरावांना दोघांनीं पकडलें. त्यांच्या नाकावर क्लोरोफॉर्मचा चांगला हबका बसल्याबरोबर ते मेल्याप्रमाणें पडले ! नलिनीकांत त्या कामान्ध पुरुषाच्या अंगावर तुटून पडणार इतक्यांत त्यानें आपल्या खिशांतून पिस्तूल काढलें व 'मागें व्हा, नाहीं तर ठार मराल' असें दरडावून सांगितलें. जागच्याजागीं उभे राहून ते एकमेकांकडे रागानें पाहूं लागले.

'ब्लॉकूले, तुम्हांला लाज वाटत नाहीं—" वाक्य पुरें होण्याच्या पूर्वींच नलिनीकांताचे पाय ब्लॉकूलेच्या हिंदी साथीदारानें किंवा नोकरानें ओढले. परंतु ते कसे तरी सांवरले व ब्लॉकूलेच्या अंगावर धांवून गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्लॉक्ले यांच्या हातांत पिस्तूल होतें पण ते पिस्तूल उडवूं शकले नाहींत. कारण नलिनीकांतांशीं लढण्यांत त्यांचे दोन्ही हात गुंतले गेले होते. कर्मधर्मसंयोगानें याच वेळीं नलिनी जागी झाली. ती सर्वांच्या पाठीकडे असल्यामुळें तिच्या हालचालींकडे कोणाचें लक्ष नव्हतें. जातीची युरोपिअन ती, ती धिटाईनें हलकेच उठली व ब्लॉक्लेच्या हातांतून पिस्तूल घेऊन त्यांना म्हणाली " ब्लॉकले, कांतांना सोडा; नाहीं तर मेलेत म्हणून समजा."

ब्लॉक्लेनीं या क्षणाच्या अवधींत कांतांना खालीं पाडलें होतें व त्यांचा गळा त्या दुष्टानें दाबला होता. नलिनीला तो दुष्ट म्हणाला,

" एलन्, पिस्तूल लांब ठेव; नाहीं तर तुझा 'कांत' मेला म्हणून समज. मागाहून तूं मलाहि मारशील हें मला ठाऊक आहे. पण तुझा कांत आधीं मरेल हें ध्यानांत ठेव."

नलिनीला काय करावें हें सुचेना. ब्लॉक्लेनें गळा दाबण्याचा क्रम चालविला. नलिनीनें क्षणार्धच विचाराकरितां घेतला असेल. नंतर एकावर एक असे दोन बार उडविले. ब्लॉक्ले पडले. त्यांचे हिंदी साथीदार मुखस्तंभासारखे पहात होते. ते पळूं लागणार इतक्यांत नलिनीनें दोन बार उडवून दोघांचे पाय जखमी केले; त्यांपैकीं एकजण या जखमेनें संतापला व वाघासारखा तिच्या अंगावर धांवून गेला. त्याच्या पायाला गोळी नुसती चाटून गेली होती. त्यानें नलिनीला पाडलें व तिच्या हातांतलें पिस्तूल घेतलें. पण तिचें दैव चांगलें ह्मणून त्यानें तिच्यावर किंवा नलिनीकांतावर पिस्तूल झाडलें नाहीं. तो तिच्या छातीवर बसला व विजयाच्या ऐटींत ह्मणाला, " मडमिणी, मला कां मारीत होतीस ? मी तुझें काय केलें होतें ?..........मला नाहक गोळी मारल्याबद्दल तुझा प्राण...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें बोलणार इतक्यांत नलिनीकांतानें पाठीमागून येऊन त्याच्या हातांतलें पिस्तूल हिसकावलें व त्याच्या अंगावर गोळी झाडून त्याला यमसदनास पाठविलें.

एक दोन मिनिटांचाच हा सर्व प्रकार. गोळीबार झाल्यावर दोन तीन मिनिटांच्या आंत हॉटेलांतील मंडळी तेथें जमली. शरच्चंद्र व अरविंद खोलींत रडत होते. रडें ऐकूं आल्यावर नलिनी धांवली व अरविंदाला पोटाशीं धरून शरच्चंद्राला कुरवाळूं लागली आणि 'घाबरूं नको' म्हणून सांगूं लागली. ब्लॉकूले कण्हत कुंथत होता. मरणापूर्वी नलिनीला बोलावून आणून तो तिला म्हणाला, 'एलन्, तुझ्या सौंदर्यानें मला मोह घातला. मोटारीमध्यें घालून माझ्या 'ज्यूट फार्म'वर नेऊन ठेवणार होतों आणि तेथल्या बंगल्यांत.... कैदेंत ठेवून–(अस्पष्ट) तूं कबूल....लग्नाला झाली असतीस, तर असें कशाला करावें लागलें असतें' एलन्, तुझें मन उदार आहे. मला क्षमा कर."

* * *

गोळी लागून जखमी झालेला हिंदी मनुष्य हॉटेलांतला बटलर होता. त्यानें नंतर आपल्या जबानींत सांगितलें कीं, 'बक्षिसाच्या आशेनें मी या कृत्याला सामील झालों. मीच नलिनीच्या खोलींतील खिडकीचा बोल्ट काल रात्रीं कांहीं तरी निमित्तानें तिथें जाऊन काढून ठेवला होता...."

* * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सहावें

समुद्रांतलीं अजगरें आणि रत्नें.

" आई, इतके दिवस बाबा कोठें होते ग ?"

" बाबा, कोठें होतांत हो तुम्ही इतके दिवस ?"

" मी इथेंच होतों, बाळ."

" मग आईकडे कां नाहीं आलांत राह्यला ? तुम्हीं रुसले आहांत, खरें ना ? मला सगळं ठाऊक आहे. आई रोजरोज तुमची आठवण काढून रडत असे. माझ्या आईवर तुम्हीं कां रुसलेत हो ? तुह्मांला मारलन् होय तिनीं ? मला भारी मारते हो आई आतांशीं. काल अरविंदाला सुद्धां मारलंन्. मी सांगितलं तिला कीं बाबा आले म्हणजे तुला मार देववतों का नाहीं बघ."

" आतां नाहीं मारायची जा; आतां नीज जा." कांत ह्मणाले " माझ्या मांडीवर निजतोस का इथें ?"

" हं निजतों, पण तुम्ही आईवर कां रागावले होतेत हो ? तुमची गडी मी फूं करतों आईवर रागावतां ह्मणून."

" बाळ, मी नव्हतों रागावलों. तीच रागावली होती."

" तरी मी ह्मटलंच. तुम्ही कध्धीं रागावायचे नाहीं. आईवर कशाला रागावायचं उगाच ? आई आपली गरीब आहे, खरं ना ?"

"अरे वेड्या, 'आपली' आई काय ह्मणतोस ? तुझी 'आई' ती माझी कोण ? [नलिनीकडे वळून] पण तूं 'माझी' कोठें आहेस आतां ? तुझ्यावर माझा काय हक्क आहे ? तुझा स्वदेश निराळा, माझा निराळा. हिंदी लोक आणि इंग्रज लोक शत्रु. तुझें आणि माझें आजचें नाहीं तर भविष्यत्कालीन शत्रुत्व...."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" कांत, मेलेल्याला कां मारतां ? मी चुकलें, झालें ना ?"

" तशी जुलमाची कबुली नको आहे, तुझ्या मनांत जर अजून किंतु असेल तर माझ्याकडे येऊं नकोस."

" कांत, " मुकुंदराव ह्मणाले, " नलिनीवहिनीचं आतां समाधान झालं आहे. त्यांना आणखी कां छळतां ? कां, असंच ना नलिनीवहिनी ?"

" प्रेमानें जिंकलें आहे. पण कांतांना मी फसवायची नाहीं. माझें 'कॉन्शन्स' अद्यापि शंकित आहे."

" तुमच्या कॉन्शन्सचें मी आज चांगलेंच समाधान करतों " मुकुंदराव ह्मणाले. " माझ्या प्रश्नांचीं सरळ उत्तरें द्या हां मात्र."

" काय प्रश्न आहेत ?"

" पहिला प्रश्न तुमचा स्वदेश कोणता ? इंग्लंड ना ?"

" होय."

" इंग्लंडचे लोक ते इंग्रज. ते तुमचे स्वदेशबंधु. होय ना ?"

" असंच."

" इंग्लंडचे व हिंदुस्थानचे हितसंबंध निराळे आहेत. तेव्हां हिंदी लोक इंग्रजांचे शक्य कोटींतील शत्रूच."

" होय. आजचे नसले, तरी ते शक्य कोटींतील भविष्यकालीन शत्रु" नलिनी ह्मणाली.

" असें जर आहे तर हिंदी मनुष्याचा प्राण वांचविण्याकरितां तुम्ही आपल्या स्वदेशीयाला गोळी घालून कां ठार मारलेंत !"

" तो नीच होता आणि हिंदी मनुष्य सज्जनांतला सज्जन होता ह्मणून."

" म्हणजे याचा अर्थ असा कीं, तुमचें मित्रत्व–शत्रुत्व सौजन्य–दौर्जन्यावर अवलंबून आहे, भूगोलावर नाहीं. सज्जन हिंदी गृहस्थ तुमचा मित्र आहे; दुर्जन इंग्रज तुमचा शत्रु आहे. नलिनीकांतांचें सुद्धां असेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्यांनीं तुह्माला—इंग्रज स्त्रीला—वांचविण्याकरितां स्वजातीय दुर्जनाला ठार नाहीं का केलें ?"

"कांत तर ह्मणत असतात कीं इंग्रज आमचे शत्रु !"

"त्यांच्या ह्मणण्याचा अर्थ असा कीं इंग्रजांमध्यें जे दुर्जन आहेत ते आमचे शत्रु. सज्जन इंग्रजांना कोण शत्रु ह्मणेल ? समुद्रांतील अजगरें वगैरे सर्व जनावरें वाईट; समुद्रांतलीं मोत्यें कोणी टाकलीं आहेत का ?"

"कांतांचं नाहीं असं ह्मणणं" नलिनी ह्मणाली. "त्यांचं नेहमीं ह्मणणं कीं इंग्रज आमचे शत्रु."

"नलिनी, हा आरोप माझ्यावर तूं तरी निदान आणूं नयेस."

"कां ? समुद्रांतल्या अजगरांची आणि मोत्यांची उपमा आपल्या तोंडून पूर्वीं कधीं ऐकली नव्हती."

"इंग्लिश समुद्रांतलं स्त्रीरत्न ज्या वेळेस मी स्वीकारलें, इतकेंच नव्हे तर त्या रत्नाचें दास्य पतकरून........"

"दास्य नव्हे हो. 'स्वामित्व.'"

"स्वामित्व असतं तर तूं सोडून कशी गेली असतीस ? दासाला स्वामीचा त्याग करण्याचा अधिकार नसतो."

"पण अधिकार नसतांना तो गाजविला, तर स्वामी त्या दासाला पकडून आणल्याशिवाय राहात नाहीं कांहीं. दोन महिन्यांच्या आंत पकडली ना मला ?........काय, बाहेर उजाडलं दिखील ! केव्हां घरीं चलायचं ?"

"दासाला आज्ञा होईल तेव्हां !!"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अहंकार

'दुर्लभं मानवं जन्म'–ह्मणजे मनुष्यजन्म दुर्लभ व अतएव सर्वोत्तम असें ह्मणतात; पण कित्येक वेळां मला वाटतें कीं, मनुष्यप्राण्यासारखा दुःखी, कष्टी व पापी प्राणी नसेल. पशुपक्ष्यादिकांमध्यें साहित्यसंगीतकलादि उच्च गोष्टी नसतील; त्यांना ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतां येत नसतील; त्यांना 'आत्मज्ञान' नसेल; 'अहम्' ही भावनाच नसल्यामुळें 'अहं ब्रह्मास्मि' हें तत्त्व त्यांना कळणें शक्य नसेल; पण 'अहं' या पदाबरोबर येणाऱ्या अहंकार, दुःख, पाप इत्यादि गोष्टींपासून पशुपक्षी मुक्त असतील, हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे. 'मी ब्रह्मस्वरूपी आहें' हें ज्ञान झालें, तर उत्तमच आहे. पण हें ज्ञान किती लोकांना होतें ? या संसारांत वावरणारे बहुतेक लोक 'मी पापी आहें–मला हें हवें आहे–मला तें नको आहे' अशा प्रकारचें रडगाणें गात असतात. 'मी जितका सुस्वरूप, श्रीमंत, व सद्गुणसंपन्न असावा तितका आहें' असें ह्मणणारे लोक फारच थोडे. मी ज्या स्थितींत आहें ती स्थिति सुधारावी अशी राजापासून रंकाची इच्छा. प्रत्येक जणाच्या हातून प्रत्यहीं पापें घडत असतात; कायेनें नसलीं तरी वाचेनें, किंवा निदान मनानें तरी घडतातच. तेव्हां असा हा सदा असंतुष्ट, सदा पापप्रवण आत्मा किंवा 'अहंकार' (self-consciousness) अजीबात नसलेला काय वाईट ? कितीहि श्रीमंती असली तरी आत्म्याचें समाधान होत नाहीं; कितीहि प्रयत्न केला तरी नीतिदृष्ट्या आत्मा स्वतःस सदोषच समजतो; किंबहुना जितका तो अधिकाधिक शुद्ध होत जातो तितके तितकें आपले दोष त्याला अधिकाधिकच भासूं लागतात. बरें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तत्त्वचिंतनानें तरी समाधान आहे का? ब्रह्मवेत्त्या पुरुषाची गोष्ट आपण सोडून देऊंया; पण साधारण मनुष्याच्या बुद्धीला तार्किक तत्त्वचिंतनानें विशेषसें समाधान होत असतेंसें दिसत नाहीं. एका शंकेचें समाधान झालें तर दुसरी लगेच दत्त ह्मणून पुढें उभीं राहिलीच ह्मणून समजावी! अशी जर वस्तुस्थिति आहे, तर या सर्व प्रकारच्या असमाधानाला कारणीभूत असलेला 'अहंकार' नष्ट झालेला बरा नाहीं का? माझें 'मीपण' गेलें ह्मणजे मला दुःख कसलें? आणि 'माझ्या हातून अमुक वाईट कृत्य घडलें' अशी भाषा तरी कोठून येणार? माझ्या सर्व दुःखाचें मूळ कारण माझें 'मीपण' आहे. मला जीवनार्थ पुष्कळ कलह करावा लागत असेल, परंतु या बाह्य कलहापेक्षां अंतःकलह फारच कठीण. माझा शत्रु मला जें टोंचून बोलणार नाहीं तें माझें मन मला बोलतें. माझी सावली एक वेळ माझी पाठ सोडील, पण माझें मन मला कधीं सोडीत नाहीं. मी आपल्या शत्रूंना ठार करूं शकेन; पण मनाला ठार कसा करणार? मी निर्धन आहें, मला अमुक पाहिजे, मला तमुक नको, माझी ही वस्तु हरवली, माझा तो प्रिय मित्र निवर्तला, अशी 'मी'च्या बाराखडींतली रड गाणारा 'मी' हाच सर्व दुःखाला कारण आहे. 'मी'ची भावना नसती– ह्मणजे समजा–काष्ठलोष्ठांप्रमाणें मी जर जड, अचेतन, निर्विकार असतों, तर ही सर्व यातायात आपोआपच टळली असती. तेव्हां माझ्यासारखा मला दुसरा कोणीच शत्रु नाहीं.

पण पुनः विचार करूं लागलों ह्मणजे मला असें वाटूं लागतें कीं, 'अहंकारा'सारखा दुसरा प्रिय व मौल्यवान् पदार्थच जगांत नाहीं. आपलें घरदार सोडून देण्यास एखादा महात्मा तयार होईल; पण आपलें आत्मत्व–आपला 'अहंकार' सोडून देण्यास तो तयार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणार नाहीं. अहंभाव ज्यांत नाहींसा झालेला आहे असें बौद्धाचें ‘ निर्वाणपद ’ आह्मांस नको, असें ह्मणणारे तत्त्ववेत्ते पुष्कळ आहेत. वेदान्तांतील ब्राम्ही स्थितींतहि ‘ मी ’ हा पदार्थ सर्वव्यापी ब्रह्मस्वरूपी समुद्रांत बुडून जात असल्यामुळें अनहंकार ब्राम्ही स्थितिहि नको ह्मणणारे कांहीं लोक आहेत. बौद्धांची ‘ निर्वाण ’ किंवा वेदान्त्यांची ‘ब्राम्ही स्थिति’ यांमध्यें अहंभावाचा पूर्ण लय ह्मणजे अत्यंत नाश होतो, हें ह्मणणें चुकीचें असेल. कदाचित् त्या स्थितीमध्यें ‘ मी’चा नाश न होतां तो ‘ मी ’ अधिक व्यापक होत असेल, व ‘ सर्व जग हें माझें स्वरूप आहे ’ ‘ ब्रह्म आणि मी एकच ’ असें तो ‘ मी ’ ह्मणत असेल.

हें कसेंहि असो. त्याबद्दल सध्यांचा वाद नाहीं. ‘ अहंभावा’चें महत्त्व किती आहे हें सांगण्याकरितां हा विषय आणला. संतसंग ज्यांत नाहीं अशी मुक्ति मला नको हें जसें तुकारामांनीं ह्मटलें, तसेंच अहंभावविरहित मुक्ति आम्हांला नको असें ह्मणणारे कित्येक आधुनिक तत्त्ववेत्ते आहेत. अहंभाव नष्ट झाल्यावर माणसामध्यें आणि जड स्तंभामध्यें काय फरक? मनुष्याला दुःख, तळमळ, काळजी नको आहे; पण आत्मनाश त्याहून नको. पशुपक्षी अधिक सुखी असतात, ह्मणून त्यांच्या योनींत जन्म घेण्याची कोणास इच्छा झाली आहे काय? कधीं कधीं क्षणभर तशी इच्छा मनांत उद्भवेल, नाहीं असें नाहीं; पण तसा खरोखर प्रसंग आल्यास बहुतेक सर्वजण मागें घेतील. पशुपक्ष्यांना पुढचीमागची काळजी नसते, पापपुण्याचा विधिनिषेध नसतो; विष्ठादिकांची घाण वाटत नाहीं, मानहानि वगैरेची टोंचणी नाहीं, ह्मणून ते एक प्रकारें मनुष्यापेक्षां सुखी आहेत, हें सर्वजण कबूल करतील, हें खरें. कारण कबूल न करून चालेल कसें?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डुकराला स्वभूमि दास्यांत आहे म्हणून कधीं दुःख झालें आहे का ? आपला अमुक अमुक अपमान झाला म्हणून तें कधीं रुसून बसलें आहे का ? खव्याळ पोरानें धोंडा मारला म्हणजे त्या क्षणीं जें दुःख होईल तेवढेंच. बाकी सारा दिवस मिष्ट पक्वान्नांप्रमाणें घाण भक्षण करीत मौजेनें तें हिंडत राहतें. परंतु साक्रेटिससारख्या तत्त्ववेत्त्याकडे पहा. तो 'कारण' या शब्दाचा खरा अर्थ काय व त्याची व्याख्या कशी करावयाची, या नसत्या तात्त्विक चिंतेनें व्याकुळ होतो, व त्या विचारांनीं आपला सुखाचा जीव उगाच दुःखांत घालून घेतो ! हें सर्व जरी कबूल केलें, तथापि 'I would rather be a dissatisfied Socrates than a satisfied pig' असें जॉन स्टयुअर्ट मिल जें म्हणाला त्याचाच बहुतेक लोक अनुवाद करणार नाहींत का ? याचा अर्थ असा कीं, माणसाला अहंभाव हा इतका प्रिय आहे कीं, त्याकरितां तो पुष्कळ दुःख सोशील, पण अचेतन स्तंभ होऊन तशा प्रकारें सुखदुःखापलीकडे जाण्याची त्याला वासना होणार नाहीं; किंवा खर–शूकरांच्या योनींत जाऊन त्यांच्या निरहंकार समाधानवृत्तीचा तो हेवा करणार नाहीं.

ज्याला त्याला आपला जीव किती प्यारा आहे हें पहावयाचें असल्यास, रस्त्यावर भिक्षा मागणाऱ्या एखाद्या व्याधिग्रस्त, वृद्ध, लुळ्या, पांगळ्या, कुष्ठी माणसाकडे पहा. या जगांत राहून काडीचें तरी सुख आहे का त्याला ? पण तो देखील मरण्यास तयार नसतो ! 'तुला राज्य देतों, तुला राजा करतों, पण तुझी तुला स्मृति राहणार नाहीं–तूं दुसराच कोणी होऊन जाशील' असें जर एखाद्या मांत्रिकानें त्याला सांगितलें, तर तो आपलें आत्मत्व–आपला 'अहंभाव'–सोडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देण्यास तयार होईल किंवा नाहीं, याची मला तरी वानवाच वाटते.

* * *

अहंभावाचा, 'गर्व' असा एक दुसरा अर्थ आहे. अहंभाव फाजील झाला, मी चांगला, मी हुषार, मी सुस्वरूप, मी धोरणी, असा 'मीपणा' वाढला ह्मणजे त्या उत्कट अहंकाराला दोषार्ह स्वरूप प्राप्त होतें. अहंकार या अर्थी वाईटच; पण तो तरी कोणाला सुटला आहे? सर्व प्राण्यांमध्यें मनुष्य शहाणा, व गाढव मूर्ख, असा लोकप्रवाद आहे; पण मनुष्याच्या अहंकाराकडे पाहिलें—जो तो 'मी चांगला, हुषार, शहाणा, असें आपल्या मनांत तरी आपलें कौतुक कसें करून घेत असतो हें पाहिलें—ह्मणजे गाढवाचा नंबर सर्वांत शेवटलाच आहे, अशी खात्री वाटत नाहीं. मनुष्याच्या स्वभावसिद्ध गर्वाचा, त्याच्या ऐटीचा, त्याच्या स्तुतिप्रियतेचा विचार करूं लागल्यावर गांभीर्य कायम राहणें कठीण, कारण 'अहंकारामुळें मनुष्य-प्राणी हा हास्यास्पद झाला आहे. सिंहव्याघ्रादि प्राणी क्रूर असतील; खर-शूकरादि घाणेरडे असतील; कृमिकीटादि क्षुद्र असतील; पण ते हास्यास्पद खास नाहींत. तें स्थान ईश्वरानें मनुष्यासच दिलेलें आहे. नव्हे, देवहि त्या पदाचे थोडेफार अधिकारी आहेत. परमेश्वराला तरी हा हास्यास्पद अहंकार सुटला आहे किंवा नाहीं कोणाला ठाऊक! भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेंत आत्माभिमान सोडून देऊन सर्व कृत्यें ईश्वरार्पण करावींत असा सदुपदेश करतात; परंतु स्वतः 'मी' च्या बाराखडीशिवाय एक वाक्यहि बोलत नाहीं. 'मला शरण ये, मी तुला पापापासून मुक्त करीन,' 'मीं हे सर्व सैनिक आधींच मारून ठेविले आहेत,' 'मीं हें सर्व जग उत्पन्न केलें आहे,'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'ऋतूंमध्यें मी अमका, ऋषींमध्यें मी तमका,' इत्यादि इत्यादि 'मत्पर' वाक्यें भगवद्गीतेंत किती आहेत याची कोणीं उद्योगी जर्मन प्रोफेसरानें गणति केली आहे किंवा नाहीं हें ठाऊक नाहीं; तथापि एवढें ह्मणतां येईल की, 'मी शहाणा व बाकीचे सर्व वेडे, माझें सर्व लोकांनीं ऐकलें पाहिजे, मलाच लोकांची—अज्ञ जनसमूहाची काळजी, इतरांस नाहीं' असा एखाद्या नोकरशहास अभिमान असेल, तर त्यानें भगवद्गीता वाचावी, ह्मणजे त्याचा अभिमान जागच्या जागीं जिरेल!

* * *

एके ठिकाणीं ऐकलेली ही एक हरदासी कोटि झाली. 'अहंकार' सुटणें फार कठीण, याविषयीं लिहीत असतांना ही गोष्ट निघाली. असो. सज्जनांना अहंकार नसतो असें आपण ह्मणतों; पण 'मी इतरांसारखा पापी नाहीं, मी सदाचार कधीं सोडलेला नाहीं' अशा प्रकारचा अभिमान त्यांनाहि बहुधा असतोच. अनुभवानें किंवा सुशिक्षणानें किंवा सत्संगतीमुळें धन, सुस्वरूप, विद्वत्ता इत्यादिकांचा अभिमान वयपरत्वें गळत जातो; पण 'मी चांगला—निष्पाप—आहें' हा अभिमान मोठमोठ्या साधुसंतांनाहि सुटलेला नाहीं. एका मार्मिक गृहस्थानें एकदां ह्मटलें कीं, हा अभिमानहि एक वेळ जाईल; पण 'मी निरभिमानी आहें' हा सूक्ष्मतर अभिमान त्याच्या जागीं येईल, व हा ज्याचा गळेल तो जीवन्मुक्तच होय यांत संशय नाहीं. रोमच्या पहिल्या सीझर बादशहासारखा शहाणा, व्यवहारचतुर व मनुष्यस्वभावाची पारख असलेला मनुष्य तोंडपुजे लोकांच्या स्तुतीला भाळून जात नसे; परंतु 'कॅशिअस'सारख्या चतुर मनुष्यानें सीझरजवळ जाऊन 'तुमच्यामध्यें व इतर मोठमोठ्या लोकांमध्यें हाच फरक कीं, तुम्हाला स्तुति आवडत नाहीं, तुम्ही निरहंकार आहांत' असें ह्मटल्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सीझरलाहि बरें वाटलें व तो स्तुतीच्या मोहांत सांपडला, असें शेक्स-पिअरनें आपल्या नाटकांत दाखविलें आहे, तें फार मार्मिक आहे.

* * *

मोठमोठ्या लोकांची ही स्थिति; तर मग 'मेघराजा'सारख्या माझ्या मित्राची काय कथा? मेघराज हा ह्मणजे विशेष गर्विष्ठ होता असें नव्हे; उलट तो बोलण्याचालण्यांत फारच साधाभोळा, प्रांजल, मन-मिळाऊ, व एकंदरींत 'गोड' होता; परंतु त्याला मोठी हौस कीं आपण कविता कराव्या, आणि उत्तम नाहीं तरी चांगल्यापैकीं एक कवि ह्मणून आपली प्रसिद्धि व्हावी. त्याच्यांत काव्यनिर्माणशक्ति बरीच होती; ह्मणजे तो कविता बऱ्याच जलद करीत असे. बरेच शब्दा-लंकार व थोडेसे अर्थालंकार घालून तो आपल्या कवितारूपी कन्यांना सजवीत असे. पण कविप्रतिभा ह्मणून जिला ह्मणतात ती वस्तु त्याच्याजवळ विशेष नसल्यामुळें त्याच्या अलंकारयुक्त कवितांकडे कोणत्याहि रसिकाचें मन फारसें जात नसे. मेघराजाला दारिद्र्याची विशेष पर्वा वाटत नसे. 'सरस्वती–भक्तांवर लक्ष्मीची प्रीति नसावया-चीच' असें तो अभिमानानें ह्मणत असे. आपल्या कवितांबद्दल कोणी पैसे देत नाहीं ह्मणून त्याला थोडेंसें वाईट वाटत होतें हें खरें; पण त्या कवितांकडे दुर्लक्ष करितात हें पाहून त्याला अधिक वाईट वाटत असे. लक्ष रुपयांपेक्षां रसिकांच्या 'लक्षा'ची तो अधिक किंमत समजत असे.

एक दिवस मी पुण्यांतील नेटिव्ह जनरल लायब्ररींतील मागच्या लहानशा बागेंत वाचीत बसलों असतां मेघराज तेथें आला, व "बरी गांठ पडली, तुझ्याकडे मी येणारच होतों" असें मला ह्मणाला. "कां, सचित्र विश्वरंजनानें तुझी कविता घेतली नाहीं कीं काय?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें मीं त्याला विचारल्यावर तो ह्मणाला " नाहीं; त्याच्या एडिटराला माझ्या कवितेचा अर्थच कळेना. हें असें चालायचेंच ! प्लेटोनें जसें ह्मटलें आहे कीं राजे ऋषि झाल्याशिवाय, किंवा ऋषि राजे झाल्याशिवाय, राष्ट्राची पूर्ण उन्नति व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणेंच मलाहि असें ह्मणावेंसें वाटतें कीं, ग्रंथकार प्रकाशक झाल्याशिवाय, किंवा प्रकाशक ग्रंथकार झाल्याशिवाय, वाङ्मयाला ऊर्जितावस्था यावयाची नाहीं ! पण हें असूं द्या. आज मी तुला दुसऱ्याच एका कामाकरितां भेटणार होतों."

" दुसरें काय काम ? पैसे—"

" छे, छे, छे ! मीं एक कवितामिश्रित गद्य लेख लिहीला आहे, हें तुला ठाऊक आहेच. तो—"

" कस्तूरीमिश्रित शक्तिवर्धक गोळ्यांसारखा चांगला असलाच पाहिजे !" मीं मध्येंच ह्मटलें.

" लेख वाचून पाहिल्यावर अशी थट्टा नाहीं करणार तूं" मेघराज ह्मणाला. " पण तो छापण्यापूर्वीं तुझ्या एकदा नजरेखालून जाऊं दे."

असें ह्मणून त्यानें आपल्या मळक्या लांबलचक पांढऱ्या कोटाच्या आंतल्या मोठ्या खिशांतून एक मोठें बाड काढलें व तें माझ्या हातीं देऊन 'हें तपासायचें" असें तो म्हणाला. तें बाड पाहिल्याबरोबरच माझ्या छातीवर मोठी धोंड पडल्यासारखें मला झालें. पण लहानपणापासूनच्या प्रिय मित्राचें मन दुखविणें शक्य नव्हतें. "यांतल्या कांहीं ओळी सुधारावयाच्या आहेत तुझें मत घेऊन" असें लगेच तो म्हणाला व माझ्या हातून तें बाड घाईघाईनें घेऊन त्यानें भराभर त्यांचीं पानें चाळण्यास आरंभ केला, आणि शेवटीं "ही पहा, ही ओळ तुला कशी काय वाटते ? एक शेतकरी आपल्या बायकोला रागें भरत आहे, असा संदर्भ आहे:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता सोव्या कोठें, सांग तुझा शेण खावया राधे ॥"

मीं ह्मटलें "मोरोपंतांची आठवण होते ही ओळ ऐकून! 'गेला होता कोठें धर्म तुझा तेधवां वृथा सांग' यासारखीच हुबेहुब तुझी ओळ आहे."

"मोरोपंताची मधूनमधून आठवण व्हावी ह्मणून अशा पुष्कळ ओळी मीं यांत घातल्या आहेत; पण याच्यांत तुला विचारावयाचें असें कीं '**सोव्या होता कोठें**' असें कानाला चांगलें लागतें, का '**होता सोव्या कोठें**' असें ह्मटलेलें? ऐक, मी पुनः ह्मणतों:—

होता सोव्या कोठें, सांग तुझा शेण खावया राधे ॥

असें ह्मणावें, का

सोव्या होता कोठें, सांग तुझा शेण खावया राधे ॥"

"दोन्हीहि ओळी सारख्याच लागतात" मी ह्मटलें. "ॲडिसननें आपल्या एका विनोदी लेखांत तुझ्यासारख्या एका कवीशीं झालेल्या संभाषणाचें वर्णन केलें आहे, त्यांतहि तुझ्यासारखीच त्या कवीनें शंका विचारलेली आहे:—

'You sing your song with so much ease'

असें ह्मणावें, का

Your song you sing with so much ease,

असें ह्मणावें? अशी त्या कवीला मोठी शंका होती. तो—'

"ह्मणजे माझी शंका मूर्खपणाची आहे असेंच तुझें म्हणणें दिसतें?" मेघराज जरासा ओशाळून म्हणाला. "साधारण मनुष्याला दोन्ही शब्दरचना सारख्याच भासतील; पण सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्या तज्ज्ञ रसिकाला त्यांतच बारीकसारीक भेद दिसून येतील. आतां याच ओळींत पहा ना? हिच्यांतला अनुप्रास हा अलंकार साधारण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसाला दिसायचा नाहीं. त्यांना 'त' ला 'त' आणि ' न ' ला ' न ' असेल तेव्हांच अनुप्रास ओळखतां यायचा. पण असले ओबडधोबड अलंकार मला नाहीं आवडत. माझ्या कवितेंत पहा. 'होता सोव्या कोठें' यांत हो–सो–को या 'ओ'कारान्त आद्याक्षरांची एक गंमत आहे. दुसरी अशी गंमत साधून गेली आहे कीं, ' होता ' आणि ' सोव्या ' यांतील 'ता' आणि 'व्या' यांमध्येंहि एक प्रकारचें सूक्ष्म व कोमल साम्य आहे, आणि ' कोठें ' मधला ' ठ ' हा देखील टट्टाच्या बाराखडींतला आहे—"

" आणखी लेखकहि ' ढ ' असल्यामुळें तोहि त्याच 'टट्टा'च्या बाराखडींतला आहे" मीं मध्येंच ह्मटलें. मेघराज बालमित्र असल्यामुळें या बोलण्यानें त्याला माझा राग आला नाहीं; उलट तो हंसूं लागला.

" असो. माझ्यावर बाजू उलटविलीस खरी !" कांहीं वेळानें मेघराज ह्मणाला. " पण माझें हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर मग विचारीन तुला काय तें."

" प्रसिद्ध 'होईल' तेव्हां ना ? पुष्कळ अवकाश आहे ! आजच कांहीं या प्रश्नाची घाई नाहीं ह्मणायची. एखाद्या प्रकाशकाला दाखवलें होतेंस का ?"

" हो. तूं 'चंपकतरू'च्या प्रकाशकाकडे जाण्यास सांगितलेंस ह्मणून मी गेलों. गृहस्थ बोलण्यांत मोठा पटाईत आहे. वय तिशीच्या आंत असेल; परंतु मोठा पोक्त दिसतो. निदान तशी ऐट तरी तो आणतो. त्याचा तो मागें शेमला सोडलेला रेशमी पटका छचोर थाटाचा होता. पण बोलण्यांत तो पुरा ' राष्ट्रीय ' पक्षाचा होता. त्यानें माझा 'प्लॉट' विचारून घेतला आणि एकदम सांगितलें कीं, " तुमचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
कवितामिश्रित लेख आह्मास नको. कां तर, "तुह्मीं शेवट कडू केला आहे." "तो कसा ? मीं तर गोष्ट आनंदपर्यवसायी केली आहे—" मीं ह्मटलें. "तसें नाहीं हो," तो ह्मणाला. "तुम्हीं त्या नायकाला 'समाजसुधारक' केला आहे. हें तत्त्व आह्मांला पसंत नाहीं." "तुह्मांला नसलें ह्मणून काय झालें ? लेखकांचीं आणि प्रकाशकांचीं मतें एक असलीं पाहिजेत असें कुठें आहे ?" मीं विचारलें. "हेंच तत्त्व आह्मांला पसंत नाहीं ! आमच्या मासिकांत तुमच्या 'सुधारणां'ना थारा नाहीं मिळणार ! सुधारकी लेख आम्हीं छापणें ह्मणजे सुधारकांचेंच आम्हीं काम करण्यासारखें आहे. तें करण्याइतके आम्ही मूर्ख नाहीं !" "वाचकांना विचार करण्यास शिकविणारे लेख पाहिजेत, का विशिष्ट मतांचें शिजविलेलें अन्न घशांत कोंबणारे लेख तुह्मांला पाहिजेत ?" असें मीं विचारल्यावर त्या पक्षाभिमानान्ध 'राष्ट्रीय' प्रकाशकबहादरांनीं "आह्मांला तें कांहीं समजत नाहीं; सुधारकी लेख घ्यायचे नाहींत एवढें खरें !" असें जोरानें म्हटलें व टेबलावर पडलेल्या 'ऑर्डरी' ते वाचूं लागले. अर्थात् मीं त्यांची लवकर रजा घेतली."

ही कथा ऐकून मीं मेघराजाला ह्मटलें, "तुला खरें सांगूं का, मेघराज ! त्यांना तुझी भाषा आवडत नाहीं व तुझ्या लेखांत कांहीं ग्राह्यांश नसतो, म्हणून त्यांनीं तुझे लेख नाकारले. बाकी 'चंपक-तरू'चे प्रकाशक कांहीं तसे वाईट नाहींत. बरें, 'तारांगणा'च्या सुधारक प्रकाशकाकडे गेला होतास का तूं ?"

"हो, त्यांनीं मला प्रथम असा प्रश्न विचारला कीं "लेख राजकीय आहे का सामाजिक ?" "सामाजिक" ह्मणून मीं उत्तर दिल्यावर त्यांना जरा बरें वाटलें, व आपल्या कांपऱ्या हातांत त्यांनीं माझें बाड घेतलें व डोळ्यांना चष्मा लावून ते वाचूं लागले. दोनतीन मिनिटांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मला ते ह्मणाले, "लेखांत थोडासा फेरबदल करावा लागेल, बाकी सर्व ठीक आहे." "कसला फेरबदल ?" मीं विचारलें. यावर तो ह्मणाला "कांहीं शब्द, वाक्यें वगैरे बदलावयाचीं, दुसरें कांहीं नाहीं. उदाहरणार्थ, हें पहा तुमचें वाक्य:—'पैशाच्या लालचीनें त्या दुष्ट मारेकऱ्यानें राजाचा खून करण्याचा निश्चय केला—' येथें 'राजाचा खून' हे शब्द काढून 'राजास जखमी करण्याचा' असे सौम्य शब्द घातले पाहिजेत. तसेंच हें एक वाक्य पहा. 'त्या क्रिकेटच्या खेळांत यंग अमॅट्यूर्सनीं साहेबांची चांगलीच रग जिरविली' हें वाक्य काढिलें पाहिजे. साहेबांनीं अमॅट्यूर्सचा पराभव केला असा कां प्लॉट आणला नाहीं ? आणखी हे शब्द पहा. 'तंबाखू नको' यांत 'खून' शब्द गर्भित आहे. सरकार गर्भित अर्थाकडेहि लक्ष देतें हें तुह्मां लेखकांना समजत नाहीं. 'तंबाखू नको'च्या ठिकाणीं 'तंबाखू नाहीं' असें, नाहीं तर असेंच कांहीं तरी, लिहा ना ?" यावर "संदर्भाला आणि अर्थाला जुळलें पाहिजे ना हें ?" असें मीं जरा रागानें आणि त्रासिक मुद्रेनें ह्मटलें. "अहो, असे अर्थाकडे पाहूं लागलेत, तर अर्थप्राप्ति कशी होईल!" ते स्वयंसंतुष्ट मुद्रककपि आपल्या छापील कोटीची एक प्रत माझ्याकडे टाकून व हंसून ह्मणाले आणि मीहि लवकरच आपलें बाड घेऊन तेथून निघून घरीं आलों."

"फारच सोंवळे झाले आहेत ह्मणायचे हे! कोंकणांतल्या सोंवळ्या ब्राह्मणांना ह्मारापोरांच्या सावलीचा जसा विटाळ होतो तसा यांना 'खून' 'युद्ध' इत्यादि शब्दांचा विटाळ होतोसा दिसतो!"

"चालायचेंच असें!" मेघराज निराशायुक्त तात्त्विक समाधानवृत्तीनें ह्मणाला. "हस्ते पायसदग्धे तक्रं फूत्कृत्य पामरः पिबति!' हेंच खरें!"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"बरें मग आतां पुढें काय ?" मीं विचारलें.

"पुढें काय ? इजा, बिजा, तिजा प्रकाशक. माझें पुस्तक प्रकाशकांना नाहीं तरी विद्वानांना पसंत पडेल असें मला तरी वाटतें. मग त्याला तूं गर्व ह्मण किंवा कांहीं ह्मण !"

"कशावरून ह्मणतोस हें ?"

"मीं एकदोघांना दाखवून पाहिलें."

"कोणते हे 'एकदोघे' विद्वान् ?"

मेघराजाचें हस्तलिखित पुस्तक वाचण्याचे परिश्रम करणारे कोणी विद्वान् सांपडणार नाहींत अशी माझी खात्री होती; आणि कोणीं वाचलें असलें, तर त्याला त्याच्यांत कांहीं विशेष गुण दिसणार नाहींत ही त्याहून अधिक खात्री होती. तेव्हां त्याच्या 'विद्वान् रसिकांचीं' नांवें ऐकण्यास मी उत्सुक झालों.

त्यानें मला एका प्रसिद्ध ग्रंथकाराचें नांव सांगितलें व तो ह्मणाला "फारच त्यांनीं माझी स्तुति केली. माझ्या अपेक्षेच्या पलीकडे—अगदीं—"

"काय, म्हणाले तरी काय असें ?" मीं कुतूहलपूर्वक विचारलें.

"त्यांनीं माझ्या अक्षराचीच स्तुति करण्यापासून आरंभ केला. 'असें स्वच्छ, इतक्या परिश्रमानें लिहिलेलें, इतकें वळणदार अक्षर मीं कधीं पाहिलें नव्हतें.' "

"पण आंतल्या मजकुराबद्दल काय म्हणाले ? तुझ्या 'कवितामिश्रित गद्याची किंमत अक्षरावर ठरवायची कीं काय ?"

त्यांनीं नांव घेतलेले गृहस्थ गोड बोलून शालजोडींतले मारणारे होते हें मला ठाऊक होतें. मेघराजालाहि त्या ग्रंथकाराच्या या कुत्सित स्वभावाची कल्पना होती. पण अहंकारानें त्या बिचाऱ्याला मोह पडला; आणि कोणाला पडणार नाहीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" मजकुराविषयीं ते ह्मणाले कीं, ' तुमची ही पद्यमिश्रित गद्याची कल्पना ' नवीन ' आहे. तुम्ही जर आणखी परिश्रम घेतले असतेत तर ग्रंथ आहे त्याहून चांगला झाला असता–तुमचा पहिला प्रयत्न आहे या मानानें पाहतां तुह्मांला तो भूषणावह आहे—"

कल्पना ' नवीन ' आहे पण चांगली का वाईट, याबद्दल कांहींच मतदिग्दर्शन नाहीं, हें मेघराजाच्या ध्यानांत आलें नाहीं; तसेंच, 'अधिक परिश्रम केले असते तर ग्रंथ अधिक चांगला झाला असता' हें कोणत्याहि ग्रंथाबद्दल ह्मणतां येईल. तसेंच पुढच्या वाक्यांतील हा प्रयत्न 'तुह्मांला' भूषणावह आहे, या वाक्यांतील मर्मभेदक खोंच मेघराजाला कळली नाहीं ह्मणून बरें झालें. नाहींतर तो मेल्यापेक्षां मेला झाला असता. मी तीं अप्रस्तुतप्रशंसापर वाक्यें मुकाट्यानें ऐकून घेत होतों. कांहीं बोललों नाहीं ह्मणून मेघराज मला ह्मणाला, " कां, आतां झाली खात्री ? आतां माझी चेष्टा करण्याची आहे का तुझी छाती ?"

" बरें, आणखी काय बोलले तें तर सांग, मग चेष्टेचें पुढें पाहूं."

" आणखी ते ह्मणाले कीं, 'तुमच्यासारख्यांना लोकाश्रय मिळायचा नाहीं हें उघड आहे; पण या जगांत असेंच चालायचें.' आणखी त्यांनीं मीं दिलेल्या quotations ची (अवतरणांची) फारच स्तुति केली. ' तुमच्या ग्रंथांत तीं फारच खुलून दिसतात !' असें ते ह्मणाले."

या शेवटल्या वाक्यांतील खोंच फारच मनाला लागण्याजोगी होती. अशीं निर्घृण वाक्यें त्या गृहस्थाच्या तोंडून कशीं निघालीं हें आश्चर्य आहे. पण आश्चर्य तरी कसलें ? स्वयंमन्यतेमुळें तो विचारान्ध झाला !

मेघराजाच्या संभावनेची हकीकत मीं ' होस हो ' करून कशीबशी शेवटपर्यंत ऐकून घेतली, व म्हटलें, "बरें चला. कोणी तरी तुला रसिक मिळाला हें ठीक झालें."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" तरी तुझी या बाडावरून नजर गेलीच पाहिजे. तुला विचारून मला कांहीं सुधारणा करायच्या आहेत."

" नको, मी नाहीं वाचीत तें. मी टीका करून तुझ्या कवितांच्या चिंधड्या उडवीन !"

मेघराजाच्या दहावीस हजार कवितांचें बाड वाचण्याचा प्रसंग टळावा ह्मणून मी आपलें कांहीं तरी हें बोललों. त्याच्या पुष्कळ कविता मीं वाचल्या होत्या व आतां यापुढें त्यांमध्यें वेळ फुकट दवडावयाचा नाहीं असा निश्चय केला होता.

" नाहीं, तें चालायचें नाहीं. तूं लंगोटीमित्र म्हणून तुला हें बाड माझ्याकरितां वाचलेंच पाहिजे आणि टीकेविषयीं म्हणशील तर मला टीकाच हवी आहे. तुझ्यासारखा प्रांजल टीकाकार मला मिळायचा नाहीं. मीं पुष्कळ विद्वान् टीकाकार पाहिले आहेत, पण तुझ्यासारखा 'निरभिमानी, मार्मिक, सरळ, प्रांजल, सहानुभूतिपूर्ण, असूयारहित–"

" आणखी मोठमोठीं विशेषणें काढलींस आणि स्तुति केलीस, तरी मी तुझें हें बाड वाचणार नाहीं ! मला वेळ नाहीं !"

हें मीं निश्चयाचा आव आणून म्हटलें खरें; पण अखेर तें कवितांचें ओझें घरीं घेऊन गेलोंच ! कां ? मेघराजाच्या स्तुतीला भाळून ? मेघराजाप्रमाणें मलाहि अहंकारानें पछाडलें काय ? कोणाला ठाऊक ! गेलों खरा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अप्रकाश–किरणांचा दिव्य प्रकाश.

प्रो. जगदीशचंद्र बोस यांनीं वनस्पतिशास्त्रांत जे अपूर्व शोध लावले आहेत त्यांची थोडीबहुत माहिती आतां बऱ्याच लोकांना झालेली आहे; पण त्यांच्याच तालमींत तयार झालेल्या व त्यांच्यावर कांहीं बाबतींत ताण करणाऱ्या बाबू प्रफुल्लकुमुद मुकर्जी यांच्या अपूर्व शोधांची आपल्या महाराष्ट्रांत जितकी ख्याति व्हावी तितकी झालेली नाहीं. याचें कारण असें कीं बाबू प्रफुल्लकुमुद यांनीं आपल्या शोधांची उपपत्ति व तद्विषयक प्रयोग यांविषयीं इंग्रजींत किंवा बंगालींतहि पुस्तक लिहिलेलें नाहीं. दुसरें असें कीं हे शोध प्रसिद्धीस यावेत अशी त्यांची स्वतःचीच आतां इच्छा राहिली नाहीं. 'शोध अपूर्व व क्रांतिकारक तर खरेच; पण त्यांपासून जगाचें एकंदरींत नुकसान होणार म्हणून ते आपल्याबरोबर विलयाला गेलेले बरे' अशी त्यांची कल्पना (अर्थात् चुकीची कल्पना) आहे; आणि म्हणून त्यांनीं आपली गुरुकिल्ली अद्यापपर्यंत कोणालाहि सांगितलेली नाहीं. हिंदुस्थानांतील इतर सूक्ष्म शोधांचें जसें झालें तसें या शोधाचें देखील होणार असें लक्षण दिसतें, पण त्याला इलाज नाहीं ! त्यांचा शोध कोणत्या प्रकारचा होता व तो जगाला अपकारक होईल असें त्यांना कां वाटतें हें पूर्वींच्या त्यांच्या एका बंगाली शिष्याकडून या लेखकाला पत्रद्वारें कळलें आहे. या पत्राच्या आधारेंच पुढील भागांत याचें जे वर्णन केलेलें आहें तें वाचकांना बोधप्रद होईल अशी आशा आहे.

प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं बाबू प्रफुल्लकुमुद हे एक चांगले श्रीमंत असे जमीनदार होते, व त्यांची बुद्धिमत्ता आणि कल्पकता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीव्र होती. आणि विशेष हें कीं श्रीमंत असून त्यांच्यामध्यें ज्ञानलालसा बरीच होती. त्याहून विशेष हें कीं त्यांचा स्वभाव फारच सुशील व परोपकारी होता. बी. ए. झाल्यानंतर ते प्रो. जगदीशचंद्र बोस यांच्या प्रेमळ व स्फूर्तिदायक सहवासाचा आणि शिक्षणाचा अनुभव घेऊं लागले. कांहीं वर्षें या निरुपम सात्त्विक सुखाचा आस्वाद घेतल्यानंतर प्रफुल्लकुमुद यांच्या मनानें घेतलें कीं, आपण आपल्या गुरूप्रमाणें विशिष्ट शोध लावण्याच्या कामीं आपलें धनसर्वस्व, बुद्धि-सर्वस्व व आयु:सर्वस्व खर्च करावें. प्रो. बोस यांना आपल्या शोधाच्या कामीं प्रफुल्लकुमुद यांची बरीच मदत होत होती व म्हणून त्यांनीं ‘ माझ्याकरितां तरी आणखी कांहीं वर्षें मजजवळ रहावें'' असें म्हटलें, व प्रफुल्लकुमुद यांनीं तें कबूलहि केलें. कारण कोणाचेहि मन मोडणें हें त्यांच्या जिवावर येत असे; परंतु कांहीं दिवसांनीं त्यांच्या सुपीक डोक्यांत एका विलक्षण शोधाची कल्पना आली. ही कल्पना थोड्या अवधींत इतकी प्रबळ झाली कीं त्यांना दुसरें कांहीं सुचनासें झालें. घरीं-दारीं, बसल्याउठल्या, जागें असतांना, स्वप्नांत, शोधाचे विचार ! मदन-बाधेनें कामुक नायकाच्या किंवा नायिकेच्या अवस्थेचें काव्यांत किंवा नाटकांत जसें वर्णन केलेलें असतें तशी त्यांची स्थिति झाली. मित्रमंडळी वेड लागलें कीं काय ह्मणून चेष्टा करूं लागली. बायकोकडे ते दुर्लक्ष करूं लागल्यामुळें प्रथम असूयामूलक तिला भलतीच शंका आली. ती रुसलीफुगली, पण या स्वारीला शोधाशिवाय दुसरेंतिसरें सुचत नसल्यामुळें त्या तिच्या रुसण्याफुगण्याचा उपयोग झाला नाहीं. यामुळें त्या मानिनी गृहिणीचा संताप अधिकच प्रज्वलित झाला, व काय करावें नि काय करूं नये असें तिला होऊन गेलें. प्रो. बोस यानींहि प्रफुल्ल-बाबूंकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहिलें नाहीं. ‘तुमची कल्पना बरोबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे, पण अव्यवहार्य आहे एवढेंच काय तें' असें प्रेमानेंच पण किंचित् उपरोधिक विनोदानें ह्मणून प्रो. बोस यांनीं प्रफुल्लकुमुदांना वाटेस लावलें. परंतु त्यांचा नाद कांहीं केल्या सुटेना. उलट तो दुणावला. अर्थात् प्रो. बोस यांच्या कामाकडे प्रफुल्लांचें दुर्लक्ष होऊं लागलें व शेवटीं नाइलाज म्हणून बोस यांनीं प्रफुल्लबाबूंना 'आपल्या शोधाचें काम घरीं बसून स्वस्थपणें व एकाग्रतेनें पहा ह्मणजे ठीक पडेल' असें सुचविलें.

अशा प्रकारें चांगली फुरसत मिळाल्यानंतर आणि चोवीस तास आपलेसे झाल्यानंतर बाबू प्रफुल्लांनीं आपल्या घरची रासायनिक प्रयोगशाला विस्तृत केली. यापायीं अर्थात् घरादाराचें वाटोळें झालें; बायकोच्या कांहीं जडजवाहिरांचें आणि सोन्याच्या दागिन्यांचेंहि ॲसिडांत, कांचेच्या भांड्यांत व नळकांड्यांत रूपांतर झालें. बायकोला नवरा ठार वेडा झाला असें वाटूं लागलें व दागिने गेल्यापासून तर तो शत्रूसारखा भासूं लागला! पण ती करणार काय?

अशिक्षित व ऐहिक विलासदृष्टीच्या बायकोची नाहीं तर नाहीं, पण आपल्या सुशिक्षित व रसिक मित्रांची तरी सहानुभूति मिळते कीं काय ह्मणून पहावें, या हेतूनें प्रफुल्लकुमुदांनीं त्यांच्या गांठी घेतल्या. पण त्यांनींहि हा अव्यवहार्य नाद सोडून देण्याला त्यांना सांगितलें. परंतु आपल्या गुरूप्रमाणें शोध लावून आपल्या देशाचें नांव जगांत आपणहि अधिक मानार्ह करूं, अशी सात्त्विक महत्त्वाकांक्षा त्यांच्यामध्यें त्या वेळीं प्रबळ असल्यामुळें सारें जग उलट गेलें व खाण्यास उठलें तरी त्यांनीं आपला नाद सोडला नाहीं; आणि इश्वरानें त्यांचा फार अंत पाहिला नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बी. ए. झाल्यावर प्रो. बोस याचें काम संभाळून प्रफुल्लकुमुदांनीं जो शोध चालविला होता तो खोट्या मोत्यांना खऱ्या मोत्यांचें काठिन्य व त्यांचा रंग कसा देतां येईल याविषयींचा होता. पुढें एका गिरणीच्या कामगारानें रंग पक्के करणें, निरनिराळे सुंदर रंग मिश्रणानें तयार करणें, सुताचा व कापडावरचा रंग काढून तीं स्वच्छ करणें, इत्यादि प्रकारच्या शोधांची हल्ली फार आवश्यकता आहे असें सांगितलें व प्रफुल्लबाबूंनीं आपले शोध त्या दिशेनें चालविले. या प्रयत्नांत त्यांना बरेंच यश आलें असें जरी ह्मणतां आलें नाहीं तरी विजेच्या साहाय्यानें पदार्थांचे रंग कसे एकदम बदलतात यांबद्दल त्यांना बरेच चमत्कार दिसून आले. व्यावहारिक प्रयोगाच्याच नव्हे, तर तात्त्विक उपपत्तीच्या दृष्टीनेंहि रंगाबद्दलचे त्यांचे विचार क्रांतिकारक होते. इंग्रजींत ज्यांना 'क्ष' किरणें (X rays) ह्मणतात त्यांच्या योगानें भिंतीच्या आड काय चाललें आहे हें दिसतें, पेटींत काय आहे हें दार न उघडतां कळतें, पोटांत सुई कोठें अडकली आहे किंवा रोग कोठें आहे हें ओळखतां येतें. रान्टजेन नांवाच्या शास्त्रज्ञानें लावलेल्या या क्रांतिकारक शोधापेक्षां प्रफुल्लकुमुदांचा शोध अधिक महत्वाचा व जगांत खळबळ उडवून सोडणारा होता. 'क्ष' किरणांना त्यांच्या शोधकाच्या नांवावरून 'रान्टजेन' किरणेंहि म्हणतात. तसेंच प्रफुल्लबाबूंच्या किरणांना 'प्रफुल्ल' किरणें ह्मणण्यास हरकत नाहीं. 'क्ष' किरणांच्या योगानें सामान्य डोळ्यांना अदृश्य असलेली वस्तु दिसते; 'प्रफुल्ल' किरणाच्या साहाय्यानें कोणतीहि वस्तु सामान्य डोळ्यांना अदृश्य होते, ह्मणजे या किरणाचें कार्य 'रान्टजेन' किरणांच्या उलट आहे. 'रान्टजेन' किरणें अदृश्यदर्शक आहेत, 'प्रफुल्ल' किरणें अदृश्यकारक आहेत. या दुसऱ्या किरणांचें पटल विशिष्ट स्थितीच्या व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकारच्या विजेनें एखाद्या वस्तूवर पसरलें ह्मणजे ती वस्तु–निर्जीव अथवा सजीव वस्तु–अदृश्य होते ! बायका, मुलें व पुरुष यांच्यावर प्रयोग करून पाहिले असतां तेहि अदृश्य झाले. म्हणजे ते नाश पावले नाहींत, तर जागच्याजागीं असून सामान्य मानवी डोळ्यांना दिसेनासे झाले !

बाबू प्रफुल्लकुमुद यांनीं Berkeley's theory of Vision नांवाचें पुस्तक वाचल्यापासून त्यांची अशी खात्री झाली होती कीं रंग हे वस्तूंमध्यें वास्तविक नसतात, तर ते पाहणाराची दृष्टि, तिचें स्थान, तिच्यावर सूर्य किरणें कोणता कोन करून पडतात, तिच्याभोंवतीं कोणत्या वस्तु असतात, या गोष्टींच्या अपेक्षेनें रंग बदलतात. 'पानी, तेरा रंग कैसा ? तो जिसमें मिला वैसा.' पाण्याचें कशाला, सर्व वस्तूंची अशीच स्थिति आहे. पदार्थविज्ञानशास्त्राचीं आधुनिक तत्त्वें देखील असें सांगतात कीं एखाद्या वस्तूचा रंग म्हणजे त्या वस्तूंत कांहीं स्वतंत्र तत्त्व आहे असें नव्हे; तर त्याच्यावर येऊन आदळणाऱ्या अनेक व अनेकविध किरणांपैकीं जीं त्या वस्तूला शोषून घेतां येत नाहींत–म्हणजे जीं त्या वस्तूंत लीन होऊं शकत नाहींत–त्या किरणांचा रंग त्या वस्तूला चढतो. आंबा 'हिरवा' आहे याचा अर्थ आंब्यावर जीं किरणें पडतात त्यांतील हिरव्याशिवाय इतर किरणांचे अंश आंब्यामध्यें लीन होतात. हिरवेपणा वास्तविक आंब्यांत नाहीं, तर एका अर्थी बाह्य किरणांत आहे. या गोष्टींचा बाबू प्रफुल्लकुमुद विचार करू लागल्यावर त्यांना अशी कल्पना सुचली कीं, वस्तूवर पडणारीं सर्व प्रकारचीं किरणें शोषून घेऊन आत्माधीन किंवा आत्मलीन करण्याची शक्ति जर त्या वस्तूला कोणत्या तरी कारणानें प्राप्त झाली तर त्या वस्तूला कोणताहि रंग असणार नाहीं, म्हणजे ती अदृश्य होईल !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूर्यकिरणांचें पृथक्करण करून त्यांतून सात रंग दाखविण्याचे प्रयोग, किंवा सात रंगांच्या कागदांच्या चकत्या कमळासारख्या पुठ्यावर डकवून तो पुठ्ठा जोरानें गरगर वाटोळा फिरविल्यावर पांढरा रंग उत्पन्न करून दाखविण्याचे प्रयोग, पुष्कळ वाचकांनीं पाहिले असतील. हातचलाखीनें वस्तु जागच्याजागीं नाहींशी करण्याचे गारुडी खेळहि पुष्कळांनीं पाहिले असतील. पण हातचलाखीनें नव्हे तर शास्त्रीय पद्धतीनें एखादी वस्तु—चालता बोलता मनुष्यहि—अदृश्य करून दाखविण्याचे प्रयोग बाबू प्रफुल्लकुमुद यांनीं करून दाखविले, याबद्दल त्यांचें कोणाला कौतुक वाटणार नाहीं ? प्रस्तुत लेखक पदार्थविज्ञानशास्त्रांत विशेष पारंगत नसल्यामुळें या शोधाची उपपत्ति जितक्या आत्मप्रत्ययानें व सुबोध रीतीनें एखाद्या तज्ज्ञ मनुष्यास सांगतां येईल तितकी त्याला सांगतां येणार नाहीं; पण तो आपल्याकडून यथामति प्रयत्न करून पाहणार आहे. हेतु हा कीं, वाचकांचें इकडे लक्ष लागावें. या शोधाचें ज्ञान झाल्यावर योगी लोक एकदम गुप्त कसे होतात व लोकांना न कळतां विशिष्ट स्थलीं कसे जातात, याची थोडीबहुत कल्पना येईल!

ऑक्सिजन, हैड्रोजन वगैरे वायु अदृश्य असतात, तेव्हां ‘ वस्तु ’ म्हटली म्हणजे तिला रंग असलाच पाहिजे ही कल्पना खोटी ठरते. अमुक एका विशिष्टगुरुत्वाचीच वस्तु अदृश्य असते असें म्हणावें, तर हैड्रोजनादि वायूंचें विशिष्टगुरुत्व भिन्नभिन्न आहे. तेव्हां हें दर्शनातीतत्व रंग शोषून घेण्याच्या विशिष्ट शक्तीवरच अवलंबून असलें पाहिजे. विजेच्या योगानें वर्णशोषक शक्तींत फरक होतो, हें प्रयोगांनीं सिद्ध होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांब्याच्या केंसाएवढ्या बारीक तारेचा रंग वीज सुरू झाल्या-बरोबर एकदम कसा बदलतो हें विजेचा दिवा लख्ख समजावून सांगतो. विजेचे ' घन ' आणि ' ऋण ' असे दोन प्रकार आहेत. या दोन प्रकारांचा योग्य प्रमाणांतच व युक्तीनें उपयोग केल्यास कोणतीहि वस्तु डोळ्यांना अगोचर करतां येईल अशी प्रफुल्लबाबूंची कल्पना होती आणि ती अनेक प्रयोगांनंतर खरी ठरली.

विद्युत्प्रकाश अतिशय मोठा असला तर तो दुर्दर्शनीय होतो. याचा अर्थ असा कीं प्रकाशाचें विशिष्ट प्रखरतेचें पटल वस्तूवर पसरलें तर त्या योगानें ती वस्तु दृष्टीला अगोचर होते. सौम्य रीतीनें वित्युत्प्रयोग केला असतां वस्तु तर डोळ्यांना दिसणार नाहीं, व ती ' आहे ' असा संशय येण्याचें देखील कारण उरणार नाहीं. मनुष्याला या रीतीनें केव्हांहि अदृश्य होतां येईल.

प्रकाश ह्मणजे काय याविषयीं आधुनिक पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं जो निर्णय ठरविला आहे तो तर या समजुतीला चांगलीच बळकटी आणतो. ' ईथर ' नांवाची जी अतिसूक्ष्म, हवेपेक्षांहि पातळ व सर्वगामी वस्तु जगांत पसरलेली आहे, तिच्यामध्यें विशिष्ट प्रकारच्या लाटा किंवा लहरी उत्पन्न झाल्या ह्मणजे विशिष्ट प्रकारचे रंग दिसतात, असें तज्ज्ञांचें मत आहे. लहरींलहरींमधील अंतर व त्यांचा वेग, यांवरून एखाद्या वस्तूचा रंग ठरतो. दर सेकंदाला अमुक लक्ष मैल वेग असेल तर त्या लहरींपासून अमूक रंग निष्पन्न होतो, अशा प्रकारचे निश्चित नियमदेखील शास्त्रज्ञांनीं प्रयोगपूर्वक ठरविलेले आहेत. तेव्हां गणित-शास्त्रानेंच हें सिद्ध होतें कीं ईथरच्या लहरींचा वेग अमुक प्रमाणाचा केला असतां, प्रकाश किंवा रंग मुळींच दिसणार नाहीं अशा प्रकारच्या ईथर-लहरी आपणांला कृत्रिमरीत्या विद्युत्साहाय्यानें उत्पन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां येतील, असें प्रफुल्लबाबूंचें म्हणणें होतें. बिनतारी तार जी पाठवितात ती विशिष्ट वेगाच्या ईथर–लहरी उत्पन्न करून त्यांच्या द्वारें पाठवितात हें आतां पुष्कळ लोकांना ठाऊक झालेंच आहे. तेव्हां विजेच्या साहाय्यानें ‘ अप्रकाशा ’च्या लहरी उत्पन्न करता येणें–ह्मणजे एखादी वस्तु अप्रकाश किंवा अदृश्य करणें–अशक्य नाहीं, हें उघड आहे.

अशा विचारसरणीनें प्रेरित होऊन प्रफुल्लकुमुद यांनीं चार वर्षें घरदार, बायको, मुलें इत्यादिकांकडे यत्किंचितहि न पाहतां एकाग्रतेनें प्रथम प्रो. बोसच्या प्रयोगशाळेंत, व नंतर आपल्या खाजगी प्रयोगशाळेंत एतत्संबंधीं प्रयोग केले; पण यश ह्मणून येईना. तथापि त्यांनीं हताश न होतां आपले प्रयोग चालूच ठेवले. बायकोनें हा नाद (किंवा तिच्या मताप्रमाणें ‘ हें वेड ’) सोडून देण्याविषयीं पुष्कळ सांगून पाहिलें, पण व्यर्थ ! प्रफुल्लकुमुदांना बायकोशीं चार शब्द बोलण्याचें किंवा तिचे चार शब्द स्वस्थपणें ऐकण्याचें देखील सुचत नव्हतें, तर ते काय असल्या स्वार्थी उपदेशाला दाद देतात ! शेवटीं निराश होऊन वैतागानें बायकोनेंहि आपल्या वेडसर पतीशीं हुजत घालण्याचें सोडलें; व आपण बरी आणि आपला मार्ग बरा असें तिनें धोरण स्वीकारलें !

प्रफुल्लबाबूंना आपली उपपत्ति बरोबर आहे आणि आपण आपल्या गुरूप्रमाणें –प्रो. बोसप्रमाणें–अविश्रांत शोध करीत राहिल्यास त्यांच्या-प्रमाणें आपणांलाहि यश येईल व आपल्या देशाची दिगन्त कीर्ति होईल अशी खात्री वाटत होती, हें तर या चिकाटीचें एक कारण होतेंच. दुसरें कारण असें होतें कीं, योगिजनांचें गुप्त आगमन आणि प्रयाण यांविषयींच्या गोष्टींवर स्वामी विवेकानंदांच्या व रामतीर्थांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आख्यायिकांवरून त्यांची त्यांवर श्रद्धा बसलेली होती. बाबू मोतिलाल घोस यांच्या Spiritual Magazine नांवाच्या मासिकाच्या योगानें ही कल्पना दृढ झाली होती. एच्. जी. वेल्स यांच्या 'The invisible man' नांवाच्या गोष्टीवरून या कल्पनेला बरेंच चालन मिळालें होतें. पूर्वीच्या नाटकांत अप्सरा 'तिरस्करणी' घेऊन पृथ्वीतलावर संचार करीत असत असें वर्णन असतें. हें वर्णन 'अप्रकाश किरणां'चा शोध लागल्यावर शास्त्रीय पद्धतीनें सत्य ठरेल अशी बाबू प्रफुल्लांची कल्पना होती.

पांचवें एक कारण होतें तें याहूनदेखील एका अर्थानें अधिक महत्त्वाचें होतें. जें 'खरे असावें' अशी आपली इच्छा असते तें 'खरें आहे' असें मानण्याची साहजिक प्रवृत्ति, हें या करणांतील बीज होय. प्रफुल्लकुमुद हे श्रीमंत होते हें मागें सांगितलेंच. पण ते श्रीमंत होते तरी—किंवा श्रीमंत होते ह्मणूनच असेल—त्यांना फॅशनचा, वरकरणी उपचारांचा, दांभिक भाषणांचा, दिखाऊ प्रतिष्ठितपणाचा, ढोंगी भारदस्तपणाचा वगैरे अगदीं वीट आला होता. वेदांत्यांची दृष्टि कशीहि असो; वरील दृष्टीनें तरी जग हें खचित खचित 'मायिक' आहे असें तें ह्मणत व या मायेपासून सत्यस्वरूपी परब्रह्माकडे जाण्याकरितां जगांत जर अदृश्य रीतीनें राहतां येईल तर फार बरें, अशी त्यांची कल्पना होती. रानावनांत जाण्यापेक्षां जगांत राहून—पण अदृश्य राहून—त्यांतील रूढींच्या व दांभिक उपचारांच्या मायिक जबाबदारींतून मुक्त होतां यावें, अशा दृष्टीनें 'अप्रकाश किरणां'चा शोध त्यांना लावतां आला असता तर तो हवा होता; आणि 'हवा होता' ह्मणून तो 'लावतां येईलच' अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही मायाविषयक विचारसरणी बरीच मायिक अथवा सदोष आहे. जगांतली रहाणी दिवसेंदिवस अधिक कृत्रिम, दिखाऊ, ढोंगी आणि मानभावीपणाची होत चालली आहे हें कांहीं खोटें नाहीं; तसेंच, पोषाखांत, भाषेंत, व्यवहारांत, जिकडेतिकडे औपचारिकता, नाटकीपणा व बेगडी सभ्यता दिसून येते, हेंहि खरें; पण शुष्क रूढींचा व बाह्य उपचारांचा–ढोंगीपणाचा व शिष्ट लुच्चेगिरीचाहि–उपयोग आहे. आपणांला जगाचा पोषाख दिसतो, अंतरात्मा दिसत नाहीं, हें एकपरी बरें आहे. आपल्या पाठीमागें लोक आपल्याविषयीं काय बोलतात आणि काय काय करीत असतात हें आपणांला कळत नाहीं आणि त्यांच्या दृष्टीआड आपण काय काय बोलतों व काय काय करतों हें त्यांना समजत नाहीं, हेंच एकंदरींत चांगलें आहे. कारण, हें कळलें तर मनुष्याला वेड लागण्याचीच पाळी येईल! जनलज्जेचा दाब नसता, ज्यांना आपण कृत्रिम उपचार ह्मणतों त्यांचें जर आपणावर दडपण नसतें, तर किती तरी पापें आपल्या हातून झालीं असतीं! किती तरी लोकांचे आपणांला जोडे खावे लागले असते! आपल्या पाठीमागें ज्या गोष्टी होत आहेत त्या सर्व डोळ्यांदेखत पाहण्याचा प्रसंग येत नाहीं हेंच चांगलें आहे. नाहीं तर वैतागानें, रागानें किंवा निराशेनें जीव देण्याचीच पाळी आली असती! आपण जें जग पाहतों ती माया असेल; पण माया आहे ह्मणून तर ती दर्शनीय झाली आहे! मध्यान्हीच्या सूर्याकडे जसें आपणांला पहातां येत नाहीं, तसेंच निरुपाधिक निर्व्याज सत्याकडे पहाणें कठीण, नव्हे, अशक्य आहे! आपण खरे कसे आहों, लोक आपणांला खरोखर काय समजतात, याचें हुबेहुब चित्र सामान्य मनुष्याच्या बाबतींत तरी इतकें अमंगल असतें कीं, तें असामान्य धैर्याशिवाय शांतपणें पाहणें अशक्य आहे. सत्यस्वरूपदर्शन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें 'विश्वस्वरूपदर्शना'प्रमाणें अर्जुनालाहि बहुधा भयप्रद झालें असतें. मायेच्या हिरव्यागार चष्म्यांनीं जगाकडे आपण पाहतों ह्मणून बरें आहे; नाहीं तर त्याचें प्रखर तेज असह्य झालें असतें. भर्तृहरि राजाला दिखाऊ जगाच्या पडद्याआड काय काय व्यवहार चालले असतात, याचा अनुभव थोडासा आल्याबरोबर—

धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च

असें तो ह्मणाला, व डोक्यांत राख घालण्यास तयार झाला. अशा दृष्टीनें विचार करूं लागलों ह्मणजे आपले विचार लोकांना कळत नाहींत, लोक आपल्याशीं खरें बोलत नाहींत, जो तो व्यवहारांत वारांगनांप्रमाणें औपचारिक हास्य, आनंद, अभिनन्दन, आदरसत्कार इत्यादि व्यक्त करतो, याविषयीं विशेष वैषम्य वाटत नाहीं. कृत्रिमता, ढोंग, कपट इत्यादिकांचें सुखकर व मोहकारक अभ्रपटल सत्यस्वरूपी प्रखर सूर्याच्या आड नसतें, तर जगांत संतापज्वालांनीं हाहाकार उडाला असता. कपटपटु स्त्रियांचीं पापात्मक चरित्रें व अर्थात् पुरुषांचींहि अशाच धर्तीचीं चरित्रें नव्याणव हिश्शांनीं गुप्त आहेत तशीं जर तीं नसतीं, तर सर्व भूमि खुनी रक्तानें लाल होऊन गेली असती. प्रत्येक मनुष्य जर प्रत्येक वेळीं खरें बोलूं लागेल तर जोडाजोडीशिवाय घटका जाणार नाहीं. संसारांतील 'माया' ज्या दिवशीं जाईल त्या दिवशीं प्रलयकाल जवळ आला आहे असें समजावें. संसारांत 'माया' आहे ह्मणून त्यांत काव्य आहे, राम आहे, आनंद आहे. 'माये'च्या अभावीं खून व मारामाऱ्या तरी होतील, किंवा परब्रह्माचें निःश्रेयस सुख तरी मिळेल. पण हें दुसरें सुख लाभणें दुष्कर आहे, म्हणून ती मायाच बरी, असेंच सामान्य मनुष्य म्हणेल.

पण हें विषयान्तर आटोपतें घेतांघेतां बरेंच लांबलें. बाबू प्रफुल्लकुमुद यांना 'अप्रकाश किरणां'चा शोध लावण्याची कां प्रबल इच्छा झाली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचें आपण विवेचन करीत होतों. या नादाच्या किंवा वेडाच्या पायीं त्यांनीं आपली इस्टेट रसायनशाळेंतील स्टोव्हच्या ज्वालेंत व ॲसिडांत घालून तिची राखरांगोळी केली, हें वर सांगितलेंच आहे. सर्व लोक त्यांना वेड्यांत काढूं लागले. त्यांना वेड्यांच्या इस्पितळांत पाठविण्याचें प्रत्यक्ष त्यांच्या बायकोच्या मनांत एकदां आलें होतें; पण काय झालें कोणाला ठाऊक, तो बेत तसाच राहिला; आणि हा ईश्वराचा या देशावर मोठा उपकारच झाला म्हटलें पाहिजे. कारण, हा बेत रहित झाल्यानंतर एक वर्षाच्या आंतच 'अप्रकाशकारी किरणां'चा शोध जगांत प्रकाशित करण्याची वेळ आली, व प्रफुल्लकुमुद हे '**क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते**' या न्यायानें खरोखरच प्रफुल्ल-कुमुदाप्रमाणें शोभूं लागले, व आपल्या कीर्तीच्या सुवासानें सर्वांस आनंद देऊं लागले !

* * * *

या अपूर्व शोधानें जगांत मात्र केवढा अनर्थ उडाला व हाहाकार झाला ! पण त्याचें वर्णन पुढें ओघाओघानें येईल तेव्हांच केलेलें बरें.

विजेच्या साहाय्यानें 'अप्रकाश किरणें' पाहिजे तेव्हां उत्पन्न करतां येऊं लागल्यावरहि वीज ज्यांत सांठविली आहे, अशा प्रकारची नीट, आटपसर, सुंदर वस्तु कशी करतां येईल इकडे प्रफुल्लबाबूंचें लक्ष लागलें. वाफेच्या शक्तीची तात्त्विक कल्पना मनांत आल्यापासून तिला एंजिनांत कोंडून लगामीं लावण्यापर्यंत मध्यंतरीं कितीतरी दिवस जसे गेले तसे या शोधाच्या बाबतींतहि झालें; पण करतां करतां अखेर कोणत्याहि वस्तूला किंवा मनुष्याला पाहिजे तेव्हां अदृश्य करणारी 'अप्रकाश आंगठी' त्यांनीं आपल्या अचाट कल्पनासामर्थ्यानें आणि कल्पकतेनें शोधून काढली. दौतीला कागदाला, कुत्र्याला, मांजराला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयोगाकरितां आंगठी बांधून पाहिल्यावर तीं अदृश्य झालेलीं अनेक वेळां पाहून प्रफुल्लबाबूंना जो आनंद झाला असेल त्याची यथार्थ कल्पना ज्याच्या हातून एखादें मोठें कार्य झालें असेल त्यालाच येईल.

प्रफुल्लबाबू तर आनंदानें इतके फुलून गेले कीं कांहीं विचारूंच नका. अनेक दिवसांनंतर अथवा वर्षांनंतर बायकोशीं स्वस्थपणें आणि प्रफुल्लित मुद्रेनें ते त्या दिवशीं जेव्हां बोलूं लागले तेव्हां त्या बायकोला प्रथम असें वाटलें, कीं, यांचें वेड आज बरेंच वाढलें आहे! पण पतीनें 'अप्रकाश आंगठी'चे जेव्हां खोलींतल्या वस्तूंवर प्रयोग करून दाखविले तेव्हां तिला जें आश्चर्य व जो आनंद झाला त्याची यथार्थ कल्पना प्रफुल्लबाबूंनाहि त्या वेळीं येणें शक्य नव्हतें!

या शोधाची बातमी हां हां म्हणतां कलकत्ता शहरांत पसरली. आंगठीची किंमत प्रफुल्लबाबूंनीं फक्त एक रुपया ठेविली होती; कारण पैसे मिळविणें हें त्यांचें केव्हांहि ध्येय नव्हतें. त्यांनीं गिलिट केलेल्या दहा लाख आंगठ्या प्रयोगाकरितां आणल्या होत्या, त्यांपैकीं नऊ लाख प्रयोग करण्यांतच फुकट गेल्या व एक लाख शिल्लक होत्या. या एक लाख आंगठ्या एका दिवसाच्या आंत उडाल्या! कारण अदृश्य होऊन जगांत पाहिजे तेथें व पाहिजे तसें वावरण्याची इच्छा कोणाला नाहीं?

पण या शोधानें त्या शहरांत अत्यन्त अनर्थ उसळला. प्रफुल्ल-बाबूंच्या घरीं ज्या झुंडीच्या झुंडी येत त्यांना 'अप्रकाश आंगठी' मिळाल्याबरोबर ते रस्त्यांतून आंगठी घालूनच अविचारानें हिंडूं लागले. त्यामुळें झालें काय, तर पुष्कळ लोक मोटारींखालीं व घोड्याच्या गाड्यांखालीं सांपडून मेले, कित्येकांचें सायकलीखालीं पाय मुरगळले, आणि कित्येक लोकांची रस्त्यांतल्या जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांशीं टक्कर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन लोकांचीं व त्यांचीं डोकीं शेकलीं गेलीं. जागोजाग रक्ताचे पूर व चेंगरलेले अवयव पाहून खुनांचे वारंवार अनुभव असलेले पोलिसहि आश्चर्यचकित होऊन गेले.

नाटकगृहांत, शाळांत, फराळाच्या दुकानांत, वेश्यागृहांत, राजकीय सभांमध्यें, सगळीकडेच या क्रान्तिकारक शोधानें गडबड उडवून दिली. फराळाच्या दुकानांत, रस्त्यांत ‘ अदृश्य ’ होऊन आलेल्या म्हाताऱ्या सोंवळ्या बायांची इतकी गर्दी झाली कीं त्या दुकानांच्या मालकांनीं दुकानांचीं आंतील दारें बंद केलीं, आणि अदृश्य होऊन आलेल्या लोकांना दृश्य झाल्याशिवाय ते आंत सोडीनासे झाले. ‘ अप्रकाश आंगठी ’च्या शोधाची बातमी शहरांत पसरल्यापासून तीन तासांच्या आंतच फराळाच्या दुकानांत झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. पण त्यांतल्या त्यांत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं त्या दुकानांवर पहिली स्वारी सोंवळ्या बायांची होती. मागून हरदास–पुराणिक आले. यांमध्यें एक वेद-मार्तंड होते, आणि दुसऱ्या एकानें गीतेंतील सात्त्विक, राजस व तामस आहारावर कथेंत प्रवचन चालविलें असतां हॉटेलांतील तामसी खाद्यांचा तिखटमीठ लावून बराच समाचार घेतला होता. म्हाताऱ्या बायकांना दुकानांत सोडल्यावर त्या एकदम आंगठीची कळ दावीत व अदृश्य होत. हेतु हा कीं कोणाला दिसूं नये ! पण लवकरच त्यांना तेथें पुष्कळ सजातीयांचा आवाज ऐकूं येऊं लागला व मग एकेकीनें हलके हलके ‘ अप्रकाश किरणां ’चा बुरखा सोडून दिला. म्हाताऱ्या बायकांना या दुकानांतील रीतरिवाज माहीत नसल्यामुळें कोणाशीं काय मागावयाचें हें पहिल्यानें त्यांच्या ध्यानांत येईना. पण एक बोलके पुराणिक हॉटेलांतील पोह्यांतली वांगीं हॉटेलांतच खात बसले होते त्यामुळें त्या बायांची सर्व अडचण दूर केली. इंग्रजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकलेल्या किंवा शिकत असलेल्या बायकामुलीहि तेथें 'अप्रकाश आंगठी' घेऊन आल्या होत्या; पण त्या या कामांत जरा मागें पडल्या होत्या. या शिकलेल्या बायकांच्या पाठोपाठ जी टोळी आली तिच्यामध्यें बरींच मुलें होतीं. कोणीं चौकशी केली असती तर त्याला आढळून आलें असतें कीं ज्या बोर्डिंगांत व घरांत अति कडक शिस्त ठेवण्यांत येते त्यांमधलींच हीं बहुतेक सर्व मुलें होतीं!

सभागृहांतली मौज याहून निराळीच होती. एका राजकीय सभेला त्या दिवशीं आंगठीवाल्या सरकारी नोकरांनीं इतकी गर्दी केली कीं गुदमरून जाण्याची पाळी आली. पण प्लॅटफॉर्मवर असलेले शंभर एक लोक व खालीं हजार एक लोक एवढेच फक्त दृश्य होते. यांनींसुद्धां 'अप्रकाश आंगठ्या' बरोबर आणल्या होत्या. मनांतला हेतु असा कीं, वक्त्याचें भाषण नीरस होऊं लागलें, किंवा बेसुमार लांबलें, तर अदृश्य होऊन तेथून निसटतां यावें आणि तसा प्रसंग त्याच दिवशीं एके ठिकाणीं आला. वक्त्याच्या भाषणाला संध्याकाळीं सहाला आरंभ झाला व तें नऊला संपलें! या वेळीं सभेंत प्लॅटफॉर्मवर शंभरांपैकीं दहाजण शिल्लक असतील. हे लोक तरी कां राहिले होते म्हणाल, तर अध्यक्ष विद्वान् म्हणून प्रसिद्ध असलेले गृहस्थ होते, त्यांचें भाषण ऐकण्याची संधि पुष्कळ दिवसांत आलेली दवडण्याची त्यांची इच्छा नव्हती. वक्त्याचें भाषण झाल्यावर या थोड्याच लोकांनीं इतक्या आनंदानें, उत्साहानें व जोरानें टाळ्यांचा कडकडाट केला कीं, वक्त्यांना बरें वाटलें कीं वाईट वाटलें हें सांगतां येत नाहीं. पुढें अध्यक्षांचें भाषण सुरू झालें. घरून पुष्कळ तयारी करून योजिलेले सर्व विचार श्रोतृसमाजांस ऐकविण्याचा त्यांचा निश्चय झाला असल्यामुळें त्यांचें भाषण दहा वाजले तरी संपलें नाहीं. अखेर संपलें तेव्हां त्यांना बरीक वक्त्यां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणें टाळ्यांचा गजर मिळाला नाहीं. कारण, सेक्रेटरीशिवाय तेथें दुसरें कोणी हजरच नव्हतें ! प्लॅटफॉर्मवरच्या प्रतिष्ठित लोकांनीं व त्या दिवशींच्या वक्त्यांनींसुद्धां 'अप्रकाश आंगठी'चा उपयोग करून घेऊन घराची वाट धरली होती. सेक्रेटरींनीं अध्यक्षांचे उत्तम काम केल्याबद्दल लांबलचक आभार मानले, व जागेच्या मालकाचे जागा देण्याबद्दल लांबलचक आभार ते मानणार होते इतक्यांत टेबलावरील वालशिटांतील मेणबत्ती विझली आणि त्यांनीं अध्यक्षाच्या खुर्चीकडे पाहिलें तों तेथें कोणीच नाहीं असें त्यांना दिसलें !

दुसऱ्या एका सभेंत अशीच मौज झाली. एक प्रागतिक पक्षाचे गृहस्थ राष्ट्रीय पक्षांतील गृहस्थांवर तुटून पडले व ह्मणाले "हे जहाल लोक राष्ट्रघातकी आहेत, हे स्वार्थसाधु आहेत, यांना राष्ट्रापेक्षां आपला मान अधिक आहे, हे लोकांना फसवून त्यांचे पैसे लुबाडीत आहेत." अशा रीतीनें आरंभ केलेलें भाषण शेवटीं इतक्या थराला गेलें कीं, त्यांच्याच पक्षांतील एका समंजस मनुष्याला चीड येऊन 'मोजुनि माराव्या पैंजणा' अशी इच्छा झाली. पण प्रतिष्ठितपणामुळें हें करतां येईना. इतक्यांत 'अप्रकाश आंगठी' आणल्याची त्याला आठवण झाली आणि त्यानें पायांतला चढाव काढून वक्त्याचे गाल रंगवले. अध्यक्षांना काय झालें हें समजेना, पण वक्ते रक्तबंबाळ होऊन प्लॅटफॉर्मवर पडलेले पाहून त्यांनीं स्वयंसेवकांकडून त्यांना डॉक्टरांकडे पाठविलें व सभेच्या कामास पुनः सुरुवात केली.

आतां राष्ट्रीय पक्षांतील एक ज्वलद्देशाभिमानी गृहस्थ बोलण्यास उठले व त्यांनीं प्रस्तुत विषय सोडून देऊन सामाजिक सुधारक लोकांचा उद्धार त्या राजकीय सभेंत केला व "हे लोक स्वतःच्या कामविकारप्रेरणेनेंच सुधारणांचें बंड काढतात-" इत्यादि अनर्गल प्रलाप करूं लागले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें पाहून तरुण पिढींतील एका राष्ट्रीय गृहस्थाचा राग अनावर झाला, व त्यानें 'अप्रकाश आंगठी'ची कळ दाबली आणि अदृश्य होऊन त्या वक्त्याला प्लॅटफॉर्मवरून खालीं फेकून दिलें! सभेंत हाहा:कार उडला. ज्यांना 'अप्रकाश आंगठी'ची बातमी कळलेली नव्हती, त्यांना भुताटकीचा कांहीं तरी येथें प्रकार आहे असें वाटलें व ते घाबरून तेथून पळून गेले. बाकीच्यांना खऱ्या प्रकारचें अनुमान करतां येत होतें, पण नक्की मनुष्य पकडणें शक्य नव्हतें. आमच्या वक्त्याला तुमच्यापैकींच कोणींतरी इजा केली असें मवाळ व जहाल पक्षांतले लोक विरुद्ध पक्षाच्या लोकांना बोलूं लागले व सभेंत एकच गोंधळ उडाला. अखेर पोलिसांनीं 'मध्यस्थी' करून कांहींजणांची टाळकीं शेकलीं, आणि तेव्हां कुठें सार्वजनिक शांतता रक्षण केल्याचें त्यांना समाधान झालें!

'अप्रकाश आंगठी'नें दुसरीकडे एका गल्लींत जो अनर्थ उडविला त्यांत रक्तपात नव्हता, पण नैतिक अध:पात अधिक होता. 'लोक पाहतील' ही आतां भीति नसल्यामुळें किती तरी 'प्रतिष्ठित' लोक वारांगनांच्या माडीचे जिने चढूं लागले. कांहीं वेश्यांच्या लहान खोल्या त्या दिवशीं गच्च भरून गेल्या. खोली गांठल्यावर आंगठीची 'तिरस्करिणी' टाकली गेली, पण आपले पतिराज अमक्या अमक्या बाईकडे जातात असा पुष्कळ दिवस संशय असलेल्या कांहीं बायका आंगठी घालून तेथेंच आल्या होत्या त्यांनींहि जेव्हां आपली 'तिरस्करणी' टाकली तेव्हां एकमेकांची तेथें चांगलीच ओळख पटली!

एका वेश्येची मुलगी आपल्या हीन धंद्यास कंटाळून गेलेली होती. तिची आई तिला 'हा आपला परंपरागत धर्म आहे' असें सांगत असे; पण त्या मुलीला हा धंदा मुळींच पसंत नव्हता. परंतु आईच्या विरुद्ध जाण्याचें नैतिक धैर्य तिच्यामध्यें नव्हतें. आई वारल्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिनें निश्चय केला कीं आतां हा धंदा सोडावयाचा. पण पुढें कसा काय चरितार्थ चालेल या भीतीनें तिच्या मनाची चलबिचल होत होती. 'अप्रकाश आंगठी'चा शोध जाहीर झाला त्या दिवशीं संध्याकाळीं ती स्नान करून रामपंचायतनाजवळ आपल्या परीनें पूजा करीत बसली होती. "रामा, तूं अनेक पापिणींचा उद्धार केला आहेस. तूं आतां माझा उद्धार करशील का ? आजपासून मी पापाचरण सोडून देणार आहें. हा निश्चय कायम टिकण्यासाठीं मला तूं साहाय्य केलें पाहिजेस. मला स्वप्नांत नाहीं तर केव्हां तरी दृष्टांत दे, ह्मणजे माझें मन प्रसन्न होईल व निश्चय दृढ होईल." अशा प्रकारची प्रार्थना करून तिनें देवापुढचें तीर्थ घेतलें, व दोन थेंब डोळ्यांना लावले व डोळे पुनः उघडून पाहते तों तिला एका स्वामींची भव्य मूर्ति, पादुका घातलेली, भगवीं वस्त्रें धारण केलेली, अशी दिसली ! तिला वाटलें, प्रत्यक्ष श्रीरामचंद्रानें आपणास दर्शन दिलें आहे ! ती लगबगीनें उठली व पदर सावरून त्या मूर्तीची गंधाक्षता वाहून पूजा करूं लागली. हें पाहून स्वामी ह्मणाले "बाई, मी पूजा घेण्याकरितां येथें आलेला नाहीं." पण त्या पश्चात्तापदग्ध वारयुवतीनें भक्तिपूर्वक पूजा करून निरांजन ओंवाळलें तेव्हां स्वामी ओशाळले व कांहीं न बोलतां माडी उतरून 'अप्रकाश आंगठी'च्या साहाय्यानें अदृश्य झाले व आपल्या मठाचा मार्ग चालूं लागले !

या आंगठीचा प्रभाव लोकांच्या बोलण्याचालण्यावर जो झाला तो सांगतां पुरवत नाहीं. डिटेक्टिव्ह लोकांनीं या आंगठ्या घेतल्यामुळें कोठेंहि राजकीय गोष्टी बोलण्याची सोयच नाहींशी झाली. शेजाऱ्या-पाजाऱ्यांवर टीका करावी तर तेहि आसपास अदृश्य होऊन उभे असतील, नाहीं कोणीं म्हणावें, या भीतीनें भाषणांतील लोकनिंदेचें अंग अजीबात गळालें. संभाषणरूपी फळांतील लोकनिंदेचा रस गळून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेल्यावर कोरड्या साली व बिया कोणाला आवडणार? कोणाला कोणाशीं कांहीं बोलण्याचा उत्साह वाटेना. चाकरांनीं धन्याची निंदा करावी ह्मटलें तर धनी कदाचित् अंगठीची कळ दाबून आपलें दृश्य स्वरूप तेथें एकदम दाखवावयाचा! अशाच भीतीनें लोकनायकांची, मित्रांची, गुरूची, शिष्याची, ओळखीच्या किंवा अनोळखी माणसांची, कोणाला कांहीं निंदा ह्मणून करण्याची सोय उरली नसल्यामुळें बहुतेकांनीं आपलें तोंड शिवून घेतल्यासारखें झालें.

रात्रीं नवराबायकोंचीं सुद्धां भाषणें रोजच्यासारखीं खुल्या दिलानें झालीं नाहींत. बायकोला वाटावयाचें कीं एखादी सवत अंगठी घालून खोलींत येऊन बसली असेल; नवऱ्याला वाटावयाचें कीं अंगठीच्या साहाय्यानें बायकोनें एखादा उपपति दडवून ठेवला असेल!

रात्रीं नाटकगृहांत निराळ्याच प्रकाराची मौज झाली. बायकांच्या जागा त्या दिवशीं अर्थात् सगळ्या भरून गेल्या; पण खुर्च्यांवरच्या व मजल्यावरच्या पुरुषांनीं दुर्बिणी लांबआखूड करकरून त्या बाजूकडे पाहिलें, पण एक स्त्री दृश्य असेल तर शपथ! हें पाहून अनेक शोकी गृहस्थांनीं रागानें दुर्बिणी बाजूला टाकल्या. 'ज्या संसारांत स्त्रिया नाहींत, ज्या नाटकांत बायकांचीं पात्रें नाहींत, ज्या नाटकगृहांत बायका नाहींत, तो संसार कसला तें नाटक कसलें व तें नाटकगृह कसलें?' असें ह्मणून कित्येक लोक नाटक पहावयाचें सोडून निघून गेले! पण नाटकगृहांतील लोकसंख्या यामुळें कांहीं रोजच्यापेक्षां कमी झाली नाहीं. कारण 'अप्रकाश आंगठी' घालून कितीतरी लोक त्या दिवशीं आंत फुकट घुसलेले होते! कांहीं लोकांनीं आपल्या घरच्या स्त्रियांना पुरुषांच्या खुर्च्यांवरच आपल्याजवळ बसविलें होतें, पण हलकट लोकांच्या नेत्रांपासून त्यांना त्रास होऊं नये ह्मणून त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रियांच्या बोटांत वरील आंगठ्या दिल्या होत्या. पण यामुळें असें झालें कीं, एक मिशांसकट सर्व केसांची गुळगुळीत श्मश्रू करून घेतलेले वृद्ध पण धिप्पाड व गलेलठ्ठ पुरुष अप्रकाश आंगठी घालून तेथें आले होते त्यांना तेथील खुर्चीवर कोणी बसलेलें नाहीं असें वाटलें व ते एका चवदापंधरा वर्षांच्या मुग्ध बालिकेच्या मांडीवर बसले त्यामुळें ती मुग्धा चेंगरून गतप्राण होण्याच्या बेतांत आली !

* * * *

अशा प्रकारचे आपल्या शोधापासून अनर्थ होतील अशी प्रफुल्ल-बाबूंना कल्पनाहि नव्हती ! पण त्यांना जेव्हां असल्या प्रकारच्या हजारों आपत्तींची दुसऱ्या दिवशीं हकीगत कळली, तेव्हां त्यांना आपल्या आंगठ्या विकण्याचें काम बंद ठेवावें कीं काय असें वाटूं लागलें. 'लोक काय ह्मणतील ?' या विचाराच्या जाचांतून व दास्यांतून लोकांना, पुरुषांना व स्त्रियांनाहि सोडविल्याचें आपणांस श्रेय मिळेल असें त्यांना वाटत होतें; पण आपल्या आंगठीच्या योगानें भलतेच परिणाम घडून येत आहेत हें पाहून त्यांच्या कोमल मनाला अतिशय दुःख झालें.

पण त्यांच्या नशिबीं याहूनहि अधिक दुःख पहावयाचें होतें. 'अप्रकाश आंगठी'चा शोध लागल्यानंतर एक महिन्याच्या आंतच दिल्ली येथील बॉम्बचा प्रसिद्ध स्फोट झाल्यामुळें या आंगठीचा आणि बॉंबचा कांहींतरी संबंध असला पाहिजे, अशी कांहीं पोलिसांना कल्पना सुचली. झालें. प्रफुल्लकुमुदांना एका तासाच्या आंत पोलिसठाण्यावर नेण्यांत आलें ! कोणाकोणाला आंगठ्या विकल्यात या प्रश्नाचें प्रफुल्लबाबूंना नांवनिशीवार उत्तर न देतां आल्यामुळें त्या पोलिसांच्या सुपीक डोक्यां-तला संशय दृढ झाला. सौम्य समजावणीनें प्रफुल्लबाबू कबूल होईनात, तेव्हां समजावणीच्या इतर बहुतेक सर्व संस्कारांचा त्यांना यथाविधि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुभव मिळाला. शेवटीं 'थांबा, थांबा, सर्व सांगतों,' असें ह्मणून त्यांनीं वेळ मागून घेतला, व संधि साधून खिशांतल्या एका आंगठीची कळ दाबली व अदृश्य होऊन तेथून पळ काढला.

घरीं येऊन पाहतात तों आंगठीसाठीं अंगणांत बायांची, मुलींची, मुलांची, मोठ्या माणसांची, ह्मातान्याम्हातारींची, सुधारक–उद्धारकांची, सुशिक्षित-अशिक्षितांची, साहेबांची–मडमांची गर्दी उडून राहिली आहे! पण आंगठीच्या व्यापारापासून लोकांचें व आपलेंहि हितापेक्षां अनहित अधिक होणार, हें दोन दिवसांच्या अनुभवानें चांगलें निदर्शनास आल्यामुळें त्यांनीं आपल्या बायकोच्या कानांत कानगोष्ट सांगितली व आपण कोठें जाणार व राहणार याबद्दल तिला माहिती देऊन पोलिसांच्या व गिऱ्हाइकांच्या त्रासांतून मुक्त होण्याकरितां नांवगांव बदलून कोठें गुप्त झाले ते अद्यापिहि गुप्तच आहेत!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाटकराव

" जन्माला येऊन नाटककार ह्मणून प्रसिद्धीस यावें " असें माझा बालमित्र गोविंदराव याला लहानपणापासून वाटत होतें; आणि ह्मणूनच हणमंतराव वगैरे वर्गांतले त्याचे आम्ही स्नेही '**नाटकराव**' असें त्याला ह्मणत असूं आणि अजूनहि आम्ही पूर्वींचे बालमित्र जमलों ह्मणजे त्याला त्याच नांवानें हाक मारतों. तो अलीकडे एक नाटक रचण्याच्या नादांत आहे हें मला ठाऊक होतें. 'नाटकराव हा मार्मिक टीकाकार जरी असला तरी स्वतः नाटक रचूं लागल्यास जगांत आपलें हंसें मात्र करून घेईल' अशी माझी खात्री होती व त्याचें मन न दुखवतां त्याची कानउघाडणी कशी करावी, याचा मी विचार करीत होतों. इतक्यांत हणमंतराव तेथें आले व गांभीर्यानें मला ह्मणाले " महेश्वरपंत, हा आपला नाटकराव नाटकरचनेच्या नादानें अर्धवट वेडा झाला आहे. त्याच्याकडे जाऊन त्याला उपदेश करून शुद्धीवर आणलें पाहिजे, किंवा त्याला नाटकाचें एखादें चांगलें संविधानक तरी सुचवून दिलें पाहिजे."

" मी त्याच्याकडेच निघालों आहें, " असें मीं हणमंतरावांना सांगितलें व " तुम्ही येतां का?" ह्मणून त्यांना विचारलें. त्यांना कांहीं काम असल्यामुळें नाटकरावाकडे मी एकटाच गेलों व जराशा चेष्टेच्या स्वरानें त्यांना विचारलें " काय नाटकराव, कुठपर्यंत आलें आहे तुमचें नाटक?"

त्यानें निराशासूचक सुस्कारा टाकून ह्मटलें " महेश्वरपंत, काय सांगूं तुला. आपल्या हल्लींच्या हिंदु समाजावर नाटक रचणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवळ अशक्य आहे! असें पहा, गृहिणीशिवाय गृह जसें अरण्यसमान—"

'तिच्या' गडगडाटाची आठवण होऊन मीं मध्येंच ह्मटलें, "गृहिणीशिवाय गृह जसें अरण्यसमान निर्जन व मनोहर असतें—"

"तसें नाहीं, महेश्वरपंत! गृहिणीशिवाय गृह जसें अरण्यसमान रुक्ष व भयाण असतें, तसेंच नायिकाविरहित नाटकहि रुक्ष व नीरस होय! कामुककामिनींचे प्रेमालाप ज्या नाटकांत नाहींत तें नाटक कसलें? आणि आपल्या समाजांत तर सच्छील स्त्रिया व प्रौढ कुमारी परपुरुषांशीं चार मंडळींतहि भाषण करीत नाहींत, मग एकान्तांतील मधुर प्रेमालाप लांबच राहिले! अशा स्थितींत नाटककारानें काय करायचें?"

"आपल्या प्रतिभेनें काल्पनिक स्त्रिया उत्पन्न करावयाच्या व नाटक रचावयाचें, दुसरें काय?"

"मला Realistic (प्रतिबिंबात्मक) नाटकें रचावयाचीं आहेत" नाटकराव ह्मणाला. "तूं ह्मणतोस तसलीं काल्पनिक नाटकें रचावयाचीं असतीं तर मीं एव्हांना पांचपन्नास नाटकें लिहून टाकलीं असतीं!"

"आणि लोकांनींहि तीं दोनचार पानें वाचून केराच्या टोपलींत टाकून दिलीं असतीं," जरा हंसून मीं ह्मटलें.

माझी ही विनोदात्मक टीका मर्मभेदक दिसली तरी माझा तसा कांहीं हेतु नव्हता हें त्याला ठाऊक असल्यामुळें तो रागावला तर नाहींच; उलट जरा हंसून मला ह्मणाला, "तूं माझा बालमित्र आहेस, तेव्हां पाहिजे तशी माझी चेष्टा करण्याचा तुला अधिकार आहे. पण तुला प्रिय असलेल्या (उपरोधिक उच्च स्वरानें) कल्पनाप्रचुर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व प्रतिभासंपन्न नाटककारांचीहि मी चेष्टा करूं शकेन हें ध्यानांत ठेव ! पण त्या उदारात्म्यांची मी कशाला थट्टा करूं ? त्यांचींच नाटकें वाचून मीं नाट्यशास्त्र–नियम बसवले आहेत; तेव्हां या गुरूंची निंदा करण्याचें पाप माथीं लागायला नको. मीं बसविलेल्या या नियमांचें अध्ययन व मनन केल्यास कोणत्याहि रेम्याडोक्याला नाटक रचतां येईल. गालिचांचा कारागीर जसा रचनासूचक गाणें ह्मणून अडाणी कैद्यांकडून अनेकरंगी मनोहर गालिचा बनवून घेतो, तसा मंदधी मनुष्याकडूनहि मीं काढलेल्या नियमांप्रमाणें शब्द-सूत्ररचना करवून घेऊन विविधरसात्मक सुंदर नाटक ग्रंथ मी तयार करून घेईन. ”

त्याच्या कृत्रिम उपमेंतहि जें स्वारस्य होतें त्यानें खूष होऊन कुतुहल-पूर्वक मीं ह्मटलें “ तुझे नियम तरी कळूं देत, ह्मणजे मी आपल्या ‘सुविचारप्रसारां’त छापून काढतों.”

“ नको, नको, महेश्वरपंत, तेवढें नको ! तुम्हां वर्तमानपत्रकारांना कांहीं कळलें किंवा सुचलें कीं कांहीं विचार न करतां तुम्ही छापून टाकतां ! आणि दुसरें असें कीं, नाट्यग्रंथरचनेचे मी काढलेले हे यंत्रात्मक नियम प्रसिद्ध केल्यावर मला कोण विचारतो ?”

“ अरे सद्गृहस्था, तुझे नियम ‘नवनाट्यशास्त्रकार विद्वद्वर्य नाटक-राव’ अशा जाड टाइपांतल्या मथळ्याखालीं छापीन, मग तर झालें ?” त्याच्या विनोदवृत्तीला अनुसरूनच मीं ह्मटलें.

“ असें असलें तर मी सांगतों, ऐक. पहिला नियम असा. नाटकां-तील चाकरनोकर विनोदी असले पाहिजेत. व्यवहारांत आपण जरी आपल्या चाकरांच्या बावळटपणाला व बेअक्कलीपणाला कंटाळलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असलों तरी नाटककारानें चाकरनोकर विनोदी दाखविलेच पाहिजेत. धन्याशीं उद्धटपणानें विनोद करणें नाटकांत गैर मानलेलें नाहीं."

"बरोबर नियम आहे खरा बुवा!" 'त्राटिकें'तल्या 'पिल्या'ची आठवण त्यावेळीं जागृत झाल्यामुळें मीं ह्मटलें. "बरें, दुसरा नियम ?"

"दुसरा नियम असा—'अतिशयोक्तीशिवाय काव्य नाहीं,' असें पूर्वीच्या अलंकारशास्त्रज्ञांनीं लिहून ठेवलें आहे; परंतु मी याच्यावर असें भाष्य करतों कीं, नुसत्या अतिशयोक्तीनें नाटक व्हावयाचें नाहीं. नाटकांतील अतिशयोक्ति पराकाष्ठेची—अत्युत्कट—केवळ काल्पनिकच नव्हे तर कल्पनातीत असली पाहिजे. उदाहरणार्थ, नायक ह्मटला ह्मणजे तो हजार शिपायांच्या तुकडीचा एकट्यानें पराभव करण्याइतका शूर असला पाहिजे, व त्याचा प्रतिस्पर्धी इतका भ्याड असला पाहिजे, कीं, स्वतःचाच हात तलवारीला चुकून लागल्याबरोबर किंवा कोणीं तलवारीचें नांव काढल्याबरोबर तो लटलट कांपूं लागला पाहिजे, किंबहुना 'तल–' इतकेंच अर्धवट कोणाच्या तोंडांतून निघालें न निघालें तोंच तलवारीच्या भीतीनें त्याच्या हातापायांना जर कंप सुटेल तर नाटकाला अधिकच रंग येईल!"

"शाबास—नाटकराव, शाबास!" मीं मध्येंच आनंदाचे उद्गार काढिले. "Idealistic (कल्पनासृष्टिप्रिय) नाटककारांना चीतच केलेंस ह्मणावयाचें! बरें, पण तिसरा नियम सांग पाहूं ?"

"महेश्वरपंत, रागावूं नको! माझीं प्रतिबिंबात्मक नाटकें जगापुढें येतील; पण एक गोम आहे." थट्टेचा आविर्भाव सोडून प्रेमपूर्ण व कोमल स्वरांत तो पुढें ह्मणाला, "तूं माझा बालमित्र आहेस. तेव्हां माझी खरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अडचण तुला सांगतों. नाटककार ह्मणून प्रसिद्ध होण्याची इच्छा मला ल्हानपणापासून आहे, हें तुला तरी आज सांगावयाला नको. ही इच्छा अलीकडे इतकी प्रबल झाली आहे कीं, नाटक रचल्याशिवाय मी मेलों विलों तर इच्छा अतृप्त राहिल्यामुळें पिशाचयोनीमध्यें जावें लागेल अशी मला भीति वाटते. आतां नाटक रचीन तर सामाजिक व Realistic (प्रतिबिंबात्मक) च रचीन अशी माझी माझ्या मनाशीं प्रतिज्ञा आहे. नाटक रचावयाचें तें मनोरंजक झालें पाहिजे. मनोरंजक करावयाचें ह्मटलें ह्मणजे त्यांत प्रेमबद्ध (ह्मणजे कामासक्त) युवयुवतींचीं संभाषणें, एकांतांतील देखावे, इत्यादि पाहिजेत. मघाशीं मी या बाबतींत कल्पनाप्रचुर (Idealistic) नाटककारांची चेष्टा केली त्यांत विशेषसा अर्थ नाहीं. समाज जसा आहे तसाच आदर्श लोकांपुढें ठेवावयाचा अशी माझी प्रतिज्ञा आहे; परंतु आपल्या या अशिक्षित, अरसिक व सैंपाकी बायकांच्या संबंधानें वस्तुस्थित्यात्मक नाटक केल्यास तें मनोरंजक कसें होईल ? अविवाहित तरुण–तरुणींचें एकान्तीं संभाषण होत नसल्यामुळें प्रेम–कलहाचे वगैरे मनोहर प्रसंग मला कसे घालतां येतील ? कुमारिकांच्या लग्नांमध्यें हुंड्याच्या व गोत्राच्याच अडचणी येत असल्यामुळें वस्तुस्थितीचा आदर्श दाखविणाऱ्या नाटककाराला नायकनायिकांच्या विवाहांत अकल्पित अडचणी कशा आणतां येतील ? आपल्या हल्लींच्या समाजांतील रहाणी बावळटपणाची झाल्यामुळें मला वीररस कसा आणतां येईल ? लोकांच्या राहणींत साहस व वैचित्र्य नसल्यास माझ्यासारख्या प्रतिबिंबात्मक नाटककारानें नाटकांत अद्भुतता कशी आणावी ? बरें, नाटकांत भिकंभट व अन्नपूर्णाकाकू यांचे प्रवेश घालावे तर तुमच्यासारखे टीकाकार ह्मणणार–' या नाटकांत बोधाचें उदात्तत्व, कल्पनेची भरारी किंवा

न. पु. ९
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसंगांचें अद्भुत-मनोहरत्व कांहींएक नाहीं !' तुमच्या अलीकडच्या नाटकांतील अद्भुत प्रसंग वस्तुस्थितीस अनुसरून नसल्यामुळें ते अस्मादिकांना पसंत नाहींत, व तुह्मां दुतोंडी वर्तमानपत्रकारांनाहि पसंत नाहींत. तुम्ही कल्पनाप्रधान नाटककारांवरहि उलटतां व ह्मणतां कीं, ' या नाटकांत ' यूरोपिअन समाजाचें व कादंबरीकारांचें अन्ध व निर्विवेक अनुकरण दिसतें."

" कठीणच प्रसंग आहे नाटककारांवर खरा ! बरें, मग ह्मणतोस तरी काय ?" मी मध्येंच म्हटलें.

" एवढेंच, कीं, मी जर नाटक करीन तर समाजाचा आहे तसा आदर्श दाखविणारेंच करीन. मला तुमच्या कल्पनेच्या भराऱ्या नकोत व बोधाचें उदात्तत्व नको. तेव्हां या अडचणींतून तूं कांहींतरी मार्ग दाखव. माझ्या हातून जर नाटक रचलें गेलें नाहीं तर मला खास वेड लागेल."

त्याची ही काकुळतीची विनवणी व शेवटलें वाक्य उच्चारतांना झालेली त्याची ती अनुकंपनीय, दीन व उदास मुद्रा पाहून मला जरा वाईट वाटलें. नाटक रचण्यांत नाटककाराला मुख्य अडचण ही होती कीं, त्याला कविप्रतिभाच नव्हती. लहानपणापासून मला तो ठाऊक असल्यामुळें याच्या सूक्ष्म व तरतरीत परंतु अतिचिकित्सक, एककल्ली, विकृतप्राय बुद्धींत कवितेज किंवा कविस्फूर्ति नाहीं हें मला ठाऊक होतें, व नाटककार होण्याच्या त्याच्या महत्त्वाकांक्षेबद्दल मीं त्याची अनेक वेळां चेष्टाहि केली होती. परंतु सध्याचा प्रसंग चेष्टेचा नसून प्रेमानें उपदेश करून त्याला एखादा मार्ग सुचवून देण्याचा आहे, असा विचार करून मीं त्याला ह्मटलें " नाटकराव, तुझी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही अडचण प्रतिबिंबात्मक नाटक लिहावयाचें या दुराग्रहामुळें उत्पन्न झाली आहे. अरे, नाटक काय किंवा कादंबऱ्या काय, त्यांत केवळ स्थित–वस्तु–वर्णन असावें हें शास्त्र कोठलें? प्रतिभा-संपन्न कल्पनेनें अलौकिक व हृदयंगम चित्र काढणारा कल्पक चितारी आणि यंत्राच्या साहाय्यानें एखाद्या देखाव्याचें हुबेहुब चित्र काढणारा फोटोग्राफर, या दोघांमध्यें कांहीं फरक नाहीं का? नाटकें किंवा कादंबऱ्या म्हणजे समाजाचा केवळ हुबेहुब फोटोग्राफ काय? कवीला ‘आज जें आहे’ तेवढेंच दिसावें, का ‘जें पूर्वी होतें किंवा पुढें असेल’ तेंहि दिसावें? ‘जगांत अमुक अमुक स्वभावाचे लोक आहेत’ अशा अर्थाचेंच त्यानें वर्णन करावें, का ‘अमुक एक स्वभावाचे लोक असावेत’ अशा अर्थाचेंहि त्यानें वर्णन करावें? ‘आहे,’ आणि ‘असावें’ यांमधील फरक कवीनें दाखवूं नये काय? बाह्य स्फुट उत्तान देखावाच दाखवावा, का त्या देखाव्याचा सूक्ष्म, खोल, गूढ अर्थहि कवीनें सांगावा? सामान्य माणसांच्या जड दृष्टीला दिसणारी सध्याची वस्तुस्थिति नाटक–कादंबऱ्यांत पहावयाची असते, का गूढार्थ जाणणाऱ्या व सर्व सृष्टींत उड्डान करणाऱ्या कविप्रतिभेला संभवनीय व प्रिय दिसणारी वस्तुस्थिति?”

“तूं ह्मणतोस तें सगळें मी सध्या कबूल करतों, महेश्वरपंत; बाकी ‘प्रतिभा प्रतिभा’ म्हणून तूं जें ह्मणत आहेस तें मला चांगलेंसें समजत नाहीं हो! तुझें ह्मणणेंहि खरें आहे व तुझें वक्तृत्वहि प्रतिभा-संपन्न आहे. परंतु ‘सद्यःकालीन हिंदुसमाजावर स्थितवस्तुवर्णनात्मक नाटक लिहावयाचें’ हा माझा निश्चयहि तितकाच दृढ आहे, आणि आपल्या या अशिक्षित व चुलीपुरतीच अक्कल असलेल्या बायकां-संबंधानें नाटक होणें शक्य नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे. शकुंतलेच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांधर्व-विवाह ज्या समाजांत एके काळीं मान्य झाला तो समाज आमच्या नाटककारांच्या दुर्दैवानें आज नाहींसा झाला आहे. मैत्रेयी, कात्यायनी, गार्गी, इत्यादि स्त्रिया ज्या आर्यावर्तांत तत्त्वज्ञानाच्या गूढ तत्त्वासंबंधीं स्त्रीपुरुषसमाजांत विद्वत्ताप्रचुर वादविवाद करीत असत, त्या आपल्या आर्यावर्तांतील स्त्रियांचें शिक्षण इंग्रजी चारपांच इयत्तांपुढें जाऊं नये, व अनेक विषयासंबंधानें त्यांना पुरुषांशीं मोकळेपणानें बोलतां येऊं नये, हें आमच्या नाटककारांचें दुर्भाग्यच नव्हे तर काय? स्त्रिया सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांचीं चरित्रें नाटक रचण्याला लायक असणार नाहींत, ह्मणून स्त्री-शिक्षण सर्वसामान्य व उच्चतर होईतोंपर्यंत उत्तम नाटककार व उत्तम नाटकें उत्पन्न व्हायचीं नाहींत. तो सुदिन येईतोंपर्यंत आह्मीं स्थितवस्तुवर्णनपर नाटककारांनीं स्वस्थ बसलें पाहिजे, किंवा स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराबद्दल चळवळ केली पाहिजे. आमच्या या कोंडलेल्या, दळ्या, सैंपाकी बायकांसंबंधानें कुशल नाटककार तरी काय नाटक लिहिणार?"

स्त्रीशिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल नाटकरावानें दिलेलें कारण ऐकून मला किंचित् हंसू आलें. परंतु नाटक रचण्याची लहानपणा-पासूनची त्याची महत्त्वाकांक्षा अर्धेंअधिक वय होऊन गेलें तरी सफल न झाल्यामुळें, आणि मीं व माझ्यासारख्या अनेक बालमित्रांनीं याच विषयासंबंधानें त्याची वारंवार चेष्टा केल्यामुळें, त्याच्या नाटक-विषयक विचारांत थोडासा भ्रमिष्टपणा आला असल्यास तो साहजिक व अनुकंपनीय आहे, असा विचार करून उत्तेजनपर कांहीं तरी खरेंखोटें भाषण करून त्याला धीर द्यावा या हेतूनें मीं त्याला प्रेमानें ह्मटलें, "अरे नाटकराव, तूं असा निराश होऊं नको! प्रीतिविवाह हल्लीं अगदींच होत नाहींत, असें समजूं नकोस. शेंकडा नव्याण्णव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बायका तूं ह्मणतोस त्याप्रमाणें चुलीच्याच योग्यतेच्या आहेत हें खरें आहे; परंतु कांहींकांहीं बायका चांगल्या सुशिक्षित आहेत; पुरुषांच्या सभेंत येऊन त्या व्याख्यानें देतात व वादविवादहि करितात. घरच्या स्त्रीपुरुषांमध्यें बसून मैत्रैयी, कात्यायनीप्रमाणें सामाजिक व तात्त्विक गूढ प्रश्नांचा खल करणाऱ्या बायका मला प्रत्यक्ष माहीत आहेत. ”

नाटकराव उत्सुकतेनें ह्मणाला, “ सांग–सांग कोणत्या त्या ? मी त्यांच्यावर खात्रीनें नाटक लिहितों. मग एखादा टीकाकार जर ह्मणाला कीं, असल्या स्त्रिया आपल्या समाजांत दृष्टीस पडत नाहींत व हें यूरोपियन कादंबऱ्यांचें अंध अनुकरण आहे तर त्याला तुझ्या ‘ सुविचारप्रसारां’त देतों उत्तर छापून कीं, ‘ हें नाटक अगदीं वस्तुस्थितिदर्शक आहे. नाटककाराला प्रत्यक्ष ठाऊक असलेल्या एका कुटुंबाला अनुलक्षूनच हें नाटक लिहिलेलें आहे.’ बरें, पण या सुशिक्षित बायका कोण कोठल्या हें सांग. त्यांच्यासंबंधानें प्रेमपूर्ण कांहीं कहाण्या आहेत काय ? प्रेमाचीं गुप्त कारस्थानें असल्याशिवाय मी नाटक कसें रचूं ?”

“ अरे गृहस्था, हें नाटकाचें तुला काय वेड लागलें आहे ?” मीं ह्मटलें. “ मोची जसा जाणारायेणारांच्या जोड्यांकडे, किंवा न्हावी जसा त्यांच्या दाढीकडे व हजामतीकडे पाहत असतो, तशांतलीच तुझी अवस्था झाली आहे. जो तो आपल्या मुद्याकडे पाहतो, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. कोणत्याहि गोष्टीकडे ‘नाटक रचण्यास योग्य आहे किंवा नाहीं’ याच दृष्टीनें तूं पाहतोस, हें कांहीं चांगलें नाहीं; आणि Realistic नाटककार ह्मणून आपली अब्रू वांचविण्याकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुझ्या नाटकाला आधारभूत असलेल्या स्त्रीपुरुषांचें नांवगांव प्रसिद्ध करण्यास स्वाभिमानानें तूं तयार झाला आहेस, तेव्हां या कुटुंबाची मी माहितीच सांगत नाहीं."

या कानउघाडणीमुळें नाटकराव जरा ओशाळला व मला ह्मणाला, "चुकलों, बाबा. नाटक रचण्याला योग्य असें हिंदु कुटुंब शोधून-शोधून दमलों, आणि माझ्या अशा या निराशेच्या स्थितींत एका सुशिक्षित हिंदु कुटुंबांतील प्रीतिविवाहाविषयीं बोललास ह्मणून आनंदाच्या भरांत माझें बिंग फुटलें. बाकी, मी नांवगांव प्रसिद्ध करण्याइतका मूर्ख आहें, असें तुला वाटतें तरी कसें? तें सगळें राहूं दे. महेश्वरपंत, बालपणापासूनची नाटककार होण्याची माझी महत्त्वाकांक्षा तुला ठाऊक आहे. नाटक लिहावयाचें तें सामाजिक व Realistic लिहावयाचें, हा अलीकडचा माझा निश्चय आहे. तो आतां तुझ्या उपदेशानें बदलावयाचा नाहीं. लोकरंजन होऊन माझें नाटक लोकप्रिय झालें आणि माझी नाटककार ह्मणून प्रसिद्धि झाली, ह्मणजे माझें काम झालें. तुझ्याशीं ह्मणून मी प्रांजलपणें कबूल करतों कीं, मी नाटकें लिहिणार तीं लोकशिक्षणाकरितां नव्हे, तर लोकरंजनाकरितां. नाटकामध्यें उदात्त तत्त्वें असलीं पाहिजेत, त्यामध्यें उत्तम प्रकारचा बोध असला पाहिजे, हा दुराग्रह मला पसंत नाहीं. सुधारकांची पाहिजे तशी चेष्टा करण्यास मी तयार आहें, व दुर्धारकांची तशीच टर उडविण्यासहि माझी ना नाहीं. रंगभूमीवर नाटक चालू असतां साऱ्या नाटकगृहांत हंशा पिकला पाहिजे ही माझी मुख्य अट, व दुसरी अशी कीं, तें सामाजिक व Realistic (प्रतिबिंबात्मक) असलें पाहिजे."

"Realistic असलें पाहिजे हा दुराग्रह कसला?" मीं ह्मटलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुराग्रह ह्मण, कांहीं ह्मण; Realistic पाहिजे, ही गोष्ट निश्चित. स्त्रीशिक्षणविरहित समाजस्थितींत असलें नाटक लिहिणें शक्य नाहीं. तुला जर एखादें संविधानक सुचत असेल तर सांग. (जरा थांबून) बरी आठवण झाली. मघांशीं ह्मणालास त्या प्रीतिविवाह करणाऱ्या सुशिक्षित कुमारीची माहिती सांग. त्या कुटुंबासंबंधीं Scandals (लोकप्रवाद) असल्यास फार उत्तम—"

" नाटक रचण्याच्या वेडानें काय बहकला आहेस रे तूं ! तुला नाटक रचतां यावें ह्मणून का त्या जन्मास आल्या आहेत ?"

" तसें नाहीं रे महेश्वरपंत ! पण ह्मटलें स्त्रीविषयक लोकप्रवाद असले ह्मणजे आयताच Realistic plot मिळावयाचा ! मला त्यांच्यावर नाटक रचतां येईल कां रे ?"

" तुझ्यासारख्याला त्यांच्यावर नाहीं नाटक रचतां यायचें. त्या सुशिक्षित आहेत, तरुण आहेत, परपुरुषाशीं बोलतात; परंतु त्यांचें मन त्यांच्या वडिलांना असंमत असलेल्या तरुणावर बसलेलें नाहीं, शिक्षणामुळें त्या उद्धट व फाजीलहि झालेल्या नाहींत, तेव्हां त्यांच्यावर नाटक रचून सुधारकांची तुला चेष्टा करतां यावयाची नाहीं. मैत्रेयी, कात्यायनी यांचीं नांवें काढलींस ह्मणून मला त्यांची आठवण झाली, एवढेंच. त्यांच्या अलीकडच्या चरित्रांत बोध घेण्यासारख्या अद्भुत आणि मनोरंजक गोष्टी नाहींत असें नाहीं; पण एवढें खरें, कीं, तुझ्यासारख्या केवळ लोकरंजन करूं पाहणाऱ्या नाटककाराला त्यांच्या स्वभावांत व चरित्रांत विशेष कांहीं मिळावयाचें नाहीं. संकुचित बुद्धीचा कृपण दुर्धारक आणि त्याची कामविव्हल झालेली सद्गुणी मुलगी; अथवा, सुधारणेच्या वेडानें बहकलेला सुधारक व शिक्षणानें बिघडलेल्या त्याच्या मुली, या पात्रांशिवाय तुझ्यासारख्यांना नाटक रचतां यावयाचें नाहीं."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" ह्मणजे मला तूं अगदींच याच्यांत काढलेंस ह्मणावयाचें! बरें, तुझ्या गोष्टींत अद्भुत व मनोरंजक प्रसंग तर आहेत ना? आणि तुझी गोष्ट खरी आहे ना ?"

" एक सोडून अनेक अद्भुत प्रसंग, व गोष्ट अगदीं खरी."

" मग, सांग, सांग लवकर! तुझी गोष्ट खरी व अद्भुत असल्या-मुळें दृष्ट-वस्तु-वर्णनपर व मनोरंजक नाटक लिहिण्याची माझी प्रतिज्ञा खास सफल होणार! गोष्ट सांगतांना पाल्हाळ मात्र लावूं नको. तुझा तो उदात्त बोध, तुझें तें वर्णन आणि तुझें तें कवित्व मला नको आहे,— फक्त तुझें संविधानक पाहिजे आहे. गोष्ट लवकर सांग. विलंब लावूं नको. नाटक रचलें नाहीं तर मी पिशाचयोनींत कदाचित् जाईन! महेश्वरपंत, तुझ्याशिवाय मला कोणी आतां तारणार नाहीं.—"

पुढें त्याच्यानें बोलवेना! त्याला घेरी आली व तो नाटकासंबंधानें असंबंध बडबड करूं लागला. नाटकरचनेचें त्याचें वेड ह्मणजे एककल्लीपणाचा अत्युत्कट नाद एवढेंच नव्हे, तर तें खरोखरीचेंच खूळ आहे, हें मला आतां पूर्णपणें समजून आलें व क्षणापूर्वी 'तुझ्यासारख्याला नाटक रचतां यावयाचें नाहीं' हे कठोर शब्द मी त्याला बोललों याचें मला वाईट वाटलें. त्याची ती स्थिति पाहून माझ्या पोटांत भडभडून आलें. इतक्यांत हणमंतरावहि तेथें आले, व त्यांनीं ती स्थिति पाहिल्याबरोबर ते तर रडूं लागले. नाटकराव हा तर लोकांना या गोष्टीवरूनच माहीत झाला असल्यामुळें त्याच्याबद्दल मला किंवा हणमंतरावांना जें वाटतें तें त्यांना वाटणार नाहीं, हें साहजिक आहे. इतर लोकांनां तो आज 'शहाणा वेडा' असा दिसत असेल; पण लहानपणापासूनच्या आह्मीं त्याच्या स्नेह्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्याकडे पाहिलें ह्मणजे त्याच्या लहानपणच्या एककल्ली पण विलक्षण तीव्र बुद्धीची, त्याच्या धाडसी परंतु निरलस चाळयांची व खोड्यांची, त्याच्या विनोदात्मक सूक्ष्म टीकेची; व त्याच्या निष्कपट भोळ्या स्वभावाची आह्मांला आठवण होते, व असल्या या प्रिय स्नेह्याच्या—या अमोलिक शुद्ध आत्म्याच्या—एकच असलेल्या दोषाची अविचारानें वारंवार चेष्टा केल्यामुळेंच त्याची अशी दु:स्थिति आली कीं काय अशी शंका येऊन मन घाबरून जातें व डोळे पाण्यानें भरून येतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांव बदलीन

हल्लींचें महायुद्ध सुरू होऊन कांहीं महिने गेले होते. मी कांहीं कामाकरितां मुंबईस गेलों होतों व गिरगांव बॅकरोडवरील 'तेजपाळ' चाळींत विश्वनाथपंत खरे नांवाच्या एका स्नेह्याच्या बिऱ्हाडीं उतरलों होतों. विश्वनाथपंतांच्या घरीं माणसें बेताचींच होतीं. राधाकाकू, पंधरासोळा वर्षांची त्यांची मुलगी यमुना, व चारपांच वर्षांचा एक मुलगा—गोटिराम (त्याचें लहानपणीं जें हें नांव पडलें तें कायमच झालें !). मी गेलों तो सकाळच्या चहाच्या वेळेवर गेलों. चहापाणी झाल्यावर यमुनेला 'वर्गांत नंबर किती, मुलें किती, चवथीच्या परीक्षेंत कितवा नंबर आला,' इत्यादि प्रश्न मी विचारीत होतों, इतक्यांत शेजारचे एक ठेंगू लठ्ठसे गृहस्थ हातांत एक जाडें मोठें पुस्तक व कोरा कागद, कानांत निळी तांबडी जाड पेन्सील, केंस पिसकरलेले, दाढी वाढलेली, वूलन शर्टचें गळ्यावरचें चांदीचें बटन सुटलेलें, तोंडांत विडी अर्धीअधिक जळून गेलेली आहे, अशा थाटांत आले.

"या धोंडोपंत !" मीं ह्मटलें "आज काय बातमी आणली आहे ?"

"रशिया प्रशियामध्यें कोनिग्जबर्गपर्यंत आंत घुसला आहे. हा रशियन रूळ साऱ्या जर्मनीला जमीनदोस्त करून टाकतो आहे पहा. तीन महिन्याच्या आंत बर्लिन !"

"जर्मनी तोंपर्यंत काहीं माशा मारीत बसणार नाहीं !" यमुना ह्मणाली. ती जात्याच धीट मुलगी होती. त्यांतून इंग्रजी शिकणारी व वर्गांत पहिला नंबर असलेली आणि चोहोंकडून कौतुक होत अस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेली. आणि त्यांतून धोंडोपंत खोटे या घरोब्याच्या माणसाशीं युद्ध-विषयक वगैरे गोष्टी बोलतांना तर तिला लाजणें किंवा भिणें ठाऊकच नव्हतें. मीं यमुनेच्या बोलण्याला दुजोरा दिला. "अहो, टाइम्सनें 'रशियन रोलर, रशियन रोलर' ह्मणून किती जरी ओरड केली, तरी तीन महिन्यांत बर्लिन गांठण्याची बात सोडून द्या !"

" मी टाइम्सवरून बोलतों असें समजूं नका !" धोंडोपंत ह्मणाले. " माझें म्हणणें मी अगदीं गणितानें " सिद्ध करून देतों. हें पहा, जर्मनीचें सैन्य पश्चिम दिशेला किती अडकलें आहे ? जर्मनीचें, आस्ट्रियाचें, रशियाचें वगैरे सैन्य किती आहे, हें आधीं पाहूं या. हें बघा या नकाशांत प्रत्येक राष्ट्राचें सैन्य, आरमार वगैरे सर्व चित्रांच्या द्वारें दाखविलें आहे."

अशा प्रकारें आरंभ करून त्यानें नकाशाच्या मोठ्या आल्बममधून एक मोकळा नकाशा काढला व त्यावरून परस्परांच्या बलाबलांची माहिती आम्हांला मोठ्या उत्साहानें सांगितली. नंतर कोरा कागद काढून कानांतल्या निळ्या तांबड्या पेन्सिलीनें आस्ट्रिया व जर्मनी यांचीं ठाणीं तांबडीं, व फ्रान्स–बेल्जम–रशिया वगैरेंचीं निळीं, अशीं नीट मेजमाप संभाळून दाखविलीं, व दोस्तराष्ट्रें तीन महिन्याच्या आंत बर्लिनला जाणार असें आपण कां ह्मणतों, याचें मोठें माहितीनें भरलेलें असें विवेचन केलें.

मीं त्यांचें सगळें ह्मणणें ऐकून घेतलें आणि मग ह्मटलें, "धोंडोपंत, तुम्ही ह्मणतां तें सर्व खरें. पण आपणाला एकंदर सैन्याचे नुसते आंकडे तेवढे ठाऊक आहेत. त्यांचे तळ कोठें कोठें आहेत, त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था कशी आहे, त्यांना दारूगोळा किती पुरवतां येतो, इत्यादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्टी आपणांला ठाऊक नाहींत. लढाऊ व व्यापारी गलबतांचीं नांवें आपण year-books मधून (वर्षग्रंथांमधून) वाचतों; पण तीं कोठें आहेत, त्यांना कोळसा कोठून मिळेल, त्यांना पाणबुड्यांपासून स्वसंरक्षण करून घेतां येण्यासारखें आहे किंवा नाहीं, इत्यादि प्रकारची महत्त्वाची माहिती आपणांला मुळींच नाहीं. शत्रूंचे तळ कोठें कसे पडले आहेत, त्यांचे हेतु काय आहेत, हें आपल्याला त्यांच्या मुखानें कळत नाहीं. एका पक्षानें दिलेल्या बातमीच्या उष्ट्या, शिळ्या, चतकोर तुकड्यावर आपली भूक शांत करून घ्यावी लागते. दुसऱ्या राष्ट्रांशीं कारस्थानें काय चाललीं आहेत याची कोणाला कल्पना देखील नाहीं. अशा स्थितींत कांहीं 'डेटा' (दत्त प्रमेयें) नसतांना—"

"'डेटा' नसतांना! मराठीचा तरी खून करूं नका, एवढी मेहेरबानी करा! तुमच्यासारख्यांना चार वाक्यें शुद्ध मराठी बोलतां येऊं नयेत, हें मोठें आश्चर्य आहे, आणि तुम्ही आम्हांला युद्धाविषयीं उपदेश करणार?"

माझ्या मराठीच्या शुद्धाशुद्धतेचा प्रश्न त्यावेळीं निघण्याचें वास्तविक कांहीं कारण नव्हतें. पण धोंडोपंत त्यावेळीं संतापले होते व त्यांनीं वड्याचें तेल वांग्यावर काढलें राहूं द्या झालें! बाकी, त्यांच्या व्यवसायावरच आम्हीं गदा आणली, तेव्हां त्यांनीं तरी आमच्यावर कां संतापूं नये? त्यांचा धंदा पैशाकरितां नव्हे तर हौशीकरितां वर्तमानपत्रांत युद्धविषयक लेख लिहिण्याचा होता. युद्धाचा अभ्यास करण्याचा त्यांना मोठा नाद होता—इतका कीं, त्यांनीं वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास जर पूर्वींइतका बारकाईनें व लक्ष लावून केला असता, तर पांचदां वारी करून परीक्षादेवी प्रसन्न नाहीं ती नाहींच अशी स्थिति झाली नसती. धोंडोपंतांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वडील नारायण गोपाळ खोटे, यांचें काळबादेवी रोडवर जुन्या सेकंड–हँड पुस्तकांचें एक दुकान होतें. त्यांत त्यांनीं पुष्कळ पैसे मिळविले होते. वडील वारून आज बरींच वर्षें झालीं होतीं; तरी दुकान पूर्वींसारखेंच चाललें होतें. धोंडोपंतांनीं ५० रुपये पगाराचा एक मॅनेजर-कारकून असा दुहेरी दर्जाचा एक मनुष्य, व एक १२ रुपयांचा गडी ठेवला होता, व हीं दोन जुनीं माणसें दुकानाचें बहुतेक काम पहात असत व यजमानाला घरींबसल्या १००–१२५ ची प्राप्ति करून देत. या जुन्या पुस्तकालयांत युद्धकलाविषयक पुष्कळ पुस्तकें होतीं, तीं धोंडोपंतांनीं सगळीं वाचून टाकलीं होतीं. हीं पुस्तकें तेथें कोठून आलीं ह्मणाल, तर हिंदुस्तानांतील कॅप्टन, कर्नल वगैरे अंमलदार पेन्शन घेऊन किंवा फर्लोवर गेले म्हणजे ते आपलीं पुस्तकें घाऊक लिलावानें विकीत असत, त्यांच्यापासून आलेलीं होतीं. यांत पुष्कळ दुर्मिळ व अत्यंत उपयुक्त अशीं पुस्तकें होतीं. वकिलीची वारी करण्याचें सोडल्यापासून धोंडोपंतांना कादंबऱ्या व युद्धविषयक पुस्तकें वाचण्याचा नाद लागला. या विषयांत आपण पारंगत झालेले आहोंत, अशी त्यांची समजूत होती. त्यांची बायको पांच वर्षांपूर्वीं वारली होती; गृहिणीच्या अभावामुळें हा खुळा नाद लागलेला असावा. पण ध्येयवादित्वामुळें आपल्या प्रियेच्या प्रेमाखातर पुढें आजन्म अविवाहित रहावयाचें, अशी त्यांनीं मनांतल्यामनांत प्रतिज्ञा केली होती, ह्मणून दुसऱ्या लग्नाच्या गोष्टी ते काढूं देत नसत. अलीकडे मात्र त्यांची ही वृत्ति बदलूं लागली होती पण ही गोष्ट प्रस्तुत नाहीं. युद्धकलेमध्यें ते आपणांस पारंगत झालेले समजत, व चाळींतील व इतर ठिकाणचेहि त्यांच्या ओळखीचे लोक त्यांना युद्धाचे ‘स्पेशिआलिस्ट’ म्हणून मान देत, हें मला सांगावयाचें होतें. त्यांची ही समजूत चालू

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युद्धानंतर अत्यंत दृढ झाली होती, व या समजुतीमुळेंच नकाशाचें पुस्तक, एक कोरा कागद आणि एक निळी तांबडी पेन्सील, आणि टाइम्स, क्रानिकल किंवा ॲडव्होकेट चोवीस तास जवळ बाळगण्याचा त्यांना अभिमान वाटत असे. बुदबळें व पट खाकेंत मारून दुसरा जेथें 'बसा' ह्मणेल तेथें खेळ मांडण्यास तयार असलेल्या षोकी लोकांच्या गोष्टी मीं लोकांच्या तोंडून ऐकल्या आहेत. पण नकाशाचें पुस्तक वगैरे सामान खाकेंत घेऊन फिरावयास जाणारे हे गृहस्थ मीं प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. युद्धासंबंधानें आपणांला खरें अनुमान कांहीं-एक काढतां येणें शक्य नाहीं असें प्रतिपादणारा मनुष्य धोंडोपंतांना शत्रूसारखा वाटावा, हें अशा स्थितींत साहजिक आहे. आपली चारजणांत–विशेषतः यमुनेसारख्या मुलीसमोर–फजिती झालेली त्यांना कशी बरी वाटेल ? ते ह्मणाले, "अहो, तुह्मांला युद्धांतलें कांहीं समजत नाहीं ह्मणून सगळ्यांना समजत नाहीं, असें समजूं नका. मीं शास्त्रीय पद्धतीनें केलेलीं भविष्यें कितीतरी खरीं ठरलीं आहेत! या मंडळींना विचारून पहा पाहिजे तर."

"पण खोटीं किती ठरलीं ? त्याची कांहीं कोणीं गणति केली आहे का ? मागें आलों होतों त्या वेळेस 'पॅरिस दोन दिवसांनीं शरण येईल' असें तुम्हीं भविष्य केलें होतेंत, त्याचें काय ?"

"त्याचें असें झालें, कीं, जनरल जॉफरेजवळ सैन्य किती व कोठें होतें, आणि त्याचा डाव काय होता, हें त्यावेळीं तारांच्या बातमींत कळलें नव्हतें."

"मी तरी तेंच ह्मणतों; आणि नुसत्या तारांवरून लढाईचें काय कळणार ?"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"अहो, एकदां दोनदां अनुमान चुकलें ह्मणून अनुमानशास्त्रच खोटें ठरतें कीं काय? आज भविष्य सांगतों त्याची परीक्षा पहाच तुम्ही. मी असें भविष्य करितों कीं, कोनिग्जबर्ग पडल्याची उद्यांपर्वां बातमी येते पहा. अहो, डावच असा पडला आहे. जर्मनी असा इथें आहे; रशिया इथें आहे; एक रेलवे इथून अशी गेली आहे; दुसरी एक आहे ती असा वळसा घालून येते; जर्मनीला राकेल, तांबें वगैरे जिनसांची व अन्नाची टंचाई आहे; रशियाला या गोष्टींचा हवा तेवढा पुरवठा आहे; त्याच्याजवळ सोल्जर मुंग्यांप्रमाणें आहेत; पैसा पाण्यासारखा ओतण्यास तो तयार आहे; ऑस्ट्रियाला खालून तो चेपीत येतच आहे, तेव्हां त्याची जर्मनीला कांहीं मदत मिळणार नाहीं; पश्चिमेकडे आतां फ्रेंचांनीं जोरानें लढाई चालविली आहे, तेव्हां तिकडे सैन्य जर्मनीला बरेंच पाठविलें पाहिजे; अशा स्थितींत रशियन रूळ टाइम्स ह्मणतो त्याप्रमाणेंच चालू झाला असल्यामुळें त्यापुढें कोनिग्जबर्गसारखे किल्ले कितीहि मजबूत असले तरी ते सपाटच होणार."

त्याच दिवशीं ह्मणजे गुरुवारीं संध्याकाळीं यमुना शाळेंतून परत येत असतांना ॲडव्होकेट वाटणारा नोकर तिला जिन्यांत भेटला. तिनें तेथूनच ॲडव्होकेट त्याजवळून घेतला व घरांत शिरण्यापूर्वींच तो तिनें उघडून पाहिला. हेतु हा, कीं, धोंडोपंतांनीं भविष्य केल्याप्रमाणें 'Konigsberg fallen (कोनिग्जबर्ग पडलें)' अशी तार येते कीं काय, हें पहावें. पण तशी तार तिला दिसली नाहीं. ती इंग्रजी पांचवींतच होती, पण तिच्या घरीं वर्तमानपत्रें रोज येत असल्यामुळें तारांचे मथळे पाहून अंदाजानें अर्थ करण्यापुरतें तिच्या अंगांत बुद्धिसामर्थ्य होतें. तिला वाचतांवाचतां पुढील मथळा दिसला:—'Russia decides to give up investment—रशियानें वेढा उठविला!'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्मणजे धोंडोपंतांचें भविष्य खोटें ठरलें ! यमुना जात्या कांहीं दुष्टबुद्धीची नव्हती; पण तिला ही बातमी वाचून इतका आनंद झाला कीं, बोलायची सोय नाहीं. ती लगेच घरांत धांवली व मी पुस्तक वाचीत बसलों असतां मला ह्मणाली "बोलवा, धोंडोपंतांना लवकर बोलवा !"

" काय, झालें तरी काय ?" मीं विचारलें.

" तुम्ही आधीं आपले बोलवा तर खरे !" यमुना ह्मणाली.

ॲडव्होकेट तिच्या हातांत उघडा होता तेव्हां युद्धाची कांहीं तरी बातमी असणार, हें मीं ओळखलेंच. मी धोंडोपंतांच्या दाराशीं गेलों तों धोंडोपंत बाजारांतून आधीं स्पेशल आणलेला ॲडव्होकेट हातांत घेऊन खोलींतून लगबगीनें बाहेर निघत होते. मला पाहिल्या-बरोबर तर त्यांनीं जो पोबारा ठोकला, त्यामुळें " अहो, जरा थांबा !" हें ह्मणण्याचेंहि मला भान राहिलें नाहीं.

तरी पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं आमच्या युद्धकलाविशारदांना आमच्याकडे आल्याशिवाय राहवेना. गवई एक वेळ एकटा गात बसेल व जगाची पर्वा करणार नाहीं; पण ग्रंथकार, वक्ते, युद्धाचें भविष्य करणारे, इत्यादिकांना वाचक किंवा श्रोते मिळाले नाहींत, तर त्यांना चैन पडावयाचें नाहीं. आदल्या दिवशीं एवढी फजिती झाली तरी पुनः डाव्या खाकेंत नकाशाचें पुस्तक व कोरा कागद, कानांत निळी-तांबडी पेन्सील, उजव्या हातांत टाइम्स, अशा थाटांत स्वारी पुनः आमच्या घरीं आली. 'रोजची संवय' हें याचें एक कारण असेल, किंवा आणखी दुसरेंहि काहीं कोमल कारण असेल. कसेंहि असो. धोंडोपंत पुनः आपले रोजच्यासारखे आले आणि पहिल्यानें जरी बेताबेतानें बोलत होते, तरी शेवटीं युद्धाचें भविष्य करण्याचा त्यांना मोह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालाच! आणि त्यांचें दुर्दैव असें कीं, दुसरा दिवस उजाडण्यापूर्वींच संध्याकाळच्या ॲडव्होकेटनें त्यांचें भविष्य खोटें पाडलें. धोंडोपंतांना तोंड दाखविण्याची सोय नव्हती; पण त्यांना त्या दिवशीं मीं निसटून पळूं जाऊं दिलें नाहीं. विश्वनाथपंत, मी व यमुना यांनीं धोंडोपंतांचा चांगलाच समाचार घेतला. ते रागावले; अखेर चिडले. हें पाहून यमुनेला आनंद झाला; पण राधाकाकू आंतून चरफडूं लागल्या व यमुनेला 'केवढ्या मोठ्यानें हंसतेस! कांहीं तरी मर्यादा ठेवावी,' इत्यादि बोलूं लागल्या. राधाकाकूंच्या मनानें यमुनेला धोंडोपंत हे वर योजिलेले होते ह्मणून त्यांना यमुनेचें हें धाष्टर्य आवडलें नाहीं आणि ह्मणूनच त्या तिला रागावल्या. हें सर्व ओळखून विश्वनाथपंतांनीं धूर्तपणें लगेच हळूच विषय बदलला; परंतु लवकरच धोंडोपंतांनीं आपलें महायुद्धाचें संभाषणाच्या मैदानांत ढकललें व उद्यांचें भविष्य ते आपल्या तऱ्हेनें कागदावर निळ्यातांबड्या आकृति काढून सांगूं लागले. त्या दिवशीं यमुनेला काय जोर आला होता कोणाला ठाऊक, ती आपली धोंडोपंतांच्या विरुद्ध प्रतिपादन करूं लागली. आधींच 'हुषार, हुषार' म्हणून घरींदारीं नांवाजलेली, त्यांतून वडिलांचे लाड आणि प्रचलित मनोरंजक मासिकें वाचून स्त्रियांच्या हक्काविषयीं तिच्या मनांत किंचित् अभिमानाच्या कल्पना शिरलेल्या; तेव्हां केव्हांकेव्हां असा अतिरेक व्हावयाचाच.

असो. धोंडोपंतांचें प्रतिपादन (टाइम्सवरून घेतलेलें!) असें होतें कीं, या आठवड्यांत उत्तरसमुद्रांत जलयुद्ध होणार. यमुना म्हणाली, "नाहीं, जलयुद्ध करण्याइतका जर्मनी कांहीं मूर्ख नाहीं. त्याचं आरमार बोलून चालून कमी, तो कशाला जलयुद्धाच्या भानगडींत पडेल? कॅले (Calais) घेतल्यावर मग बेल्जममधील नद्याकालव्यांतून चोरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्कळशा पाणबुड्या सोडतां येऊं लागल्या आणि दोनचार चांगलीं बंदरं त्याला मिळालीं ह्मणजे कदाचित् तो जलयुद्ध करील."

झालें. वादविवाद निकरावर आला. कोणी आपला हट्ट सोडीना. शेवटीं यमुना अगदीं जोरांत येऊन ह्मणाली "जलयुद्ध आतां होणें शक्यच नाहीं. झालें तर नांव बदलीन!"

हें दुसरें वाक्य पुरुषी थाटाचें आहे. पण इंग्रजी शिकण्यास लागलेल्या बायकांच्या भाषेंतील बायकीपणा थोडथोडा कमी होत असतो, हा अनुभव आहे. यमुना आमची सर्वांची आवडती, पण त्या वेळचा तिचा तो आवेश आणि तिचे ते पुरुषी हावभाव आणि शेवटलीं ती नांव बदलण्याची प्रतिज्ञा ऐकून आह्मां सर्वांना कसेंसें वाटलें. धोंडोपंत कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं आपलें नकाशाचें पुस्तक गुंडाळलें, व कागद, पेन्सिल आणि अॅडव्होकेट घेऊन स्वारी निघून गेली!

* * *

"अहो, उठा, उठा, किती वेळ निजतां तरी किती! उठा, उठा, उठा!"

"अहो उठतों धोंडोपंत, थांबा तर खरे. एवढें मोठ्यानें कां ठोठावतां?"

"अहो, उठा, उठाच तुम्ही लवकर उठा, उठा, उठा!"

मीं डोळे चोळीत बाहेर आलों आणि किंचित् रागानें ह्मटलें, "काय, झालें तरी काय धोंडोपंत? कोठें आगबीग लागली का काय? का कोणीं—"

"नाहीं हो; मोठी महत्त्वाची बातमी आलेली आहे. आजचा टाइम्स वाचा. हेलिगोलंड बेटाजवळ मोठें जलयुद्ध झालें व जर्मनांना चांगलाच मार बसला. दोन लढाऊ बोटी बुडाल्या, तीन नादुरुस्त होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरुपयोगी झाल्या. अशी महत्त्वाची बातमी कितीक दिवसांत आली नव्हती! उठवा, सगळ्या माणसांना उठवा."

धोंडोपंतांच्या दरवाजावरच्या ठोकाठोकीनें आणि आरडाओरडीनें सारी चाळ जागी झाली होती, तेव्हां आमच्या घरांतील माणसें आंत जागीं झालीं होतीं हें सांगायला नकोच. धोंडोपंतांनीं "टाइम्स काय ह्मणतो पहा," असें ह्मणून माझ्या अंगावर टाइम्स फेंकला; पण लगेच आपण हा नैतिक अत्याचार केला असें त्यांना वाटलें. मी टाइम्स वाचल्यावर तो यमुनेनें माझ्या हातांतून घेतला. वाचून झाल्यावर आपल्या प्रतिज्ञेची तिला आठवण झालीच. तिचें तोंड उतरलें. मीच नव्हे तर तिचे वडीलहि तिची आतां चेष्टा करूं लागले. ती पहिल्या प्रथम आपलें कसेंतरी समर्थन करूं लागली; पण तें लंगडें समर्थन आमच्यापुढें किती वेळ टिकणार? धोंडोपंत युद्धाचीं अनुमानें कशीं करावींत, कोणत्या गोष्टी लक्ष्यांत घ्याव्या लागतात, इत्यादि गोष्टींवर अनेक ग्रंथकारांच्या आधारें विवेचन करूं लागले. यमुनेच्या डोळ्यांतून गंगा वाहूं लागली. बॅकबेवरील संध्याकाळच्या सूर्यासारखे तिचे गाल लाल झाले. तिचे ते हुंदके आणि तिचें तें तोंड माझ्यानें पहावेना. पण करणार काय? बाजू तिच्या अंगावर आली होती. दोन दिवस तिनें धोंडोपंतांवर तोंडसुख घेतलें होतें, तेव्हां धोंडोपंतांचें तोंड आतां बंद करणें शक्य नव्हतें. शिवाय, ते प्रत्यक्षपणें तिला बोलत नसत, तर आडून तिच्या प्रतिज्ञेची तिला आठवण देत.

आतां काय करावें, अशा विवंचनेंत मी असतां मला एक शाब्दिक कोटि सुचली व आह्मी सर्वांनीं मनांत योजिलेली लग्नाची गोष्ट काढण्यास ही संधी बरी आहे असें वाटून मी ह्मटलें, "यमू, तुझी प्रतिज्ञा काय आहे? नांव बदलीन एवढेंच ना? नांव बदल, त्यांत काय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाईट आहे? मुलींना केव्हां तरी माहेरचें नांव टाकावेंच लागतें! धोंडोपंतांना आतां जय झाल्यासारखा वा तो आहे, पण नांव बदलून त्यांनाच जिंक म्हणजे झालें!"

यमुनेनें लागलीच डोळे पुसले व गालावरचे अश्रु पुसून आणि नाकांतून श्वासोच्छास आंत ओढून "मला नाहीं असलं बोलणं आवडायचं हो," असें मान ठमकाऱ्यानें हलवून ह्मणत ह्मणत ती घरांत गेली. पण तिच्या चेहऱ्यावर रागाचा अंश दिसला नाहीं. उलट थोडेंसें हास्य तिच्या तोंडावर चमकलें व डाव्या गालावरचे अश्रु सूर्योदयकालीं तांबड्या कमलावरचे जलबिंदु जसे दिसतात तसे दिसूं लागले.

विश्वनाथपंतांनीं आदल्या दिवशीं रात्रीं या विवाहयोजनेविषयीं मजजवळ गोष्ट काढली होती, व मीं लगेच धोंडोपंतांकडे जाऊन नांवगांव न घेतां दुरून दुरून बोलून त्यांचें मन कोणीकडे झुकत आहे, हें अजमावून पाहिलें होतें, म्हणून तर मीं लग्नाची गोष्ट त्या वेळीं एकदम तेथें उघड णें काढली! थोड्या वेळानें गंभीरपणानें या विषयाची आह्मी चर्चा करूं लागल्यावर धोंडोपंत या योजनेला बाहेरून कांकूं करीत कबूल झाले.

यमुना खरे हिची प्रतिज्ञा खरी झाली, पण 'खोव्यां'च्या घरांत पडल्यामुळें तिची पुष्कळदां या बाबतींत चेष्टा होते. तथापि धोंडोपंतांना विशेष माहिती नसतांना युद्धाबद्दल भरप्रसार कांहीं तरी बोलण्याचा आणि वर्तमानपत्रांत व मासिकांत कांहीं तरी लिहिण्याचा जो वाईट नाद गृहिणीच्या अभावीं लागला होता तो घालविण्याचें व त्यांचा संसार सुखकर करण्याचें तिला पुष्कळ लोक श्रेयहि देतात आणि ह्मणून शाब्दिक चेष्टेचें तिला विशेष कांहीं वाईट वाटत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
LIBRARY, GURUKULA KANGRI

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar